म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क्र. ५२८४

IRBK-0105284

IRBK-0105284

दे. वृ.- ५२८८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 APR 1971

15 MAY 1975

13 MAY 1976

5 FEB 1979

# बहुरंगी करमणूक

## ( भाग पहिला )

अनु. २९०१९

वा. क्र. ५२८४

दि. ...७-९-७१...

:: संग्राहक ::

रामचंद्र त्र्यंबक रानडे,
बी. ई. ( सिव्हिल )

ग्रंथ वाचण्याच्या योग्यतेचा असेल तर तो विकत घेण्याच्याहि योग्यतेचा आहे हें विसरूं नका. फुकट ग्रंथ वाचण्याचें दारिद्य बुद्धींत ठेवूं नका.

— जॉन रस्किन

IRBK-0105284

IRBK-0105284

मूल्य १॥ रुपया

कोडीं म्हटलीं कीं ज्यांना त्यासंबंधांत
माझ्याइतकीच गोडी आणि
आकर्षण वाटतें
त्या
माझ्या साऱ्या
छोटया भावंडांना शुभाशीर्वादपूर्वक भेट

—रा. त्र्यं. रानडे

# अनेकांचा एकच प्रश्न !

कंटाळवाणा काळ काढायचा कसा? आगगाडी, आगनाव वा मोटार यांतून दूरवरचा प्रवास करणारे प्रवासी, सांठलेली रजा घेऊन स्वास्थ्य अनुभविणारे अधिकारी, लांबलचक सुट्टीनें कंटाळून जाणारे विद्यार्थी, नुकतेच आजारांतून बरे होणारे रुग्णाईत, किंवा हातपाय मुरगळून वा अन्य कांहीं कारणानें दिवसचे दिवस अंथरुणांत डांबून पडणारे कोणी, किंवा अशाच प्रकारें इतर कोणी कोणी, अगदीं साऱ्या साऱ्यांची नेमकी हीच एक अडचण! आणि म्हणूनच पोरांसोरांपासून तों म्हाताऱ्याकोताऱ्यापर्यंत, छोट्या बाळापासून तों काठी टेकीत जाणाऱ्या रंगोपंतांपर्यंत साऱ्यांची हीच अडचण भागविण्यासाठीं 'बहुरंगी करमणूक' मोठ्या तत्परतेनें सिद्ध टाकलें आहे.

अर्थात् केवळ कालहरण इतकाच मात्र त्यांतील हेतु निश्चितच नव्हे. आणखी किती तरी भाग त्यांत आहे.

नित्याच्या त्याच त्याच कार्यक्रमांत तुम्हांला कांहीं बदल हवा आहे काय? कामाच्या रगाड्यानें रंजीस येऊन तुम्ही शिणलां आहांत काय? आणि या 'तोच तो' पणानें आलेला शिणवटा नाहींसा करावा असें तुम्हांला वाटतें काय? अथवा

# बहुरंगी करमणूक

## ( भाग पहिला )

२८०१८
वा. वा.
११८
३/३/६७

:: संग्राहक ::

रामचंद्र त्र्यंबक रानडे,
बी. ए. ( सिव्हिल )

ग्रंथ वाचण्याच्या योग्यतेचा असेल तर तो विकत घेण्याच्याहि योग्यतेचा आहे हें विसरूं नका. फुकट ग्रंथ वाचण्याचें दारिद्य बुद्धींत ठेवूं नका.

— जॉन रस्किन

मूल्य १।। रुपया

केव्हांहि आपले विसांव्याचे क्षण अधिक आल्हाददायक व्हावे अशी तुमची मनीषा आहे काय? या साऱ्या गोष्टींवर अचूक गुणकारी असें 'बहुरंगी करमणूक' हें उत्कृष्ट रसायन आहे.

थोरांपासून लहानांपर्यंत साऱ्यांना रुचेल, पचेल नि आवडी-निवडीला जुळेल असेंच तें आहे. जेव्हां केव्हां हवें तेव्हां हें पुस्तक हातीं घ्या नि इच्छेला येईल तें पान उघडून वाचूं लागा. अगदीं थोड्याच वेळांत तुम्हांला जें हवें होतें तेंच नेमकें हातीं लागल्याचा तुम्हांला प्रत्यय येईल; आणि तुमची नड यशस्वीपणानें भागविल्याचें श्रेय सर्वतोपरीनें तुम्ही त्यास बहाल कराल.

'बहुरंगी करमणूक' तुमची प्रवासांत उत्तम सोबत करील. आणि तुमच्या सहली नि सफरी तर, त्याविना निश्चित अळणी ठरतील! हें पुस्तक तुमची भरपूर करमणूक करील. नेहमींच्या चाकोरीबाहेर तें तुम्हांला घेऊन जाईल. निरनिराळ्या करामती नि गमती सांगेल आणि पुस्तक-वाचन थांबविल्यावर तुम्हांला आढळून येईल, कीं तुमचा शीण नाहींसा झाला आहे आणि कंटाळ्यानें तर केव्हांच काळें केलें आहे. याव्यतिरिक्त तुम्हांला हेंहि समजून येईल, कीं घटकाभर मनरंजन करतां करतां या पुस्तकानें तुमच्या मनाला तरतरी आणली आहे नि तुमच्या बुद्धीचे वेगवेगळे पैलूहि तुम्हांला कळत नकळत त्यानें मोठ्या कौशल्यानें उजळले आहेत. तसेंच त्याद्वारां चारचौघांवर छाप पाडण्यास योग्य अशी नाना प्रकारची भरगच्च सामुग्रीहि आतां तुमच्या हातीं लागली आहे.

अनेकांनीं मुक्तकंठानें प्रशंसिलेलें मराठींतील अभिनव प्रकारचें असेंच हें पुस्तक आहे. स्वतः तें वाचा आणि प्रत्यय घ्या. इतरांना भेट म्हणून द्या. कोठल्याहि प्रसंगीं कोणासहि भेट म्हणून देण्यास याच्याइतकें सर्वोत्तम पुस्तक मिळणार नाहीं.

—रा. त्र्यं. रानडे

एकमेव विक्रेते:—अभिनव पुस्तक मंदिर, डेक्कन जिमखाना, पुणें ४.

प्रकाशक :
रा. त्र्यं. रानडे,
४७, डेक्कन जिमखाना,
पुणें ४.

( आवृत्ति चवथी )

सन १९५५ ] [ प्रति ३०००

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रक :
ना. के. महाजन,
नवहिंद मुद्रणालय,
८३५, सदाशिव पेठ,
पुणें २.

# प्रास्ताविक

'विचार नि वर्तनक्रम यांमध्यें वेगळेपणा म्हणजेच विश्रांति' अशी विश्रांतीची व्याख्या आधुनिक शास्त्रज्ञांनीं केली आहे. विषयांतर घडलें कीं, मनाचे व शरीराचे नवे भाग काम करूं लागतात आणि मनुष्याला एक प्रकारचा विसांव्याचा आनंद लाभतो. 'मनाला कांहीं तरी विरंगुळा हवा' असें ज्या वेळीं आपण म्हणतों, त्या वेळीं त्याच त्या गोष्टीचा कंटाळा घालविण्यासाठीं कांहीं तरी विषयांतर घडावें असाच आपल्या म्हणण्याचा भावार्थ असतो.

प्रत्येक मनुष्याची कामाची एक चाकोरी ठरून जात असते; आणि त्यांतून बाहेर पडून जरा निराळ्या वातावरणांत जाण्याची सर्वांनाच उत्सुकता असते. नित्य कामाच्या रगाड्याखाली भारावल्या जाणाऱ्या सर्वांनाच करमणूक वा चित्तरंजन हें एक प्रकारचें वंगण म्हणून उपयोगी पडतें. त्यामुळें माणसाला येणारा शीण वा कंटाळा पार धुऊन जातो; आणि त्याच्या शरीर-मनाला पुनश्च टवटवी येते. करमणुकीचा रुचिपालट मनुष्याची प्रफुल्लता वाढविण्यास अत्यंत साहाय्यकारी आहे आणि ज्या प्रमाणांत मनुष्यांतील ही उत्फुल्लता आणि उल्हास वाढत राहील त्या मानानें आयुष्य सुखदायी होईल हें निश्चित !

बोलून चालून ही करमणूक. परंतु इतर शास्त्रांप्रमाणें करमणुकीचेंहि एक शास्त्र आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. कमींत कमी मोबदल्यांत अधिकांत अधिक लाभ पदरांत पाडणें हेंच कुठल्याहि शास्त्रीय पद्धतीचें तंत्र आहे. अर्थात् तें याहि विषयाला लागू केलें असतां अयोग्य कसें म्हणतां येईल

प्रस्तुत पुस्तकांत करमणुकीचे अनेक प्रकार ग्रथित केले आहेत. त्यांपैकीं मुख्यतः कोड्यासंबंधींच मला थोडेंफार सांगावयाचें आहे.

कोडें म्हटलें कीं, छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत साऱ्यांचेंच चित्त तें वेधून घेतें. साऱ्यांचेंच आकर्षण करण्यास कोड्यांहून दुसरें उत्तम साधन असेल असें वाटत नाहीं; आणि याचें कारण उघडच आहे. अडचणींशीं झग-

डणें हा मनुष्यधर्म आहे. अडचणी आल्या कीं, मनुष्यांतील अहंभाव जागृत होतो आणि तो कार्य करूं लागतो. आणि कोडें म्हणजे मनुष्याच्या कर्तृत्वाला केलेलें एक प्रकारचें आव्हानच नव्हे का? अर्थात् मनुष्य म्हणवून घेण्यास पात्र असणारा प्रत्येकजण हें आव्हान स्वीकारतोच. कारण अडचणींमधून यशस्वीपणें पार पाडण्यांत, जो एक अलौकिक आनंद असतो तो कोणी गमावूं इच्छीत नाहीं.

आंबा हें जसें सर्वमान्य फळ आहे, तसेंच कोडें हें एक सर्वमान्य आकर्षण आहे. जगाच्या प्रारंभाइतकाच कोड्यांचाहि प्रारंभ अनादि आहे हें निश्चित; आणि जनमनावर या गोष्टीची पकड तितक्याच प्रभावीपणानें आजहि आहे, असें आपणांस आढळून येईल. अर्थात् आंबा न आवडणारे जसे कांहीं आंबटशोकी असतात, तद्वतच कोडीं म्हटलीं, कीं कपाळाला आठ्या घालून तिरस्कारानें भुंवया उंच करणारे कांहीं म्हैसमंगळू लोकहि असतातच, नाहीं असें नाहीं; परंतु अर्ध मानवकोटी म्हणून आपण त्यांचा अपवादात्मक विचार करावा हें बरें !

एकूण, कोडीं सर्वांनाच प्रिय असतात आणि हवींहवींशीं वाटतात. उत्तमोत्तम कोड्यांच्या द्वारा मनाला घडणाऱ्या कसरती-करामतींनीं आपण खूपच आनंदून जातों. निर्भेळ किंवा निर्मळ म्हणा असा सात्त्विक आनंद आपल्याला कोड्यांपासून लाभतो हें निश्चित !

स्वच्छंदी छंद किंवा फुरसतीचा वेळ घालविण्याचें साधन म्हणून तर कोडीं उपयुक्त आहेतच पण करमणुकीसमवेतच बुद्धीला कार्यप्रवण करण्याचें दुहेरी कार्य त्यामुळें घडतें.

उत्कृष्ट शिक्षक कोण? जो शिष्यांचा हंसत खेळत बुद्धिविकास करतो तो ! कोडें म्हटलें कीं त्याचें इतकें अद्भुत आकर्षण सर्वांच्या मनाला पडतें कीं, तें सोडवितांना आपल्या बुद्धीचे अनेक पैलू उजळले जात आहेत हें फारच थोड्यांच्या ध्यानीं येतें. अर्थात् हंसत खेळत घडणाऱ्या ह्या बुद्धिविकासाचें श्रेय कोड्यांकडे अगदीं नकळतपणें जातें.

कोड्यांच्या द्वारें बुद्धीला नकळत व्यायाम घडून ती सूक्ष्मपणें काम करूं लागते. तीक्ष्ण होऊन तिखटपणें कर्तृत्व गाजवितें. तिला जणूं धार येते.

' एका मुलानें पाटीवर ओळीनें १ पासून १०० पर्यंत आंकडे काढले तर त्यानें नऊचा आंकडा एकूण किती वेळां काढला ? आमच्या छोट्या बालमित्रानें पाठवलेलें हें कोडें सोडवतां येईल का तुम्हांला ? ' असें नुसतें विचारण्याचा अवकाश, कीं कोडीं सोडवून तीक्ष्णबुद्धि झालेले कित्येकजण कोडें वाचून होतांक्षणींच विचारतील, " काहो, ' छोट्या बालमित्रानें ' ही द्विरुक्ति कशासाठीं ? छोटा म्हणजे बाल नव्हे का ? " यावर आणखी तल्लख बुद्धीचे उत्तरतील, " अहो, छोट्या हें त्यांच्या बालमित्राचें नांव आहे, समजलांत ! " यांवर तिसऱ्यांची कल्पकता धांवेल, " छोटा बाल-मित्र ही द्विरुक्ति नव्हे. बालमित्र म्हणजे बालांचा मित्र. तो मोठाहि असू शकेल वा लहानहि असू शकेल ! आणि तो मोठा नाहीं हें दाख-विण्यासाठीं कदाचित् छोटा हा शब्द वापरला असेल. " यावर चौथे दुधारी बुद्धीचे असतील ते म्हणतील, " अहो, बालमित्र म्हणजे बाल-पणापासूनचा मित्र असाहि अर्थ कां घेऊं नये ? "

या साध्याच उदाहरणांवरून कोड्यांचे द्वारा बुद्धि कशी सर्वगामी होते हें समजून येईल. यथार्थ चित्रण, सूक्ष्म निरीक्षण आणि योग्य पृथक्करण आणि त्यामुळें उलगडा यांची मनाला संवय होते. तारतम्यज्ञान, विविध दृष्टि आणि कल्पकता यांची वाढहि कोड्यांच्या द्वारा होते, असें म्हटलें तर अप्रस्तुत होणार नाहीं. प्रस्तुत संग्रहांतील कांहीं कोडीं माझ्या भावंडांनीं, तर कांहीं मीं स्वतः रचिलीं आहेत हें सांगण्यास आनंद वाटतो.

वेदांतील कूटें, महाभारतांतील यक्षप्रश्न, जनक-अष्टावक्र संवाद, अष्टावक्र-बंदी संवाद, अनेक कवींनीं रचलेले कूटप्रश्न, अनेक राजसभांत प्रसिद्धि पावलेल्या समस्या आणि माजघरांतील उखाणे या द्वारा आपल्याला कोड्यांची पुष्कळच प्राचीन ओळख आहे. आतां अधीर वाचकांचा अधिक वेळ न घेतां या कोड्यांच्या संग्रहाचें द्वार त्यांना उघडें करून देतों. कारण, वाचकांना विरंगुळा लाभला, कीं पुस्तककर्त्याला सारें सारें मिळालें.

—संग्राहक

★ निवडक नमुनेदार कोडीं

★ चुरचुरीत चटकदार चुटके

★ आंकड्यांच्या आकर्षक मौजा

★ दिग्मूढकारी दृष्टिभ्रम

★ कुंठित करणारे कूटप्रश्न

★ बहुश्रुतपणाची कसोटी

★ अष्टपैलू ज्ञानाची चांचणी

★ आणखी कितीतरी करमणूक

★ **साऱ्यांचा सर्वांगसुंदर संग्रह**

फसाल

बरं

का !



॥ सं नः शिशीहि भुरिजोरिव क्षुरं रास्व रायो विमोचन ॥

—ऋ. ८।४।१६

अर्थः—मुक्त करणाऱ्या परमेश्वरा नापितांच्या स्कंधावरील वस्तऱ्याप्रमाणें तूं आम्हांला तीक्ष्णबुद्धि कर.

[ पुढील सारे प्रश्न तोंडीच सोडवावयाचे आहेत. उपवासाचे दिवशीं भात खाल्ला तर जसें उपवासाचें माहात्म्यच नाहींसें होऊन पुण्य मुळींच पदरांत पडत नाहीं, तद्वतच पुढील तोंडी प्रश्नांसाठीं जर लेखनसाधनांचा उपयोग कराल तर तुमचें शहाणपण खरें कसाला लागणार नाहीं. म्हणून या परीक्षेंत हातावर बोटानें करावयाच्या आंकडेमोडीलासुद्धां कडक प्रतिबंध आहे.


दुसरी गोष्ट वेळेसंबंधीं—प्रत्येक प्रश्नाच्या प्रारंभीं तो सोडविण्यास किती वेळ आवश्यक आहे तो दिला आहे. (कोडें वाचण्यासाठीं लागणारा वेळ

त्यांत धरलेला नाहीं.) दिलेल्या वेळेपेक्षां अधिक वेळ लागल्यास तुमचे गुण उणे करावे लागतील आणि दिलेल्या वेळेच्या तिपटीपेक्षां अधिक वेळ घेऊन उत्तर बरोबर आल्यास त्यास केवळ शून्यच गुण मिळतील. म्हणून दिलेल्या वेळांत उत्तर देण्याचा अधिकांत अधिक यत्न झाला पाहिजे.]

१ ( वेळ–पाव मिनिट

एकपूर्णांक एकएकांश म्हणजे किती ?

२ ( वेळ–अर्धं मिनिट



रामभाऊंनीं बाजारांतून एक घड्याळ विकत आणलें. घड्याळ मोठें सुबक आणि सुलक्षणी होतें. त्यांच्या पत्नीनें विचारलें, "केवढ्याला घेतलं घड्याळ ? किती मोल पडलें ?" त्यावर रामभाऊ उत्तरले, "साठ रुपये आणि अर्धी किंमत" तर घड्याळाची किंमत किती ?

३ ( वेळ–अर्धं मिनिट

एका पेटींत सहा लहान पेट्या आहेत आणि या लहान पेट्यांत प्रत्येकीं आणखी सहा सहा पेट्या आहेत. तर एकूण सर्व मिळून किती पेट्या आहेत ?

४ ( वेळ–अर्धं मिनिट

एक बाई म्हणाली, हे 'माझ्या पतीच्या भावाच्या पत्नीच्या नवऱ्याच्या भावाच्या मुलाचे वडील.' तर दोघांचें नातें काय ?

४ ( वेळ–अर्धं मिनिट

४ आणि १६ यांचें जें नातें आहे तसेंच ५ आणि........यांचें आहे. रिकामी जागा खालीलपैकीं एका संख्येनें भरून काढा.

७, ४५, १५, ३०, २५, ४०, १००.

६ (वेळ—एक मिनिट

एक स्त्री व एक पुरुष रस्त्यानें चाललीं असतां त्या स्त्रीच्या एका मैत्रिणीनें त्या पुरुषाकडे पाहून, 'कोण?' असा प्रश्न केला. त्यावर ती स्त्री उत्तरते, 'याची आई माझ्या आईची सासू' तर त्या दोघांचें नातें काय?


७ (वेळ—दीड मिनिट

'करकमळीं जन्मली, सूर्यकमळीं वाढली, पतीविना सती गेली' अशी नार कोणती?

८ (वेळ—एक मिनिट

१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९ या आंकड्यांपैकीं रामूला ८चाच आंकडा न आवडण्याचें एक विशेष कारण आहे. तुम्हीं सांगूं शकाल काय तें?

९ (वेळ—एक मिनिट



वरील चित्रांत दहा नाणीं दाखविलेलीं आहेत. सध्यां त्यांची रचना आहे त्याच्या उलट रचना आम्हांला करून हवी आहे. म्हणजे सध्या वरून खालीं चार, तीन, दोन, एक असा अनुक्रम आहे तो बदलून वरून

खालीं एक दोन, तीन, चार असा अनुक्रम आला पाहिजे. आणि हें सर्व करितांना कोटलीहि तीनच नाणीं केवळ उचलावयाचीं आणि पुनश्च कोठेंहि ठेवावयाचीं अशी अट आहे. मात्र जवळच्या दोन नाण्यांतील अंतर पूर्वीइतकेंच राहावें. पहा प्रयत्न करून.

१० (वेळ—अर्धें मिनिट

वैद्यबुवांनीं गंपूची प्रकृति तपासली आणि प्रत्येक अर्ध्या तासानें एक गोळी घ्या असें सांगून तीन गोळ्या गोपूला दिल्या. तर त्या गोळ्या एकुण किती वेळ पुरतील ?



११ (वेळ—एक मिनिट

'माधव नारायण भट' या नांवाची कोणी व्यक्ति तुम्हांला ठाऊक आहे ?

१२ (वेळ—अर्धें मिनिट

एका घोड्याच्या टांग्याला दोन लांब दांडे असतात, तर दोन घोड्यांच्या टांग्याला किती लांब दांडे असतील ?

१३ (वेळ—पाव मिनिट

१८ या आकड्यांत कोणता लहानांत लहान आंकडा मिळवावा किंवा कमी करावा कीं मग त्याला नऊनें पूर्ण भाग जाईल ?

१४ (वेळ—अर्धें मिनिट

तारेच्या दर दोन खांबांमध्यें १०० फूट अंतर असतें, तर पहिल्या ते दहाव्या खांबापर्यंत किती अंतर असेल ?

१५ (वेळ:–दीड मिनिट

१।२।४।७।११।१६।२२।२९।........

या मालिकेंतील पुढचे दोन आंकडे सांगता का ?

१६ (वेळ:–अर्धें मिनिट



पावसामुळें निसरड्या झालेल्या एका खांबावर एक माकड चढतें आहे. तें प्रत्येक अर्ध्या तासाला ४ फूट वर चढतें आणि २ फूट खालीं घसरतें. खांबाची उंची जर १६ फूट धरली तर त्याच्या शेंड्याला पोहोंचण्यास माकडाला किती वेळ लागेल ?

१७ (वेळ:–अर्धें मिनिट

बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचा बाप कोण ?

१८ (वेळ:–पाव मिनिट

दोन आणि दोनच्या निम्मे किती ?

१९ (वेळ:–पाव मिनिट

शशिकांत श्रीनिवासापेक्षां वेगानें पळतो आणि श्रीपाद शशिकांतापेक्षां वेगानें पळतो, तर सर्वांत हळू कोण पळतो ?

२० (वेळ:–एक मिनिट

‘ पितो बनळी काळी ’ याचें सुसंगत वाक्य करा.

२१ (वेळ:–दीड मिनिट




एक मुलगी आपल्या कडेवरील मुलाकडे बोट दाखवून म्हणते, “ याचा बाप ज्यांचा सासरा, त्यांचा बाप माझा सासरा ” तर परस्परांचे नातें काय ?


२२ (वेळ:–एक मिनिट

दोन आणि दोन मिळून नेहमीं चारच होतात असें म्हणतात. आम्हीं म्हणतों दोन आणि दोन मिळून आणखीमुद्धां कांहींतरी होते, तर तें काय असेल ?

२३ (वेळ:–दीड मिनिट

पुढील चित्रांत वरती सांखळीचे पांच तुकडे दाखविलेले आहेत. त्यांची खालीं दाखविल्याप्रमाणें जोडून एक लांबलचक सांखळी करावयाची आहे. सोनारदादानें हे तुकडे एकत्र गुंफण्यासाठीं पुढीलप्रमाणें भाव सांगितले आहेत. प्रत्येक तोडण्याला दोन पैसे आणि प्रत्येक जोडण्याला दोन पैसे. अर्थात् कमींत कमी किती पैशांत एक सलग सांखळी करतां येईल? आमचा गोपू म्हणतो, चार आणे, तर गंपू म्हणतो, तीन आणे. आमच्या मतें गंपूचें म्हणणें बरोबर आहे. तर तें कसें तें सांगा.





२४ (वेळ:–अर्धें मिनिट

दोन पेरू आणि चार बटाटे मिळून काय होईल?

२५ (वेळ:–एक मिनिट

चार मुलांना परस्पर विरुद्ध चार दिशांना तोंडें करून बसविलें आणि त्यांच्यामध्यें ठेविलेल्या एका लाडवाच्या ताटांतील लाडू त्यांनीं मागें हात न नेतां खाल्ले तर तें कसें तें सांगा. अर्थात् आणखी दुसरें कोणी तेथें आलें नव्हतें हें निश्चित!

२६                (वेळ:–अर्धे मिनिट

एका मनुष्याजवळ एक मेणबत्ती आहे, एक काड्याची पेटी आहे, एक समई आहे, एक 'प्रभाकर' कंदील आहे, एक पणती आहे, एक रॉकेलचा टांगण्याचा दिवा आहे आणि एक गॅसची बत्ती आहे. त्याला रात्रभर प्रकाश हवा असतो हें ठरलेलें आहे. तर वरील गोष्टींपैकीं आधीं तो कोणती गोष्ट पेटवील ?

२७                (वेळ:–अर्धे मिनिट

चार शेर कापूस आणि चार शेर लोखंड अशा एका तराजूच्या दोन वेगवेगळ्या पारड्यांत घातलीं, तर कोणचें पारडें खालीं जाईल ?

२८                (वेळ:–दीड मिनिट

पुढील कवितेचा अर्थ करिता येईल कां तुम्हांला ?

अश्वास पुच्छ ते तीन ।
हत्तीस दंत ते साहा ।
नारीस वस्त्र तें नाहीं ।
श्वानाला शिंग फुटलें ।।

२९                (वेळ:–दीड मिनिट

'उशीत्रापापाही हुडकणादो' हीं अक्षरें व्यवस्थितपणें जुळवून त्यांचें चालू प्रचारांतील एक सर्वमान्य वाक्य करा.

३०                (वेळ:–एक मिनिट

एका खोलींत आंत चार लहान पेट्या असलेली एक पेटी, आंत तीन लहान पेट्या असणारी एक पेटी, आंत दोन लहान पेट्या असणारी एक पेटी आणि आंत एकच लहान पेटी असणारी एक पेटी अशा पेट्या आहेत. तर त्या खोलींत कमींत कमी किती पेट्या असूं शकतील ? आणि अधिकांत अधिक एकूण किती पेट्या असूं शकतील ?

# हंसाल बरं का !



**चित्ते प्रसन्ने भुवनं प्रसन्नं । चित्ते विषण्णे भुवनं विषण्णम् ।**
**अतोऽभिलाषो यदि ते सुखे स्याच्चित्तप्रसादे प्रथमं यतस्व ॥**

'माझ्या मिळकतींतून मीं ५० रु. शिल्लक टाकले आहेत या महिन्याला ? ' —पहिला.

'ठीक, मग माझी एक सायकल विकाऊ आहे. ती कां नाहीं घेत ? मीं देईन ५० ला. तुला सायकलवर बसून तुझ्या शेतावर पण जातां येईल मग आरामांत ! ' —दुसरा.

' हो, पण मीं ५० रु. ची एक गाय घेणार आहे.' —पहिला.

' वाहवा ! पण गाईवर बसून तूं शेतावर जाऊं लागलास तर मूर्खपणा नाहीं का होणार ? ' —दुसरा.

' आणि कारे, मीं सायकलचे दूध काढूं लागलों तर तो काय कमी मूर्खपणा ठरणार आहे ? ' —पहिला.

—×—

लांबलचक प्रेतयात्रा पाहून रस्त्यानें जाणाऱ्या एका मुलाला एकजण विचारतो, " कोण वारले हो ? "

" तो तिरडीवरचा माणूस ! "

—×—

" तुमची गाय हरवली आहे तर वर्तमानपत्रांत तशी जाहिरात कां नाहीं देत ? "

" खुळ्या, अरे गाईला का वाचतां येणार आहे ? "

—×—

" गोविंदा, धाकटा बाळू कां रे रडतो आहे ? "

" आई, तूं त्याला दिलेला पेरू कसा खायचा तो मीं त्याला खाऊन दाखवला ग फक्त ! "

—×—

आमच्या घरच्या काकू आणि त्यांच्या आप्तपरिचित बायका सर्वजणी एका मोटारीमधून पर्वतीला निघाल्या. मोटारींत खूपच खेंचाखेंच झाली होती. तेव्हां एक वृद्ध आजीबाई उद्गारल्या, ' काय दाटी झाली ही ! मग त्यापेक्षां तुमच्या ड्रायव्हरला पायींच कां नाहीं देत पाठवून पुढें ? म्हणजे जरा जागा तरी होईल थोडी."

—×—

बडोदें गांवीं बरोबर १२ वाजतां नियमितपणें तोफ उडवीत. एक परगांवचा मनुष्य त्या वेळीं तेथें होता. तोफ उडाल्यानंतर त्यानें तोफ-वाल्याला विचारलें, " काय हो, तुम्ही तोफ उडवितां त्या वेळीं १२ वाजल्याचें नेमकें तुम्हांला कसें कळतें ?" तोफवाला उत्तरला, "त्याचे असें पहा, माझ्या येण्याच्या वाटेवर पोलीसचौकी आहे. येतांना मीं तेथील घड्याळाप्रमाणें माझें घड्याळ अचूकपणें लावून मग कामावर येतो. त्यामुळें कधीं चूक होत नाहीं."

तो परगांवचा मनुष्य रस्त्यानें थोडा पुढें गेल्यावर चौकीपाशीं आला. चौकीपाशीं आल्यावर तो तेथील शिपायास म्हणतो, " काय जमादार-

साहेब, तुमच्या चौकींतलें घड्याळ अगदीं अचूक असतें म्हणतात."

चौकीदार उत्तर करतो, "हें काय विचारतां राव! नेहमीं बाराच्या तोफेप्रमाणें घड्याळ लावून घेतों आम्ही. मग अर्थात् तें नियमित अचूक वेळच दाखविणार!"

—×—

बाबू:—आई, त्या गणूनें मास्तरांनीं तपासून आणलेल्या पेपरावरचे दोनाचे पांच केले; पण मास्तरांनीं त्याला नेमका पकडला.

आई:—हं मूर्खच तो! पण तूं नाहीं ना तसें कधीं करणार?

बाबू:—छे: छे आई मीं दोनाचे फार तर तीन करीन.

—×—

मास्तरांनीं उत्तरपत्रिका (पेपर्स) तपासून आणल्या. प्रत्येक उत्तर-पत्रिकेच्या वरच्या पानावर शेरे दिलेले होते. एक मुलगा मास्तरांकडे येऊन विचारतो, "सर, मला हा काय शेरा दिला आहे, कळत नाहीं." मास्तर बराच वेळ त्या शेऱ्याकडे पाहून उत्तरले, "हा होय? अरे, हा शेरा असा आहे, कीं गिचमीड अक्षर काढूं नये."

—×—

पति (पत्नीस):—अजून झाला नाहीं स्वयंपाक? हा मी चाललों खानावळींत!

पत्नी (पतीस):—असं काय पण! एक दोनच मिनिटं थांबा कीं.

पति:—कां! दोन मिनिटांत स्वयंपाक होईल वाटतं?

पत्नी:—नाहीं. तसं नव्हे; म्हणजे मी पण चांगलं लुगडं नेसून येईन तुमच्याबरोबर तिकडेच.

—×—

गोविंदानें पेरूचे दोन भाग करून ते लहानग्या अरविंदापुढें धरले. अरविंदानें त्यांतला नेमका भाग उचलला. त्यावर गोविंदा साळसूद-पणानें म्हणतो, "माझ्यापुढें जर कोणी असे दोन भाग ठेविले असते तर मीं बुवा लहान भागच घेतला असता."

त्यावर अरविंद म्हणतो, "तुझ्या इच्छेप्रमाणें तुला लहानच भाग मिळाला आहे कीं, मग उगाच आणखी प्रवचन कशाला आतां ?"

—×—

"देवा, हिंदुस्थानची राजधानी नागपूर कर ! देवा, हिंदुस्थानची राजधानी नागपूर कर !" अशी छोट्या गोपूची प्रार्थना ऐकून मी विस्मित झालों आणि त्याला विचारलें, "का रे गोपू, असें कां व्हावेंसें वाटतें तुला ?"

गोपू उत्तरतो, "काल्च्या भूगोलाच्या पेपरांत मीं तसें लिहून गेलों आहे म्हणून हो !"

—×—

"प्रथम तो मला चक्क घरांतला कारकूनच समजला. पण मग मीच मालक असें कळल्यावर त्यानें क्षमा मागितली." –पहिला.

"मग कारकुनाचें समाधान झालें ना आतां ?"–दुसरा.

—×—

गिऱ्हाईकः–(दुकानदारास) या तुमच्या ६ रुपये वाराच्या कापडांत आणि ६॥ रु. वाराच्या कापडांत कांहीं फारसा फरक नाहीं हो वाटत !

दुकानदारः–फारसा नाहीं. केवळ ८ आण्यांचाच फरक आहे साहेब !

—×—

छगनशेट मारवाडी रस्त्यानें जात असतांना एका भामट्यानें त्यांच्या खिशांतील सोन्याच्या घड्याळाला हात घालून तें लांबविण्याचा यत्न केला. परंतु शेटजींच्या तें ध्यानांत आलें आणि त्याला ते धरून ठेवण्याचा प्रयत्न करूं लागले. दोघांची झोंबाझोंबी चालू झाली आणि त्याच वेळीं शेटजी मोठमोठ्यानें ओरडून त्या भामट्याच्या चोरीचा पुकारा करूं लागले. अर्थात् रस्त्यांतील इतर कांहीं माणसें त्यांच्या साहाय्यास आली आणि सर्वांनीं मिळून त्या भामट्यास पकडलें. अनेकांनीं त्याला यथास्थित 'प्रसाद' दिला. त्याला खूपसा बडविल्यावर शेटजी म्हणाले, 'जा येथून,

तोंड काळें कर. एक वेळ तुझी गय करतों आणि तुला पोलिसच्या स्वाधीन करीत नाहीं.'

इतकें होईपर्यंत हा सर्व प्रकार पाहण्यास अनेक बघ्यांची गर्दी झाली. त्यांत दुसरा एक भामटा होता. शेटजींनीं पहिल्या भामट्याला हांकलून दिल्यावर तो खालीं मान घालून आपल्या वाटेला लागला. तो बराच पुढें गेल्यावर या दुसऱ्या भामट्यानें त्याला गांठलें आणि म्हटलें, 'काय गड्या, भामटेगिरीच करायची ती कशी शिताफीनें केली पाहिजे ! सोन्याचें घड्याळ चोरायला हरकत नाहीं; पण असें पकडलें जाणें ही तोंडाला व धंद्याला काळिमा फासणारी गोष्ट आहे हें निश्चित !'

त्यावर पहिला भामटा उत्तर करतो, "अरे बाबा, मला सोन्याचें घड्याळ चोरायचेंच नव्हतें. हें पाहा, शेटजींच्या खिशांतलं पाकीट. त्यांत अडीच हजार रुपये आहेत. मग आतां मीं जिंकली कीं नाहीं सांग. या पाकिटासाठींच तो उपद्व्याप होता बाबा !"

## उलट सुलट कसेंहि वाचा !

'शिपायापाशीं'

'चिमा काय कामाची'

'वाढवा समास वाढवा'

'रभा चांभार'

'रामाला भाला मारा'

'ती होडी जाडी होती'

'तो गजानन जागतो'

# चुकूं नका वरं का !

## तुमच्या बहुश्रुतपणाची कसोटी

### सत्य कीं असत्य तें सांगा

केल्यानें देशाटन, पंडित मैत्री, सभेंत संचार ।
शास्त्रग्रंथ विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ।। सुभाषित

(१) कुत्र्याला मुख्यतः पायाच्या तळव्यांना घाम येतो.

(२) हिरे जळतात.

(३) इंद्रधनुष्यांत सर्व प्रकारचे रंग असतात.

(४) चलनी नोटांचे तुकडे झाल्यास त्याचे पैसे वाया जातात.

(५) डांसांपैकीं फक्त माद्या तेवढ्या आपल्याला चावतात.

(६) पाण्यानें कांठोकांठ भरलेल्या पातेल्यांत एक बर्फाचा मोठा तुकडा तरंगत आहे. आतां ज्यावेळीं हा तुकडा पूर्णपणें वितळेल त्यावेळीं पातेल्यामधील थोडेंसें पाणी खालीं सांडेल.

(७) उंटाच्या मदारीमध्यें त्याच्या पाठीच्या मणक्यांपैकीं तीन हाडें असतात.

(८) सूर्यापासून निघालेला प्रकाश पृथ्वीवर येऊन पोंहोंचण्यास तीन तास सतरा मिनिटें लागतात.

(९) कोळशाच्या खाणींत पुष्कळदां कामाच्या आरंभीं प्रथमतः खालीं जातांना पिंजऱ्यांत घातलेला एक छोटासा पक्षी साधारणतः बरोबर घेऊन जातात.

(१०) सायीचें वजन दुधापेक्षां अधिक असतें.

(११) कोठल्याहि दोन माणसांच्या आंगठ्याचे ठसे सारखे असूं शकत नाहींत.

(१२) बर्फासारखें थंड पाणी त्याचवेळीं उकळत असण्याची शक्यता आहे.

(१३) विषुववृत्ताच्या आसपास उष्णतेमुळें बर्फ पडूं शकत नाहीं.

(१४) उन्हाळ्यांत दिवस लहान होतात आणि रात्री मोठ्या असतात.

(१५) सदैव पाण्यांत वावरणारे मासे जेव्हां झोंप घेतात तेव्हां आपल्या सारखेच डोळे मिटतात.

(१६) हत्तीची शेंपटी चांगली केसाळ असते.

(१७) कांट्यानें कांटा काढणें हें होमिओपॅथीचें मुख्य तत्त्व आहे.

(१८) खडबडीत भांड्यापेक्षां गुळगुळीत भांड्यांत पाण्याला लवकर उकळी येते.

(१९) मुंगी वा मधमाशी माणसाला एकदां चावली की ती स्वतः नंतर थोड्याच वेळांत मरते.

(२०) अपवाद म्हणजे नियमानें स्वतःच्या चुकीसाठीं काढलेली पळवाट होय.

(२१) एकदां पडलेल्या ठिकाणीं पुन्हां वीज पडत नाहीं.

(२२) नेहमींच्या साध्या शिसपेन्सिलीनें ५० मैल लांबीची रेघ काढतां येते.

(२३) सर्वांत उंच असणारा हिमालय पर्वत जर पॅसिफिक महासागरांतील सर्वांत खोल ठिकाणीं ठेवला तर हातांत धरावयाच्या काठी एवढेंच (साधारणतः २॥ फूट) त्याचे शिखर फक्त पाण्याच्या वरती दिसेल.

(२४) एका रेडिओवर मोठ्या १४०० फूट लांबीच्या सभागृहांत चालणारे एका विख्यात पुढाऱ्याचें भाषण त्या सभागृहाचे शेवटाला बसून ऐकणाऱ्या माणसापेक्षांहि आधीं मी पुण्यास ऐकले.

(२५) सूर्याच्या पृष्ठभागावर उकळत्या पाण्याच्या ७०० पट नि अंतर्भागांत उकळत्या पाण्याच्या २००० पट उष्णतामान असतें.

(२६) वाफ अदृश्य असते.
(२७) होकायंत्राचा काटा उत्तर-ध्रुवाची दिशा दाखवितो.
(२८) पहांटेची वेळ दुखणेकऱ्याच्या प्रकृतीला अधिक त्रासदायक असते,
(२९) १५७५००००००००००००००००००००० मेणबत्त्या लावल्यानें जेवढा प्रकाश पडेल तेवढा सूर्याच्या पृष्ठभागावर असतो.
(३०) जगामध्यें इंग्रजी भाषा सर्वांत अधिक बोलली जाते. कारण अमेरिका नि ब्रिटिश साम्राज्य यांत तीच चालू आहे.
(३१) मृत समुद्र हा सर्वांत छोटा समुद्र आहे.
(३२) चंद्राचा निम्मा पृष्ठभाग पाण्यानें भरलेला आहे.
(३३) एकाद्या लष्करी पेशांत असणाऱ्या माणसाकडून त्याचे लष्करी कपडे विकत घेणें हा गुन्हा आहे.
(३४) जपानमध्यें फुटक्या नि मोडक्या बाहुल्या शाळेच्या अंगणांत समारंभानें पुरतात.
(३५) खेकड्याला मागें नि पुढें पोहतां येतें.
(३६) आवाज न होतां स्फोट होणें शक्य आहे.
(३७) जगांत सर्वांत अधिक दारू इटलीमध्यें पैदा होते.
(३८) १ जानेवारी १९०० हा विसाव्या शतकाचा प्रारंभदिन होय.
(३९) एकादा पक्षी पुढें उडत जात असतांनाहि मागें जाणें शक्य आहे.
(४०) सहा फूट व्यासाच्या बुचाच्या चेंडूचें वजन ६०० शेरांपेक्षांहि अधिक असतें.
(४१) उडणारी माशी पटईवर उलटी कशी काय बसते नि गुरुत्वाकर्षणानें खालीं कां येत नाहीं हा शास्त्रज्ञांना अद्याप समाधानकारकपणें न सुटलेला व विवाद्य होऊन राहिलेला प्रश्न आहे.
(४२) मोटार अधिक वेगानें चालविली तरी पेट्रोल अधिक खपत नाहीं.
(४३) पोस्टाच्या तिकिटावरील शिक्का पुसून तें पुनश्च टपालासाठीं वापरणाराला २ वर्षें सक्तमजुरीची शिक्षा होते.

(४४) पाण्यांतील माशांच्या अनेक जातींत आई पिलाला केवळ जन्म देते बाकी सर्व काळजी घेणें नि निगा राखणें हें काम बापच करतो.

(४५) वटवाघुळें गडद अंधकारांत केवळ कानाच्या मदतीनें वाट चालतात नि अचूकपणें ठरलेल्या स्थळीं परत येतात.

(४६) हत्तीला जडपणामुळें मुळींच पोहतां येत नाहीं तर उंट लांब पाया-मुळें उत्तम पोहूं शकतात.

(४७) आवाजाची गतीं हवेपेक्षां पाण्यांत अधिक असते.

(४८) एकादा माणूस एकसारखे नाकासमोर थेट सरळ रेषेंत चालत राहिला तरीसुद्धां उलट दिशेला जाऊं शकतो.

(४९) रोगाचा प्रतिकार करण्याची शक्ती कमी वजनाच्या माणसांत कमी नि अधिक वजनाच्या माणसाच्या ठायीं अधिक असते.

(५०) आपल्या मेंदूची उजवीकडील बाजू आपल्या शरीराची डावीकडील बाजू संभाळण्याचें काम करतें.



फसाल

बरं

कां !



**उत प्रबर्धया मतिम् ॥** ऋ. ८।६।३२

परमेश्वरा ! माझी बुद्धि उज्ज्वल होऊन वाढो.

[ या प्रकरणांतील प्रश्न सोडविण्याच्या पद्धतीसंबंधीं व वेळेसंबंधीं पूर्वीं दिलेल्या सूचना लक्षांत घेऊन मगच हे प्रश्न सोडवावयास घ्यावेत. ]

३१ (वेळः—एक मिनिट

पुण्याहून मुंबई १२० मैल आहे. पुण्याहून एक मोटार ताशीं ४० मैल वेगानें निघाली, आणि मुंबईहून त्याच वेळीं एक मोटार ताशीं ३० मैल वेगानें निघाली. ज्या वेळीं दोन्ही मोटारी एकत्र येतील; त्या वेळीं कोणती मोटार पुण्याहून अधिक लांब असेल ?

३२ (वेळः—अर्धे मिनिट

हिरा हळूच पाण्यांत सोडल्याबरोबर काय होईल प्रथम ? नीट विचार करून उत्तर द्या हं !

३३ ( वेळ—एक मिनिट

" का रे, तुमचे काका इतके श्रीमंत आणि, तुम्हीं असे कां ? "


"अहो, त्याचें असें झालें कीं, माझे काका पडले माझ्या सख्ख्या आजोबांचे एकुलते एक पुत्र. अर्थात् सारी मिळकत त्यांनाच मिळाली मग ! सरळच आहे."

या संवादांत कांहीं चुकल्यासारखें वाटतें का ?—काय ?

३४ (वेळ—अर्धे मिनिट

पाय आहेत पण चालतां येत नाहीं. हात आहेत पण काम करतां येत नाहीं असें कोण ? (अर्थात् जिवंत प्राणी नव्हेच निश्चित.)

३५ (वेळ—अर्धे मिनिट




वर दिलेल्या चित्रांतील एका चौरस बागेभोंवतीं चारहि बाजूंना रस्ता आहे. अर्थात् चारहि रस्ते सारखेच लांबीचे आहेत. एका मनुष्याला 'अ—आ' अंतर चालण्यास ७५ मिनिट लागतात, 'आ—इ' अंतर जाण्यास ७५ मिनिटें लागतात. 'इ—ई' अंतर जाण्यास ७५ मिनिटें लागतात. 'ई—अ' रस्त्यावर एक दारुगुत्ता आहे. तो बंद आहे आणि 'आज सर्व दिवस गुत्ता बंद राहील' अशी बाहेर पाटी आहे. पण 'ई-अ' अंतर जावयास मात्र त्यास सव्वा तास लागतो. कां तें सांगा ?

ओळखा ३६ (वेळ—एक मिनिट

तीन पायाची सुंदर राणी । एकसांधी गोजिरवाणी ।
वास तीचा ठिकठिकाणीं । खाते लांकूड पिते पाणी ॥

३७ ( वेळ–एक मिनिट

'कोठूनसा आला नि भुईवर पडला, कानाकोपरा फिरला पण हातीं नाहीं लागला.' याचें उत्तर काय असेल बरें ?

३८ ( वेळ–एक मिनिट

कुठें आहे चूक ? :—१ रु. = १६ आणे.

= ४ आणे × ४ आणे.

$= \frac{१}{४}$ रु. × $\frac{१}{४}$ रु.

$= \frac{१}{१६}$ रु.

= १ आणा.

म्हणजे १ रु. = १ आणा. सांगा कोठें आहे चूक ?

३९ ( वेळ–अर्धे मिनिट

दोन वर्षांपूर्वी श्रीकांत जेवढा मोठा होता तेवढाच आज गोविंदा मोठा आहे वयानें. मग दोघांत मोठा कोण ?

४० (वेळः–एक मिनिट

मला पर्वतीस जातांना समोरून येणारे पांच मावळे भेटले. त्या प्रत्येकासमवेत प्रत्येकाची बायको होती आणि प्रत्येक बायकोच्या कडेवर एक एक मूल होतें आणि प्रत्येक मुलाजवळ एक एक मांजराचें पिल्लू होतें. तर पर्वतीला किती प्राणी जात होते.

४१ ( वेळ–अर्धे मिनिट

एका छत्रींत तिघेजण चालले आहेत. एकजण मध्यें आहे आणि दोघेजण दोन बाजूला आहेत. तर तिघांपैकीं सर्वांत अधिक कोण भिजेल ?

४२ ( वेळ–अर्धे मिनिट

एका माणसानें खणलेल्या खड्ड्यांत–ज्याची लांबी चार फूट, रुंदी तीन फूट आणि खोली दोन फूट आहे–एकूण किती घनफूट माती असेल तें सांगा ?

४३ (वेळ:—एक मिनिट

बिस्किटांचे पांच पुडे, पांच मुलें पांच दिवसांत खातात, तर शंभर मुलांना शंभर दिवसाला किती पुडे लागतील? सांगा चटकन्!

४४ (वेळ:—एक मिनिट

पांच दिवसांत, पांच मुलें पांच बिस्किटांचे पुडे खातात, तर शंभर पुडे शंभर दिवसांत किती मुलांना पुरतील? लवकर!

ओळखा ४५ (वेळ:—एक मिनिट

मम डोकें कापा जाइन वीरपाटी।
मम मध्य तोडितां नेत्राला आडकाठी॥
मम पाद तोडितां येइन तुमच्या डोकीं।
मी पुष्प-भाग, तरि सांगा नांव आता कीं॥

४६ (वेळ:—एक मिनिट

चंद्रकांताचा एक मित्र त्याला म्हणाला, 'हें पहा चंद्रकांत, तूं मला दहा रुपये देतोस का उसनवार?' त्यावर चंद्रकांत उत्तरला, 'हो, देतों' त्यावर त्याच्या मित्रानें पुनश्च उत्तर केलें, 'हें पहा, पण सध्यां मला त्यांपैकीं पांचच रुपये दे. म्हणजे असें पहा, मी तुझे पांच रुपये द्यायचे राहतील आणि तूंहि मला पांच द्यायचे राहतील म्हणजे फिटंफाट झाली. पुन्हां देणें घेणेंच नको!'

कुणालाहि पटेल त्याचें हें म्हणणें नाहीं कां?

४७ (वेळ:—एक मिनिट


मराठ्यांच्या इतिहासकाळांत वेळोवेळीं होऊन गेलेलीं आणि ज्यांचें नांव 'बाळाजी' असें होतें अशीं पांच माणसें तुम्हांला सांगतां येतात का पहा.

४८ (वेळ:—दोन मिनिटें

अशा कोणत्याहि दोन संख्या सांगा कीं, ज्यांची बेरीज आणि गुणाकार सारखाच येईल. [अर्थात् २+२ आणि २×२=४ हें उत्तर वगळून मात्र.]

४९ ( वेळ–दोन मिनिटें

आमच्या एक मजली चाळीमध्यें ओळीनें खोल्यांना क्रमांक दिलेले आहेत. आणि आमच्या खोलीचा क्रमांक असा आहे कीं, आमच्या डाव्या बाजूच्या क्रमांकांची बेरीज नेमकी आमच्या उजव्या बाजूच्या क्रमांकांच्या बेरजेइतकी होते. तर आमच्या चाळींत खोल्या किती ? आणि आमच्या खोलीचा क्रमांक किती ?



५० ( वेळ–अर्धें मिनिट

मीं जागा झालों त्या क्षणीं मीं घड्याळाचा एक ठोका ऐकला, पुनश्च अर्ध्या तासानें एक ठोका ऐकला, पुनश्च अर्ध्या तासानें एक ठोका ऐकला, आणि पुनश्च अर्ध्या तासानें एक ठोका ऐकला. तर मीं केव्हां जागा झालों ?

२८ (वेळः–दीड मिनिट

आमचा गोविंदा म्हणजे मुलखाचा आळशी विसराळू आणि लहरी ! एका रविवारीं त्याला आपल्या एका मित्राला पत्र लिहिण्याची लहर आली. रविवारीं टपालकचेरी बंद असल्या-मुळें २ आण्याचें पाकीट पानपट्टीवाल्याकडून त्यानें ९ पैशाला विकत घेतलें. 'ताबडतोब इकडे ये' अशा अर्थाचें पत्र लिहून त्यानें पाकीट चिकटवून ठेविलें. पण विसराळूपणामुळें त्या दिवशीं तें न टाकतां सोमवारीं त्यानें तें टपालांत टाकलें, त्यानंतर आपल्या मित्राचें येणें अद्याप झालें नाहीं याची त्याला पुढल्या रविवारीं आठवण झाली. पुनश्च नऊ पैशाला एक पाकीट घेऊन त्यानें पत्र लिहिलें; आणि विसरून पुनश्च तो सोमवारीं टपालांत टाकण्यास गेला. त्या वेळीं मित्राचा पत्ता योग्य

आहे कीं नाहीं याविषयीं साशंक झाल्यामुळें त्यानें तें पत्र ४ आणे खर्च करून रजिस्टर करून पाठविलें. पत्र पाठवून घरीं येतो न येतो तोंच त्याचा मित्र दारांत येऊन उभा ! तेव्हां आतां सांगा कीं आळसामुळें, विसराळूपणामुळें वा योगायोगामुळें आणि लहरीपणामुळें त्याचा एकूण तोटा किती झाला ? गोविंदानें हिशेब केला तो असा—२ पैसे रविवारीं दोन्हीं पाकिटें घेतल्यामुळें + ४ आणे रजिस्टर–खर्च + ९ पैसे पाकिटाचे (मित्र परत आल्यामुळें) = ६।।। आणे. तुम्हांला काय वाटतें ?

५२ (वेळ:–अर्धं मिनिट

तीन आण्याचा कितवा भाग दोन आण्याच्या एक तृतीयांश आहे ? बोला लवकर !

५३ (वेळ:–अर्धं मिनिट

आमचा एक मित्र पुढील चमत्कारिक विधान करीत असतो. "तुम्हीं नऊ आण्याचें बिल दोनच नाण्यांत द्या. परंतु त्यापैकीं एक नाणें चांदीचें असतां कामा नये." तुम्ही त्याचें समाधान करूं शकता कां ?

५४ ( वेळ–एक मिनिट

एका शेतांत दहा माणसें काम करीत होतीं. थोड्या वेळानें तेथें आणखी चार माणसें आलीं. तेव्हां पूर्वीच्या काम करणाऱ्या दहा माणसांपैकीं एकजण म्हणाला कीं, "आपण आतां सोळाजण झालों." तो हें कां म्हणाला याचें कारण तुम्हांला देतां येईल कां पहा.

५५ (वेळ:–अर्धं मिनिट

चार दिवसांत चार मुलें चार बिस्किटांचे पुडे खातात, तर एक मुलगा एक पुडा किती दिवसांत खाईल ?

५६ (वेळ:–दोन मिनिटें

आपल्या मृत्युपत्रांत एका माणसानें असें लिहिलें होतें कीं, "माझ्या बायकोला मुलगा झाल्यास मुलाला दोन तृतीयांश भाग मिळावा, आणि

बायकोला एक तृतीयांश मिळावा. मुलगी झाला तर बायकोला दोन तृतीयांश मिळावा आणि मुलीला एक तृतीयांश मिळावा." योगायोगानें बाईला जुळें झालें आणि त्यांत एक मुलगी आणि एक मुलगा होता. तर त्यांच्या १४ लाख रुपये मिळकतीची वांटणी कशी कराल ?

५७                    ( वेळ—अर्धे मिनिट

आपली एकादी वस्तु हरवली म्हणजे आपण ती शोधूं लागतों. आमचा प्रश्न असा कीं, ज्या ठिकाणीं ती वस्तु आपणांस सांपडते त्या ठिकाणीं आपण सर्वांत शेवटींच कां पाहतों ?

५८                    ( वेळ—एक मिनिट

खालील वाक्यांतून कांहीं अर्थ काढतां येईल का तुम्हांला ?

लेंप छाकस्त पुतन्या खाप छा

हे आटेंकु ना खाप छा

५९                    (वेळः—एक मिनिट

१ मैल लांब तार चार एकर शेत गुंडाळते, तर दोन मैल तार किती एकर शेत गुंडाळील ?

६०                    (वेळः—एक मिनिट

एका टोपलींत दहा पेरू होते. ते दहा मुलांत सारखे वाटले; आणि तरी सुद्धां टोपलींत एक पेरू होता, तर हें कसें ?

# आंकड्यांच्या मौजा

ज्ञानं च लोके यदिहास्ति किंचित् ।
संख्यागतं तच्च महान् महात्मन् ॥ —महाभारत

अर्थ:—हे महात्म्या, या जगांत जर कांहीं ज्ञान असेल तर त्यापैकीं बरेंच आंकड्यांनीं भरलेलें आहे.

—×—

(१)

१×९+२=११
१२×९+३=१११
१२३×९+४=११११
१२३४×९+५=१११११
१२३४५×९+६=१११११११
१२३४५६×९+७=११११११११
१२३४५६७×९+८=१११११११११
१२३४५६७८×९+९=११११११११११

(२)

तसेंच

९×९–१=८
९×२१–१=१८८
९×३२१–१=२८८८
९×४३२१–१=३८८८८
९×५४३२१–१=४८८८८८
९×६५४३२१–१=५८८८८८८
९×७६५४३२१–१=६८८८८८८८
९×८७६५४३२१–१=७८८८८८८८८

(३)

१×८+१=९

१२×८+२=९८

१२३×८+३=९८७

१२३४×८+४=९८७६

१२३४५×८+५=९८७६५

१२३४५६×८+६=९८७६५४

१२३४५६७×८+७=९८७६५४३

१२३४५६७८×८+८=९८७६५४३२

१२३४५६७८९×८+९=९८७६५४३२१

तसेंच

(४)

९×९+७=८८

९×९८+६=८८८

९×९८७+५=८८८८

९×९८७६+४=८८८८८

९×९८७६५+३=८८८८८८

९×९८७६५४+२=८८८८८८८

९×९८७६५४३+१=८८८८८८८८

९×९८७६५४३२+०=८८८८८८८८८

(५)

३७×३३३=१२३२१

३७×३३३३=१२३३२१

३७×३३३३३=१२३३३२१

३७×३३३३३३=१२३३३३२१

३७×३३३३३३३=१२३३३३३२१

३७×३३३३३३३३=१२३३३३३३२१

३७×३३३३३३३३३–१२३३३३३३३२१

३७×३३३३३३३३३३=१२३३३३३३३३२१

३७×३३३३३३३३३३३=१२३३३३३३३३३२१

(६)

१५३८४६×१३=१९९९९९८

२३०७६९×१३×२९९९९९७

३०७६९२×१३=३९९९९९६

३८४६१५×१३=४९९९९९५

४६१५३८×१३=५९९९९९४

५३८४६१×१३=६९९९९९३

६१५३८४×१३=७९९९९९२

६९२३०७×१३=८९९९९९१

(७)

१२३४५६७९×९=१११११११११

२४६९१३५८×९=२२२२२२२२२

३७०३७०३७×९=३३३३३३३३३

४९३८२७१६×९=४४४४४४४४४

६१७२८३९५×९=५५५५५५५५५

७४०७४०७४×९=६६६६६६६६६

८६४१९७५३×९=७७७७७७७७७

९८७६५४३२×९=८८८८८८८८८

१११११११११×९=९९९९९९९९९

(८)

१५८७३×७=१११११११

३१७४६×७=२२२२२२

४७६१९×७=३३३३३३

६३४९२×७=४४४४४४

७९३६५×७=५५५५५५
९५२३८×७=६६६६६६
१११११×७=७७७७७७
१२६९८४×७=८८८८८८
१४२८५७×७=९९९९९९

(९)

९८७६५४३२१×९=८८८८८८८८८९
९८७६५४३२१×१८=१७७७७७७७७७८
९८७६५४३२१×२७=२६६६६६६६६६७
९८७६५४३२१×३६=३५५५५५५५५५६
९८७६५४३२१×४५=४४४४४४४४४४५
९८७६५४३२१×५४=५३३३३३३३३३४
९८७६५४३२१×६३=६२२२२२२२२२३
९८७६५४३२१×७२=७११११११११११२
९८७६५४३२१×८१=८०००००००००१

(१०)

पंचेचाळीस उणे पंचेचाळीस बरोबर पंचेचाळीस !

|  |  |  |
|---|---|---|
|  | ९ ८ ७ ६ ५ ४ ३ २ १ | एकूण आंकड्यांची बेरीज ४५ |
| − | १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ | ,, ,, ,, ४५ |
|  | ८ ६ ४ १ ९ ७ ५ ३ २ | एकूण आंकड्यांची बेरीज पुन्हा ४५ |

(११)

१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ० हे सर्व आंकडे एकच वेळ वापरून एकच ९ हें उत्तर काढलेलें आहे.

$$९=\frac{९७५२४}{१०८३६}=\frac{९५८२३}{१०६४७}=\frac{९५७४२}{१०६३८}$$

शून्य न उपयोजितां

$$९=\frac{७५२४९}{८३६१}=\frac{५८२३९}{६४७१}=\frac{५७४२९}{६३८१}$$

(१२)

तसेंच पुढच्या प्रत्येक समीकरणांत १ ते ९ हे सर्व आंकडे एकदांच वापरले आहेत.

(१) ४×१७३८=६९७२
(२) १२×४८३=५७९६
(३) २७×१९८=५३४६
(४) ३९×१८६=७२५४
(५) ४×१९६३=७८५२
(६) १८×२९७=५३४६
(७) २८×१५७=४३९६
(८) ४२×१३८=५७९६

(१३)

३१२×२२१=६८९५२

आणि हेच सर्व आंकडे उलटे मांडले तरीहि—

३१३×१२२=२५९८६

फसाल

बरं

कां !



**विचारोदयकारिण्या धिया व्यवहरन्ति ये**
**फलानामत्युदाराणां भाजनं हि भवन्ति ते ।** यो. वा. २।१४।१२

विचार निर्माण करणाऱ्या बुद्धीच्या अनुरोधानें जे व्यवहार करतात, ते सर्वोत्कृष्ट फल प्राप्त करूं शकतात.

[ या प्रकरणांतील प्रश्न सोडविण्याच्या पद्धतीसंबंधीं व वेळेसंबंधीं पूर्वीं दिलेल्या सूचना लक्षांत घेऊन; मगच हे प्रश्न सोडवावयास घ्यावेत. ]

६१ ( वेळ—अर्धें मिनिट



आमच्याजवळ एक जुन्या प्रकारची दुचाकी (सायकल) आहे. तिचें एक चाक मोठें आहे; आणि एक लहान आहे. काल त्या दुचाकीवर बसून मी एक मैल हिंडून आलों. तर कोणतें चाक अधिक अंतर धावलें ? कोणतें अधिक वेगानें धांवलें ? आणि कोणत्या चाकाचे फेरे अधिक झाले ?

६२ ( वेळ–अर्धे मिनिट

दोन मित्रांना एक वेळ चित्रपट पहावयाला नेणें परवडेल कीं, एका-लाच दोन वेळां चित्रपट पाहावयाला नेणें परवडेल? कीं दोन्ही सारखीच?

६३ ( वेळ–अर्धे मिनिट



एका उंच मनोऱ्यावरून खालीं टाकलेला एक शेर वजनाचा दगड १५ सेकंदांत खालीं पोहोंचतो. तर त्याच मनोऱ्यावरून टाकलेला पांच शेर वजनाचा दगड किती वेळांत खालीं पोहोंचेल?

६४ (वेळः–एक मिनिट

पाय नसतांना लांबवर जाते, आणि तोंड नसतांना आवाज न करितां बोलते अशी वस्तु कोणती?

६५ ( वेळ–एक मिनिट

एका मुलानें पाटीवर ओळीनें एक, दोन, तीन असे शंभरपर्यंत आंकडे काढले. तर त्यानें ९ चा आंकडा एकूण किती वेळां काढला? नीट उत्तर द्या हं मोजून! चुकूं नका! लवकर?

६६ ( वेळ–पाऊण मिनिट

तीन आया आणि प्रत्येकीची एक मुलगी सर्वजण एकाच घरांत राहतात. त्या घरांत चारच खोल्या आहेत. आणि प्रत्येक आईला आणि प्रत्येक मुलीला स्वतंत्र खोली आहे. इतकीं माणसें चार खोल्यांत प्रत्येकीं स्वतंत्र खोली घेऊन कशी राहतात?

६७ ( वेळ–एक मिनिट

असा कोणता प्राणी आहे कीं, जो सकाळीं चार पायावर चालतो, दुपारीं दोन पायांवर चालतो आणि सायंकाळीं तीन पायांवर चालतो?

६८ ( वेळ–दीड मिनिट

असा एकादा प्रश्न तुम्ही सांगू शकाल का कीं ज्याचें उत्तर 'होय' असें दोन अक्षरींच येईल? याहून अधिक-उणें उत्तर संभवतांच कामा नये.

६९ (वेळः–एक मिनिट

सारख्याच आकारमानाचीं दोन भांडीं आहेत. ह्यांपैकीं एकांत एक-तृतीयांश भाग दारू आहे; आणि दुसऱ्यांत एकद्वितीयांश भाग दारू आहे. त्यानंतर हीं दोन्हीं भांडीं पाण्यानें पुरतीं भरलीं, आणि पुनश्च तें एका मोठ्या भांड्यांत ओतलें. तर त्यांत किती भाग पाणी असेल आणि किती भाग दारू असेल? बोला !

७० ( वेळ–दीड मिनिट

## आम्ही कोण ?

दोघे भाऊ शेजारी । वाहूं ओझें परोपरी ।
उरावरी आमुच्या भार । नेऊं जवळी दूरवर
भरल्या पोटीं सेवेला । सिद्ध सदोदित कामाला
रिकामपोटीं आम्ही स्वस्थ । कामाची ना मुळिं बात ।।

७१ ( वेळ–अर्धें मिनिट

शरद्‌ला पर्वतीला जाण्यास १।। तास लागतो आणि गोविंदाला एकच तास लागतो. शरद् आणि गोविंदा असे दोघे जोडीनें निघाले, तर किती वेळ लागेल?

७२ ( वेळः–एक मिनिट

## ओळखा !

तेल पितां पितां सगळ्या काळोखाला खातो ।
शूर मोठा परी एकट्या वारुबाईला भितो ।।

७३ (वेळः–एक मिनिट

भिवा आंबेवाल्याच्या दुकानांत प्रत्येकीं २५ आंब्यामागें १९ आंबे गोड निघतात, १४ आंबे मोठे निघतात आणि १० आंबे मोठे आणि गोड निघतात. तर प्रत्येक २५ आंब्यामागें लहान आणि आंबट असे किती आंबे निघतील? चुकूं नका हं! आंकडेमोड करायची नाहीं कुठें!


७४ (वेळः–एक मिनिट

एका मुलानें दुसऱ्या एका मुलाला प्रश्न केला,

"तूं कुणाच्या आईच्या बापाचा मुलगा?"

तुम्ही सांगतां का त्याचें उत्तर?

७५ (वेळ–दीड मिनिट




एका पेटींत आठ तांबड्या रंगाचे, आठ निळ्या रंगाचे आणि आठ पिवळ्या रंगाचे चेंडू होते. निळा चेंडू पांच आण्याला तांबडा तीन आण्याला आणि पिवळा चेंडू एक आण्याला मिळे. तीन मुलांनीं प्रत्येकानें तीन्ही रंगाचे मिळून, एकूण आठ चेंडू घेतले आणि प्रत्येकानें सारखेच पैसे दिले. तर प्रत्येकानें कोणत्या प्रकारचे किती किती चेंडू घेतले?

७६ (वेळ–दीड मिनिट

ज्यांच्या सर्व बाजू एक एक इंचच आहेत असे अनेक चौकोनी ठोकळे घेतले आणि त्यांचा एक मोठा चौथरा रचून तयार केला. या नव्या चौथऱ्याची लांबी, उंची, जाडी सर्व कांहीं ३–३ इंचच आहे. त्यानंतर हा नवा मोठा चौथरा चारही बाजूंनीं दोऱ्यानें नीट बांधून त्यांच्या सर्व बाजू निळ्या रंगानें रंगविल्या. रंग वाळल्यानंतर दोरा सोडून सारे ठोकळे सुटे सुटे केले. तर आतां प्रश्न असा कीं ज्या बारीक ठोकळ्यांचा ३ इंची मोठा बनलेला ठोकळा होता त्यांपैकीं—

(१) किती ठोकळ्यांच्या चारी बाजूंना रंग असेल? (२) किती ठोकळ्यांच्या तीन बाजूंना रंग असेल? (३) किती ठोकळ्यांच्या दोन बाजूंना रंग असेल? (४) किती ठोकळ्यांच्या एका बाजूला रंग असेल? (५) किती ठोकळ्यांना मुळींच रंग नसेल?

७७ (वेळ–दीड मिनिट




सोबतच्या चित्रांत एक वर्तुळ दाखविलें असून 'अ' हा त्या वर्तुळाचा केन्द्रबिंदु आहे. 'अ आ ई इ' हा एक चौकोन आहे. आणि 'अ उ' ही या वर्तुळाची त्रिज्या आहे. आतां प्रश्न असा कीं, 'इ आ' ह्या कर्णाची लांबी जर १५ इंच असेल आणि 'इ उ' या रेषेची लांबी जर ४ इंच असेल तर या दिलेल्या वर्तुळाचा व्यास किती इंच येईल, तें सांगा. उत्तर काढण्यास विशेष आंकडेमोडीची आवश्यकता लागेलच असें वाटत नाहीं.

७८ ( वेळ–अर्धे मिनिट

## कोठें आहे चूक ?

उणे ६ = उणे ६

म्हणजेच, $-६ = -६$

म्हणजेच, $+४ - १० = +९ - १५$

आतां दोन्हीकडे समीकरणांत पंचवीस चतुर्थांश मिळविले तर समीकरणाच्या दोन्ही बाजू समानच राहतील.

$$४ - १० + \frac{२५}{४} = ९ - १५ + \frac{२५}{४}$$

म्हणजेच, $( २ - \frac{५}{२} )^२ = ( ३ - \frac{५}{२} )^२$

दोन्ही बाजूंचे वर्गमूळ काढलें तर,

$२ - \frac{५}{२} = ३ - \frac{५}{२}$

म्हणजेच, $\frac{४ - ५}{२} = \frac{६ - ५}{२}$

दोन्ही बाजूंस दोनानें गुणिलें असतां,

$४ - ५ = ६ - ५$

दोन्ही बाजूंस + ५ मिळविले असतां,

$४ = ६$

दोन्ही बाजूंस २ नें भागिलें असतां,

$२ = ३$

कुठें आहे चूक ?

### ७९ (वेळ—दीड मिनिट

सासरे-जांवई गेले शेती।
मायलेकी भाकरी नेती ॥
ही म्हणते, 'माझ्या बाबा तूं खा'।
ती म्हणते, 'माझ्या बाबा तूं पण खा ॥

हे कसें शक्य आहे? (बाबा म्हणजे बाप).

### ८० (वेळ—एक मिनिट

असें कोणतें खंड आहे कीं, जेथें पाण्यावांचून नद्या आहेत, घरांवांचून गांवें आहेत आणि माणसावांचून देश आहेत.

### ८१ (वेळ—दीड मिनिट

कोणतेहि पांच सारखे विषम आंकडे घ्या आणि ते अशा प्रकारें मांडा—वाटल्यास अधिकचिन्हाचा तेवढा उपयोग करा—कीं त्याचें उत्तर १४ च येईल.


८२ (वेळ:–दोन मिनिटें

जन्मल्यानंतरहि मुळींच हालचाल करीत नाहीं असें कोण आहे ? ( अर्थात् जन्मतःच मृत असणारें बालक सोडून ).

८३ ( वेळ–एक मिनिट

एका पेरूवालीच्या पाटींत विक्रीसाठीं पेरूची तीनप्रकारें विभागणी केली होती. पैशाला एक, पैशाला दोन आणि पैशाला तीन असे त्यांचे भाव ती सांगे. कांहीं मुलांनीं तिच्या पाटींतील त्यांना हवे तेवढे पेरू घेतले, आणि सर्वांचे मिळून सात पैसे दिले; आणि घेतलेले पेरू त्यांनीं आपसांत अशा प्रकारें वांटून घेतले कीं, प्रत्येकाचा वाटा अगदीं सारखाच राहिला. मुख्य गोष्ट म्हणजे एकहि पेरू न कापतां सर्व वाटण्या केल्या होत्या. तर एकूण मुलें किती होतीं. आणि प्रत्येकाच्या वांट्याला किती किती पेरू आले ? ( कमींत कमी दोन प्रकारचे पेरू त्यांनीं खरेदी केलेच आहेत ).

८४ (वेळ:–एक मिनिट



एका मंगलागौरीचे रात्रीं सहा मुली फुगड्या खेळत होत्या. त्यांपैकीं प्रत्येक मुलगी इतर प्रत्येक मुलीशीं एकेकदांच फुगडी खेळली असें धरलें तर एकूण किती फुगड्या खेळल्या जातील ?

८५ (वेळ:–एक मिनिट

३२ डोकीं, ४० हात आणि ८८ पाय कुठें असतात तें ठाऊक आहे तुम्हांला ?

८६ (वेळ:–अर्धें मिनिट

समजा, मुंबईहून सुरतेकडे प्रत्येक तासातासानें गाड्या सुटतात, आणि सुरतेहूनहि मुंबईकडे प्रत्येक तासातासानें गाड्या सुटतात; आणि कुठल्याहि

गाडीला मुंबई-सुरत अंतर तोडण्यास ५ तास लागतात, असें धरलें तर त्यांपैकीं सुरतेकडे जाणाऱ्या एका गाडींत बसून निघालेल्या एका माणसाला सुरतेस पोहोंचेपर्यंत सुरतेहून मुंबईला निघालेल्या किती गाड्या भेटतील? चुकूं नका हं!


८७ (वेळ—अडीच मिनिटें

१००० रुपये १० पिशव्यांत अशा प्रकारें भरा कीं, १ रुपयापासून १००० रुपयांपर्यंत वाटेल तितके रुपये एकहि पिशवी न सोडतां तुम्हांला दुसऱ्याला देतां येतील.

८८ (वेळ—अर्धें मिनिट

एका घरांत मामा-मामी राहतात. त्यांना पांच भाचे आहेत. आणि या भाचांपैकीं प्रत्येकाला एक बहीण आहे, असें धरलें आणि ही सारी मंडळी मामाकडेच राहात असली, तर घरांत एकूण किती मंडळी राहात होती तें सांगा.

८९ (वेळ—तीन मिनिटें



एका धनाढ्य सावकाराच्या मृत्यूनंतर त्याच्या मृत्युपत्रानुसार त्याच्या साऱ्या मिळकतीची हत्ती, घोडे, गाड्या, पालख्या, भांडीं, दागिने, रत्नें इत्यादींची त्याच्या दोन्ही मुलांमध्यें अर्धी अर्धी वांटणी करण्यांत आली. तसेंच त्याच्याजवळ एक मौल्यवान हिरा होता. तो कोणास द्यावयाचा यासंबंधीं त्यानें मृत्युपत्रांत लिहिलें होते, "माझे दोघे मुलगे घोड्यावर बसण्यांत पटाईत आहेत. त्याची दोघांची घोड्यावर बसून

विशिष्ट अंतर धांवण्याची एक शर्यत लावावी, आणि त्यांत ज्याचा घोडा मागें राहील त्याला हा हिरा द्यावा." अटीप्रमाणें पंचांनीं दोघांना त्यांचे उत्कृष्ट घोडे आणावयास सांगितलें आणि योग्य प्रकारें शर्यत सोडली. पण दोन्ही घोडे जागच्या जागीं उभे ! कारण उघडच आहे, ज्याचा घोडा मागें तो जिंकणार; मग पुढें कोण जाईल ? तेव्हां आतां याचा निर्णय व्हावा कसा अशी पंचांना पंचाईत पडली. पण त्यांना एक युक्ति सुचली आणि त्याप्रमाणें दोघांना सांगून शर्यत सोडतांच दोघे घोडेस्वार भरधांव पळाले. आणि मृत्युपत्राच्या विपरीत न वागतां, त्याला अनुसरूनच, पंचांनीं जो शर्यतींत पुढें आला त्यालाच तो हिरा दिला. तर प्रश्न असा कीं, पंचांनीं दोन्ही मुलांना काय सांगितलें ? आणि मृत्युपत्राला अनुसरून पुढें आलेल्यालाच त्यांना हिरा कसा देतां आला ?

९० ( वेळ—एक मिनिट

एका माणसानें दोन घोडे विकले. त्यांपैकीं एका घोड्यावर त्याला शें. २० लाभ झाला आणि दुसऱ्यावर शें. २० तोटा झाला. दोन्ही घोडे प्रत्येकीं ४०० रुपयांना विकले असें धरलें तर त्याला एकूण लाभ वा तोटा किती झाला ? कीं लाभहि नाहीं आणि तोटाहि नाहीं ?

---

## का म्हणजे का !

काय हो, काल काळ्यांचे काका, काकूंवर कां कावले ? कारण काकांच्या कामाचे कांहीं कागदपत्र कारणावांचून कापले.

—×—


## रामदासकृत 'ग्रंथिचा' अर्थ काढा

बारा प्रत्ययें ग्रंथिचा[1] अर्थ काढा । ग्रंथिचा[2] अर्थ काढा ।।
करी मोकळा ग्रंथिचा[3] अर्थ काढा । पदें तीन ये ग्रंथिचा[4] अर्थ काढा ।।

---

१ अनुभवानें ग्रंथाचा अर्थ करा. २ वेळ पाहून गांठीचे पैसे खर्च करा. ३ संसारांतून मोकळा करील असा हृदयग्रंथीचा अर्थ काढा. ४ याप्रमाणें कविताग्रंथींतील पदाचा अर्थ काढा.

# हंसाल बर का !



**बुद्धिर्यस्य बलं तस्य निर्बुद्धस्य कुतो बलम् ।।** हितोपदेश २।१११

ज्याच्याजवळ बुद्धि आहे त्याच्याजवळ सामर्थ्य आहे. बुद्धिहीन माणसाला सामर्थ्य कुठलें असायला !

वसंतः—(विमलच्या घरच्या भुंकणाऱ्या कुत्र्याकडे पाहून) अग, तुझ्या या कुत्र्याला आवर पाहूं. सारखा भुंकतो आहे. नाहींतर त्याला बांधून तरी ठेवीत जा.

विमलः—काय तरी घाबरतां ! 'भुंके कुत्रें तें चावे ना' हें ठाऊक नाहीं वाटतें तुम्हांला ?

वसंतः—अग, मला ठाऊक आहे सर्व. पण तुझ्या या कुत्र्याला ठाऊक आहे कां तें ?

—x—

नमुना वाक्यः—या दोन मुलगीमधोमध हा बारकासा मोठी
शहाणपणीं असतो असें आम्हीं वाटायचं !

—x—

छोटा भाऊः—आई, हा दादा मला नीट निजूंच देत नाहीं ग अंथरुणावर !

मोठा भाऊः—कां ? मीं अर्धें अंथरूण घेतों नि अर्धें त्याला ठेवतों !

छोटा भाऊः—हो, पण आई तो मधलें अर्धें अंथरूण घेतो ग !

—×—

बाईसाहेबः—( मोलकरणीस ) गंगू, आंतांशा तूं फारच निष्काळजी झाली आहेस हं. कपबशा किती फोडतेस ! यापुढें तुझ्या पगारांतून त्याचें मोल कापून घेईन, ध्यानांत ठेव.

गंगूः—बरं बाईसाहेब.

आज गंगूनें पुनश्च एक चांगलें उंचीपैकीं कांचेचें फुलपात्र फोडलें. तेव्हा बाईसाहेब उद्‌गारल्या, "अग आज तर तूं कमालच केलीस. तूं फोडलेल्या भांड्यांची किंमत तुझ्या पगारापेक्षांसुद्धां अधिक आहे. कसलं कापून घेणार आतां कपाळ !"

गंगूः—कां ? मग माझा पगार वाढवा म्हणजे जमेल सगळं !

—×—

मुलगाः—बाबा, सोड्याच्या बाटलींत गोळी हो कशी घालतात ? आणि सूर्य दिवसा कां उगवतो ? आणि मांजराचा आवाज असा 'म्यॉंव म्यॉंव'च कां येतो ? आणि झाडाचीं पानें हिरवी हो कां ? आणि......

बापः—अरे, हो हो ! हळूहळू घे जरा. मीं जर माझ्या वडलांना असे हे प्रश्न विचारले असते तर काय झालें असतें आहे का ठाऊक ?

मुलगाः—हो, माझ्या कांहीं प्रश्नांचीं उत्तरें मग तुम्हांला देतां आलीं असतीं एवढंच ना ?

—×—

"तुम्हीं विवाहित आहां हें मीं निश्चयानें सांगतों."

"तें कसें बुवा ?"

"तुमच्या कोटाच्या गुंड्या आतां व्यवस्थित लावलेल्या आहेत. पूर्वीप्रमाणें गुंड्या असल्या तर आहेत, नसल्या तर नाहींत, असा प्रकार नाहीं दिसत आतां आणि......"

"हो, गुंड्या कशा शिवायच्या हाच धडा तिनें आज माझ्याकडून घटवून घेतला खरा!"

—×—

मुलांचा गलका ऐकून रस्त्यानें जाणारे एक सभ्य गृहस्थ उद्गारले, "काय रे मुलांनो! अरे, काय चाललंय काय?"

"त्याचं असं झालं" एक मोठा मुलगा म्हणाला, "आम्हीं असं ठरविलं कीं, जो सर्वांत चांगली लोणकढी थाप मारील त्याला हा पेढा द्यायचा. पण कोणती थाप सर्वांत चांगली त्याचा निर्णयच होत नाहीं. हें बघा मीं अशी थाप मारली, अं अं......"

"शिव, शिव! अरे काय पोरांनो, मी तुमच्याएवढा होतों तेव्हां थाप कशाला म्हणतात तें मला ठाऊकसुद्धां नव्हतें. आणि तुम्हीं......"

"छान, छान! ही सर्वांत लोणकढी आहे. अगदीं नक्की यांनाच द्या पेढा!" सर्व मुलें एकमतानें ओरडलीं.

—×—

न्यायाधीशः—(पोलिसाकडे पाहून) हा गृहस्थ दारू पिऊन रस्त्यांत शांतताभंग करीत होता असें तूं कशावरून म्हणतोस?

पोलीसः—कारण तो तावातावानें भाजीवालीशीं भांडत होता.

न्यायाधीशः—तावावानें बोलला म्हणून दारू प्याला असें कसें रे म्हणतां येईल?

पोलीसः—तसें नव्हे, पण रस्त्यांत भाजीवाली मुळीं नव्हतीच!

—×—

गोविंदरावांकडे आलेल्या पाहुण्यानें चांगलें महिनाभर ठाण दिलें त्यांच्याकडे. त्यांना घालवून लावण्याचा हमखास उपाय म्हणून गोविंदराव म्हणतात, "कांहो, तुमची बायकामुलें तुमच्यापासून बरेच दिवस दूर राहिल्यामुळें आतां कंटाळून गेलीं असतील अगदीं, नाहीं का?"

पाहुणे उत्तरतात, "खरंच, हें अगदींच ध्यानांत नाहीं आलें माझ्या ! पण आतां असें करतों, त्यानांच तार करून इकडे बोलावून घेतों म्हणजे झालें."

—x—

प्रवासी पाहुणाः—(घाईघाईनें बाळूस) बाळ, बर धांवत जा, आणि मी निजत होतों त्या खोलीच्या कोपऱ्यांत माझी छत्री राहिली आहे का बघ बरं ?

बाळूः—(थोड्या वेळानें खालीं येऊन आणि दोन्ही हात खिशांत घालून) हो, हो. कसं नेमकं सांगितलंत तुम्हीं ! अगदीं तिथेंच आहे छत्री तुमची !

—x—

नमुना वाक्यः—सारखंच सारखं बर्फ खाल्ली म्हणजे थंडी बनून शिंका होतात माणसांत !

—x—

बाईसाहेबः—(दुकानदारास) मीं तुम्हांला बारा आंब्यांचे पैसे दिले होते, आणि तुम्हीं तर अकराच आंबे पाठविलेत ?

दुकानदारः—त्याचं असं झालं बाईसाहेब, एक आंबा होता नासका. तेव्हां म्हटलं, तुमच्यासारख्यांकडे वाईट माल पाठविण्या-पेक्षां न पाठविणें बरें ! कारण चोख माल देणें हेंच आमचें ब्रीद आहे ना !

—x—

एका म्हाताऱ्या बाईला, ती रस्ता ओलांडण्याचा यत्न करीत असतां एका मोटारीचा धक्का लागला आणि ती खालीं पडली. सुदैवानें धुळीनें कपडे भरण्यापलीकडे तिला इतर कांहीं अपाय झाला नाहीं. अपघाताची वार्ता ऐकून तत्काळ एक पोलीस तेथें आला; आणि मोटारवाल्याला त्या संबंधीं त्यानें विचारलें असतां तो म्हणाला, "अहो, अडाणी म्हातारी ही.

माझी कांही चूक नसतां मधें आली. मग काय करणार? आज दहा वर्षे मीं रोज गाडी हांकतों आहे, पण एकदांहि अपघात घडला नाहीं माझ्या हातून."

मोटारवाल्याचें उत्तर ऐकून म्हातारी तावातावाने म्हणते, "हो, हो, मोठा दहा वर्षांच्या सरावाचा दिमाख दाखवतो आहे! मला तर साठ वर्षे झालीं, नेमानें याच रस्त्यानें जायचा सराव आहे, आहे का ठाऊक? भलतंच नाहीं ऐकून घेणार हं मी!"

—x—


वकीलसाहेबांच्या दारावरची घंटा कोणीतरी वाजविली. वकीलसाहेब दार उघडून पाहतात तों शेजारचा हलवाई पुढें उभा. हलवायानें विचारलें, "कां हो, वकीलसाहेब, एकाद्याच्या कुत्र्यानें जर आमच्या दुकानांतले कांहीं पदार्थ पळविले तर मला त्याचें मोल त्या कुत्र्याच्या धन्याकडून कायदेशीरपणानें वसूल करतां येईल का?"

"हो, हो अर्थातच." वकील उद्गारले.

'हो ना, मग तुमच्याच कुत्र्यानें माझ्या दुकानांतील परातींमधला बदामपाक फस्त केला आहे. त्याचे चार रुपये द्या मला!' हलवाई उत्तरला.

त्यावर वकील शांतपणें म्हणतात, "तें खरें! पण तुम्हींच प्रथम मला आणखी एक रुपया द्या म्हणजे माझी एकूण ५ रु. फी आहे त्याची भरपाई होईल."

—x—



एका ग्राहकानें बूटवाल्याच्या दुकानांतील एक १० रुपयाची बूटजोडी पसंत केली. परंतु जंवळ नऊच रुपये असल्यामुळें त्यानें विक्रेत्यास विचारलें, "मजजवळ नऊच रुपये आहेत. उरलेले पैसे मी उद्यां दिले तर चालतील का?"

"हो, चालतील." विक्रेता उद्गारला, आणि त्यानें बांधून दिलेले बूट घेऊन गिऱ्हाईक निघून गेलें. त्यानंतर गल्ल्यावर पैसे घेणारा माणूस त्या विक्रेत्याकडे पाहून म्हणाला, "उद्यां तुला हा रुपया स्वतः भरावा लागेल; मूर्खा ! असा माल मिळाल्यावर तो पुन्हां कशाला तोंड दाखवितो आहे तुला ! कसें समजत नाहीं बुवा तुम्ह लोकांना."

"तें कांहीं असो; पण तो अगदीं नक्की परत येणार !"

"कशावरून ? मोठा धर्मराजच असला पाहिजे मग !"

"कारण बूट बांधतांना त्यांत मखलाशी करून जाणून बुजून मीं दोन्ही बूट उजव्याच पायाचे बांधून दिले आहेत. तेव्हां त्याला परत येण्या-वाचून गत्यंतरच नाहीं."

—×—

एका घरांत सारेचजण बहिरे होते. एक दिवस दाराशीं येऊन हात-वारे करीत भिक्षा मागणाऱ्या एका भिकाऱ्याला घरांतल्या बहिऱ्या नोकरानें धक्के मारून घालवून दिले; आणि आपला पराक्रम पाहणाऱ्या आपल्या धन्याकडे येऊन तो म्हणाला, "पाहिलं का धनी. भिकारी तर भिकारी आणि म्हणतों कीं, तुमच्या धन्यानें घर केवढ्याला बांधलें ? भिकारी माजले आहेत जणूं "

तें ऐकून धनी शेजारीं बसलेल्या बायकोला म्हणतो, पाहिलंस ! फक्त तुलाच वाटतं कीं, मीं म्हातारा झालों. सारं गांव म्हणत आहे कीं, मीं अजून तरणाबांड दिसतों म्हणून. तो भिकारीसुद्धां माझी अशीच स्तुति करीत होता."

त्यावर बायको उद्गारते, "आतां काय करणार तरी ! अहो गडी माणसाच्या देखत का मला सारखं विचारायचं कीं, तुला कोणता दागिना करूं ? कोणता दागिना करूं ? सतरा वेळां सांगितलं कीं, आतां मोत्याचा पोत मिळाल्यावांचून मीं स्वस्थ नाहीं राहणार म्हणून !"

जरा वेळानें बाईसाहेब उठून आंत गेल्या नि आपल्या जेवीत अस-लेल्या मुलीला म्हणतात, "बघ हो, यांनीं अगदींच ताळ सोडला. त्या

२९०७० ग्रं.वा. ३१/३/५

गड्याच्या देखत मला म्हणतात कीं, तुला कुठला दागिना करूं? म्हातारचळ नाहीं तर काय?" त्यावर मुलगी उत्तरते, "अग आई, कांहीं काळ वेळ आहे कीं नाहीं? म्हणे तुला कसा नवरा हवा तें पुन्हा एकदां सांग. पुन्हा सांगतें ऐक. आतां मला असले कांहीं विचारूं नको!"

थोड्या वेळानें आई बाहेर गेल्यावर मुलगी आमटी वाढणाऱ्या स्वयंपाकिणीला म्हणते, "बघा हो काकू, तुमच्या देखत असे खासगी प्रश्न विचारणं बरं दिसतं का? आईच डोकं व ठिकाणावर नाहीं सध्यां!"

स्वयंपाकीण काकू उत्तरतात, "ताईसाहेब, माझी आमटी सारें गांव वाखाणतं आणि तुम्ही म्हणतां मला आमटी करतां येत नाहीं. हें आहे असं आहे. पटलं तर राहतें नाहीं तर मला रजा द्या कशी. मी जातें आपली."

ताईसाहेबांचं जेवण झाल्यावर स्वयंपाकीण काकू भांडीं घासणाऱ्या बाईला म्हणतात, "असल्याच ताईसाहेब! स्वयंपाकाची चव कळण्याइतकं तरी 'हें!' लागतं ना! कांहीं सुद्धां कळत नाहीं आणि आपली तक्रार मीं आज चक्कच सांगितलं मुळीं."

भांडीवाली उत्तर करते, "काकू, तुमचं आपलं नेहमीं तेंच! म्हणे ताईसाहेब ताटें स्वच्छ नाहींत म्हणून रागावत होत्या. हो, हो, अगदीं खुशाल सांगा बाईसाहेबांना! मला धाक दाखवतां होय? काम किती चांगलं केलं तरी तुमचं आपलं तेंच. जा, जा सांगा, मी पण सांगेन बाईना मग!"

—×—

दोन दारुड्ये दारूनें तर्रर्र होऊन गेले होते.

पहिला म्हणतो, "मी जगांतील साऱ्या सोन्याच्या खाणी विकत घेणार आहे, आतां त्यावांचून भागायचं नाहीं."

दुसरा म्हणतो, "तूं खूप विकत घेशील पण मी देईन तेव्हां ना!"

—×—

गिऱ्हाईक (दुकानदारास):—तुम्हीं काल मला हस्तीदंती म्हणून फणी दिलीत पण ती खोटी निघाली.

दुकानदार:—असेल बुवा, हत्तीसुद्धां खोटें दांत बसवून घ्यायला लागलेले दिसतात अलीकडे !

—×—

पहिला:—काय योगायोग पाहा ! आज तारीख अकरा. महिना नोव्हेंबर म्हणजे अकरावाच. आमची रेस स्पेशल मुंबईला पोहोंचली बरोबर अकराला. सामान उचलणाऱ्या हमालाचा नंबर अकराच. गाडी केली तिचा नंबर अकराच. आज रेसचा दिवस अकरावाच. तेव्हां म्हटलं अकरा नंबरच्या घोड्यावरच पैसे लावूं झालं ! आणि योगायोग असा—

दुसरा:—(अधीरतेनें) आणि तोच पहिला आला का ?

पहिला:—नाहीं हो, तो नेमका अकरावा आला न् काय ?

# विचारून पहा—

१

आपल्या मित्राला म्हणावें, "मी विचारतों ते पाढे सांग. सोपे, दहाच्या आंतले विचारणार आहे मी !"

मग विचारण्यास प्रारंभ करा.

"पांचा आठे ?" तो उत्तर देईल, "चाळीस"

"नवा पांचा" ,, ,, "पंचेचाळीस"

"दाही चोक" ,, ,, "चाळीस"

"आठा पंचे" ,, ,, "चाळीस"

"साही सकं" आणि या वेळीं तो बहुतकरून उत्तर देईल, 'बेचाळीस' आणि चुकेल. (खरें साही सकं 'छत्तीस' असें उत्तर हवें.)

२

कुणालाहि म्हणावें, मी सांगतों ती बेरीज कर.

"सत्तेचाळीस अधिक अर्धा" तो उत्तर देईल, "साडेसत्तेचाळीस"

"अधिक अर्धा" ,, ,, ,, "अठ्ठेचाळीस"

"अधिक पाऊण" ,, ,, ,, "पावणे एकूणपन्नास"

"अधिक पाव" आणि या वेळीं तो बहुतकरून उत्तर देईल, "पन्नास". (खरें उत्तर 'एकूणपन्नास').

फसाल

बरं

कां !



[ या प्रकरणांतील प्रश्न सोडविण्याच्या पद्धतीसंबंधीं व वेळेसंबंधीं पूर्वी दिलेल्या सूचना लक्षांत घेऊन मगच ते प्रश्न सोडवावयास घ्यावेत ].

## ९१ (वेळ–अडीच मिनिटें

संख्या ओळखा:––

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| + | + | + | + | = | १४ | संख्येंतील आंकड्यांची बेरीज |
| + | + | + | + | = | २० | ,, ,, ,, |
| + | + | + | + | = | २५ | ,, ,, ,, |
| ८ | ८ | ८ | ८ | | | |

## ९२ (वेळ–अडीच मिनिटें

० ० ० लगतच्या आकृतींत दाखविलेले नऊ बिंदू चारच सरळ
० ० ० रेघांनीं जोडा. परंतु अट अशी कीं, एकदां रेघ
० ० ० काढण्यास आरंभ केला कीं शेवट येईपर्यंत पुनश्च हात
उचलावयाचा. नाहीं आणि रेघेवरून रेघ गिरवावयाची नाहीं.

९३　　(वेळ–दोन मिनिटें

सरदार भाऊसाहेब फाळके आणि त्यांचे चिरंजीव आण्णासाहेब फाळके हे दोघेहि त्यांच्या भव्य दिवाणखान्याच्या मध्यभागीं गोळ्या लागून मरून पडलेले आढळले. भाऊसाहेबांची पत्नी पूर्वींच वारली असून आण्णा-साहेबांचे अद्याप लग्नच झालेलें नाहीं. स्वत: सरदारांच्या छातींत गोळी लागलेली आहे; आणि आण्णासाहेबांच्या पाठींत गोळी लागलेली आहे.

केव्हांहि बंदुकीची गोळी जर जवळ अंतरावरून मारली गेली असेल तर ज्या ठिकाणीं शरीराला गोळी लागते तो भाग सभोंवताली काळा पडलेला असतो, आणि त्या ठिकाणचा कपड्याचा भाग तर चांगला जळल्यासारखा दिसतो. उलटपक्षीं गोळी लांब अंतरावरून मारली गेली असेल, तर असा कांहीं प्रकार आढळत नाहीं.

साऱ्या दिवाणखान्यांत फक्त दोनच व्यक्तींच्या पावलांचे ठसे उमटलेले दिसत आहेत; आणि दिवाणखान्याच्या बाहेर कोणाचेच ठसे दिसत नाहींत. स्वत: सरदारसाहेबांच्या अंगाखालींच बंदूक पडलेली आहे, आणि आण्णासाहेबांच्या आसपास कोठलेंच हत्यार सांपडत नाहीं. दोघांच्याहि अंगरख्यावर गोळी लागलेला भाग काळा पडला असून कपड्यांचा भागहि किंचित् जळलेला आहे.

स्वत: सरदारसाहेबांचें पुत्रावर आत्यंतिक प्रेम होतें, आणि पुत्राला आपणहून अपाय करण्यापेक्षां ते स्वत: मरणहि स्वेच्छेनें पत्करतील. अर्थात् स्वत:च्या संरक्षणासाठींसुद्धां ते आण्णासाहेबांवर हत्यार चालविणें अशक्य आहे.

कांहींचें म्हणणें असें आहे कीं, अलीकडे पिता-पुत्राचें नीट नव्हतें; आणि त्यांची बरेच वेळां बोलाचाली होई. कोणी म्हणत, आण्णासाहेब वाटेल तसें वाह्यातपणें वागत; तें सरदारसाहेबांना पसंत नव्हतें. कोणी म्हणतात कीं, भाऊसाहेबांचा त्यांच्या मुलाला तिटकारा आल्यामुळें तोच

अगदीं तुटकपणें वागे, आणि वडिलांचा पैसा हातीं येण्यास त्यांच्या मृत्यूवांचून अन्य उपाय नाहीं हेंहि त्याला पूर्णपणें विदित होतें ! कोणी म्हणतात, आण्णासाहेबांची कांहीं बाईची भानगड असून ती निस्तरतां निस्तरतां त्यांचा जीव अगदीं मेटाकुटीला आला होता. आतां सांगा कीं,
(१) सरदारसाहेबांच्या मृत्यचे कारण काय ? आत्महत्या खून कीं अपघात ?
(२) आण्णासाहेबांच्या मृत्यूचे कारण काय ? आत्महत्या खून कीं अपघात ?

९४ (वेळः—दोन मिनिटें

१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९ ह्या सर्व आंकड्यांचा एकेकदांच उपयोग करावयाचा. त्यांच्या समवेत गणितांत येणाऱ्या कोणत्याहि चिन्हांचा उपयोग करावयास प्रत्यवाय नाहीं; आणि अशा प्रकारें प्रत्येक आंकडा एकेकदांच वापरून त्याचें उत्तर नेमकें १०० आणून दाखवा. याचीं अनेक उत्तरें आहेत. त्यांपैकीं कांहीं पुढें देतों. तुम्हीं स्वतः एक तरी नवीन करून पहा.

(१)
   १५
 + ३६
 + ४७
 ―――
   ९८
 ÷  २
 ―――
  १००

(२) १+२+३+४+५+६+७+(८×९)=१००
(३) १२३+४५+८−६७−९=१००
(४) ९८ $\frac{२७}{५४}$ + १$\frac{३}{६}$ = १००
(५) ९८+५४+२१+३−७६=१००
(६) ९७ + $\frac{८}{१२}$ + $\frac{४}{६}$ + $\frac{५}{३}$ = १००
(७) १२३+८९−६७−४५=१००
(८) ६४·७ + ३५·२ + १ (·९ − ·८) = १००

(९) $\frac{२}{३} + १\frac{४}{८} + ९७\frac{५}{६} = १००$

(१०) $९१\frac{५७४२}{६३८} = १००$

(११) $९१\frac{३}{६} + ८\frac{२७}{५४} = १००$

(१२) $१२\frac{६}{४+५} + ८७\frac{३}{९} = १००$

(१३) $५७\frac{९}{१८} + ४२\frac{३}{६} = १००$

(१४) ७१+६×४+८×२+३−५−९=१००

(१५) $\frac{६९}{२३} + ८७ + \frac{९}{·५ - ·४} = १००$

(१६) $\frac{९६}{३२} + ७८ + १४ + ५ = १००$

(१७) ९८·७ + ·२ + ४·६ − ३·५ = १००

(१८) $८२\frac{३५४६}{१९७} = १००$

(१९) $९१\frac{७५२४}{८३६} = १००$

(२०) $९५ + ४ + \frac{३८}{७६} + \frac{१}{२} = १००$

(२१) $५२ + ४७ + \frac{९}{१८} + \frac{३}{६} = १००$

(२२) $९६ + \frac{२१४८}{५३७} = १००$

(२३) $२ + ९५ + ३\frac{४}{२८} + \frac{६}{७}$ १००

(२४) $५७ + ४२ + \frac{३}{६} + \frac{९}{१८} = १००$

(२५) $८२\frac{३५४६}{१९७} = १००$

(२६) $८१\frac{७५२४}{३९६} = १००$

(२७) १+२×३+४+५+६७+८+९=१००

(२८) १×२+३४+५६+७−८+९=१००

(२९) १२+३−४+५+६७+८+९=१००

(३०) १२३+४−५−६+७+८९=१००

(३१) (९+८+७+६−५)(४+३−२−१)=१००

(३२) १२३+४−५+६७−८९=१००

(३३) $९१\frac{५८२३}{६४७} = १००$

(३४) १२३−४−५−६−७+८−९=१००

(३५) $९६\frac{१७५२}{४३८} = १००$

(३६) $१+९३+५+\frac{४}{२८}+\frac{६}{७}=१००$

(३७) $९४+५+\frac{३८}{७६}+\frac{१}{२}=१००$

(३८) $९\times८+६\times७-५-४-३-१\times२=१००$

(३९) $९६\frac{१४२८}{३५७}=१००$


(४०) $९८+१+\frac{२७}{५४}+\frac{३}{६}=१००$

### ९५

पुढील शब्दांचे नेमके प्रतिशब्द द्या. अर्थात् मूळ शब्दाला सु, कु, दु, अ, अन्, नि, ब्रे इत्यादि प्रत्यय लावून नव्हे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ बावळा | ९ सावकाश | १७ नम्र | २५ बांधेसूद |
| २ समजूतदार | १० धांदरट | १८ चेंगट | २६ चपळ |
| ३ भोळा | ११ भांडखोर | १९ नेणता | २७ उंचसखल |
| ४ लाजाळू | १२ उत्सुक | २० टणक | २८ अनोळखी |
| ५ गुळगुळीत | १३ अंधुक | २१ पोरकट | २९ निष्काळजी |
| ६ मुखदुर्बळ | १४ शेळपट | २२ स्वच्छ | ३० दुधाळ |
| ७ तापट | १५ चाणाक्ष | २३ तुसडा | ३१ दाट |
| ८ चमचमीत | १६ गबाळ्या | २४ स्पष्टवक्ता | ३२ आंधळा |

### ९६ (वेळ–दोन मिनिटें



भारतवर्ष वैभवशिखरावर आरूढ झाला होता तेव्हांची गोष्ट ! नौकानयन त्या कालीं निषिद्ध नव्हतें. उलट भारतवर्षात अनेक ठिकाणीं नौकाबांधणीचें काम चालें नि अनेक परदेशी लोकही येथील नौका उत्कृष्ट असतात म्हणून त्यांची मागणी करीत. हें पाहा भरभराटलेलें भडोच नगर ! आणि हे पाहा तेथील विख्यात विशाखदत्त श्रेष्ठी. परदेशाशीं यांचा मोठ्या प्रमाणांत व्यापार चालतो, आणि त्यावर त्यांनीं गडगंज संपत्ति प्राप्त केली आहे. हा त्यांचा प्रासाद-

तुल्य चौमजली वाडा, आणि हें त्या सभोंवतालचें प्रेक्षणीय उद्यान; आणि तो पाहा आवाराभोंवतालचा चारी दिशांना असणारा भक्कम चिरेबंदी कोट.

संपत्ति मिळविण्याइतकेच ती राखण्यांत शेटजी अत्यंत दक्ष आहेत, आणि म्हणूनच प्रतिरात्रीं चारी 'दिशांना चार चार संरक्षक, वाड्याचे रक्षण करण्यासाठीं त्यांनीं नियोजित केले आहेत.

पण वाड्यांत आज इतकी धांदल कसली दिसते आहे? अहो, कांहीं आवश्यक कामासाठीं उद्यां शेटजी स्वतःच सुमात्रा-बाली बेटांत प्रयाण करणार आहेत आणि एवढा प्रचंड व्याप असल्यामुळें एवढी धांदल उडायचीच! उद्यां निघणाऱ्या शेटजींच्या आवडत्या नौकेंत नाना प्रकारचे पदार्थ भरून, पर्यटणासाठीं तिला सुशोभित करण्याच्याही आज्ञा सुटल्या आहत.

दिवस उजाडला. घटका दोन घटकांतच आतां शेटजी निघणार; पण हा कोण? आणि 'धनी कुठे आहेत,' अशी पृच्छा तो कां करतो आहे? तो पाहा त्यानें विशाखदत्तांना लवून प्रणिपात केला, आणि— "स्वामी आपण आत्तांच निघणार ना?"

"हो, पण काय रे तूं कोण?"

"मी वाड्याच्या उत्तर दिशेचा रक्षक. प्रतिरात्रीं तिथें काम करितों."

"मग पुढें?"

"माझी विनंति आहे एक स्वामींच्या पायांशीं. पण स्वामी, मी चार-चौघांत नाहीं बोलणार. मला एकान्त हवा."

याच्या मनांत कांहीं काळेंबेरें तर नसेल ना असा शेटजींना संशय आला असावा. कारण त्यांनीं त्याचा झाडा घेऊन मगच त्याला अंतर्गृहांत सोडण्याची आज्ञा केली.

"स्वामी, आज आपल्याला गेलेंच पाहिजे का? आपलें पर्यटन पुढें ढकललें तर नाहीं चालणार?

"कां?"

‘ स्वामी, मी भोळा माणूस. तुमचा शकुनावर विश्वास असो वा नसो, पण माझा आहे. स्वामी, मी शपथेवर सांगतों कीं, काल मी स्वप्नांत आपली ही नौका वादळांत सांपडलेली पाहिली. स्वामी, कांहीं तरी अरिष्ट आहे निश्चित. माझें वेड्याचें ऐका आणि आजचें जाणें रहित करा.”

“चल, वेडा कुठला ! ” म्हणून शेटजींनीं त्याला घालवून दिलें. कर्मधर्मसंयोग म्हणा, पण शेटजींच्या कामापैकींच आणखी कांहीं अपरिहार्य काम निघाले; आणि त्यांचे जाणें लांबलें. तेव्हां त्या नौकेवर दुसरा माणूस नेमून त्यांनीं ती पाठवून दिली. ‘पुन्हा नव्या नौकेची सिद्धता करून निघूं चार दिवसांनीं’ असा त्यांचा विचार; आणि दोनच दिवसांनीं वार्ता आली कीं, ज्या नौकेंतून विशाखदत्त जाणार होता ती अकस्मात् बुडाली !

बरीच हानि झाली असली तरी जिवावरचें अरिष्ट टळल्यामुळें शेटजींना हायसें वाटलें. आपल्याला संकटाची पूर्वसूचना देणाऱ्या उपकारी माणसाला त्यानीं बोलावणें धाडिलें. त्याचे आभार मानून त्याला एक सहस्र निष्क पारितोषिक म्हणून दिले, आणि मग मात्र त्याला सांगितलें कीं, “बाबारे, आजपासून तुला कामावरून काढून टाकलें आहे ! ”

“काय म्हणतां धनी ? ” चकित होऊन त्यानें विचारलें.

खरेंच, विशाखदत्तांना अरिष्टाची पूर्वसूचना देऊन त्यानें त्यांचे प्राण वांचविण्याचा प्रयत्न केला होता. मग त्यांनीं असें कां केलें ?

वेळ दोन मिनिटेंच !

९७ ( वेळ—एक मिनिट

एका रात्रीच्या टांगेवाल्याला नित्य दोन मेणबत्त्या लागतात. मेणबत्ती जळून गेल्यानंतर जे तुकडे उरतात त्यांचा तो संग्रह करून ठेवतो, आणि अशा ७ तुकड्यांची तो एक नवी मेणबत्ती बनवून वापरतो. त्याच्याजवळ सध्यां १८२ तुकडे सांठलेले आहेत. तर त्यानें किती दिवस मेणबत्त्या न आणल्या तरी त्याचे काम भागूं शकेल ? नीट विचार करून उत्तर द्या !


९८ ( वेळ—अर्धें मिनिट

दोन मामा आणि दोन भाचे यांच्यांत ३० रुपये सारखे वांटून द्याव-याचे आहेत. अर्थात् रुपयाचे भाग पाडण्याला सक्त मनाई आहे!

९९ (वेळः—एक मिनिट

एका चौरस [ चारी बाजू समान ] फळीचे आम्हांला करवतानें कापून चार सारखे चौरस तुकडे करावयाचे आहेत. एका सुतारानें एक तुकडा कापून देण्यासाठीं जर एक आणा मागितला, तर फळीचे एकूण चार तुकडे कापण्याकरितां त्याला किती मोल द्यावें?

१०० ( वेळ—एक मिनिट



चित्रांत दाखविल्याप्रमाणें ओळीनें सहा फुलपात्रें ठेवलेलीं आहेत. त्यांपैकीं पहिलीं तीन भरलेलीं आहेत; आणि दुसरीं तीन रिकामीं आहेत. प्रत्येक दोन फुलपात्रांच्यामध्यें पुष्कळ अंतर आहे, आणि कुठलेंहि एक फुलपात्र उचलून दुसऱ्या दोन फुलपात्रांच्या मध्यें ठेवतां येईल. आतां प्रश्न असा कीं, यांपैकीं कुठलेंहि एकच फुलपात्र उचला, आणि तुमच्या इच्छेला येईल तेथें ठेवा; पण नंतर अशी रचना झाली पाहिजे कीं, भरलेलीं वा रिकामीं कोणतीहि एका प्रकारचीं दोन फुलपात्रें एकाजवळ एक येतां कामा नयेत.

१०१ (वेळः—दोन मिनिटे


आमच्या गांवापासून कोपरगांव २४ मैल आहे. कोपरगांवाला प्रत्येक गुरुवारीं बाजार भरतो. गेल्या गुरुवारीं मी दुचाकीवरून कोपरगांवाला गेलों. जातांना वारा समोरून असल्यामुळें माझा वेग ताशीं ८ मैल वेग होता, आणि परत येतांना वारा मागून रेटीत असल्यामुळें त्यावेळीं वेग ताशीं १२ मैल होता. म्हणजे एकूण मी पांच तास दुचाकी चालविली, आणि माझा सरासरी वेग ताशीं $\frac{८+१२}{२}$ = १० मैल पडला.

पुढल्या गुरुवारीं वारा अगदीं पडला होता; आणि म्हणून मी ताशीं १० मैल वेगानेंच गेलों, आणि त्याच वेगानें परत आलों. अर्थात् माझा सरासरी वेग १० मैलच पडला हें उघड आहे, आणि मी एकूण ४ तास २४ मिनिटें दुचाकी चालविली.

आतां मला मुख्यतः असा प्रश्न पडला आहे कीं, दोन्ही वेळेला जर माझी सरासरी गति सारखीच होती (ताशीं १० मैल), आणि दुचाकीनें गांठावयाचें अंतर जर दोन्ही वेळेला सारखेंच होतें, तर माझ्या एकूण दुचाकी चालविण्याच्या वेळांत हा ३६ मिनिटांचा फरक काय म्हणून पडावा ?

१०२ (वेळः—दोन मिनिटें

एक बाई फणस विकीत होती. पहिल्या गिऱ्हाइकाला तिनें जवळच्यांतील निम्मे फणस, आणि वर अर्धा फणस दिला. दुसऱ्या वेळीं आलेल्या गिऱ्हाइकाला उरलेल्या फणसांपैकीं निम्मे फणस दिले, आणि वर अर्धा फणस दिला; आणि तिसऱ्याला उरलेल्याच्या अर्धे फणस, आणि वर अर्धा फणस दिला, आणि मग सर्व फणस संपल्यामुळें ती घरीं परत गेली. या सर्व विक्रीमध्यें एकहि फणस तिनें न कापतां तिनें सारी विक्री केली हें सर्वांत विशेष. तर तिच्याजवळ मुळांत एकूण किती फणस होते ?



१०३ (वेळः—दीड मिनिट

१२ वाजतां घड्याळाचे कांटे एकमेकांवर येतात. १२ तास पुरे झाले म्हणजे पुनश्च १२ वर येतात. तर २४ तासांत एकूण किती वेळां दोन्ही कांटे एकत्र येऊन जातात ? नीट विचार करून उत्तर द्या !

१०४ ( वेळ—दोन मिनिटें

तसेंच मिनिटकांटा उलटा फिरूं लागला, आणि तासकांटा मात्र नेहमींप्रमाणेंच पुढें जात राहिला तर २४ तासांत दोन्ही कांटे किती वेळां एकत्र येऊन जातील ?

१०५ ( वेळ–दीड मिनिट

८।९।१२।१७।२४।३३।४४।५७।७२।८९।

याच मालिकेंतील पुढच्या दोन संख्या तुम्हीं सांगूं शकाल का ?

१०६ ( वेळ–दीड मिनिट

तुमच्या हातांत आम्हीं एकाच प्रकारचीं आठ नाणीं दिलीं. वरून दिसायला, आणि आकाराला सारीं नाणीं सारख्याच प्रकारचीं वाटतात. पण त्यांपैकीं एक नाणें खोटें, आणि म्हणून कमी वजनाचें आहे, तुम्हांला आम्हीं एक उत्कृष्ट तराजू दिला, कीं ज्यामुळें नाण्यांच्या वजनांतील सूक्ष्म भेदही तुम्हांला कळून येऊं शकेल. आतां प्रश्न असा कीं, कोणतें नाणें खोटें, आणि कमी वजनाचें हें या तराजूच्या साहाय्यानें तुम्हीं ओळखूं शकाल का ? 'हो, त्यांत काय ?' असें तुम्हीं म्हणाल. पण आमची मुख्य अट ही आहे कीं, एकूण दोन वेळांपेक्षां अधिक वेळां मात्र तराजू तुम्हांला वापरतां येणार नाहीं. आतां पाहूं तुमचें कौशल्य !

१०७ ( वेळ–दीड मिनिट

सारख्याच आकाराचीं दोन नाणीं एकाशेजारीं एक ठेवलीं, आणि एक नाणें घट्ट धरून दुसरें त्यांभोंवतीं चिकटून फिरविलें. तर फिरविण्यास प्रारंभ केलेल्या जागेपासून त्याच जागीं परत येईपर्यंत फिरणाऱ्या नाण्याचे किती फेरे होतील ?

१०८ ( वेळ–दीड मिनिट

आतां या दोन नाण्यांपैकीं एक नाणें मोठें आहे, आणि दुसरें लहान असून त्याचा व्यास मोठ्या नाण्याच्या निम्मा आहे. मोठें नाणें स्थिर धरून हें लहान नाणें त्यांभोंवतीं फिरविलें तर त्याचे पुनश्च पहिल्या जागी येईपर्यंत किती फेरे होतील ?

१०९ ( वेळ–एक मिनिट

आमच्या गांवच्या जहागिरदारांच्या घरीं अनेक प्रकारचे पशु-पक्षी

आहेत. थोडक्यांत म्हणजे त्यांच्याकडे पशुपक्ष्यांची मिळून ३६ डोकीं आहेत; आणि १०० पाय आहेत. तर प्रत्येकीं पशु-पक्षी किती ?


११०                    ( वेळ–तीन मिनिटें

नवविवाहित मंजुळा नि मकरंद परस्परांवर पूर्ण अनुरक्त होतीं, आणि राजाराणीचा संसार सुखानें चालला होता. एक दिवस मकरंदानें आपला मित्र वसंत यांस जेवावयास बोलाविलें. मंजुळेनें खूप खूप खपून उत्कृष्ट बेत केला होता, आणि म्हणूनच वसंत वहिनीच्या सुगरणपणाची प्रशंसा करीत होता. कांहीं वेळानें वाढणें झाल्यावर मंजुळा जरा आंत गेली तों तिच्या कानीं खालील शब्द आले; म्हणून ती कान टवकारून ऐकूं लागली. मकरंद म्हणत होता, "अरे, जेवणाचा साराच बेत खरोखरीच नामी झाला आहे, पण काय करणार ? ती तेवढी असायला हवी होती. ती नाहीं म्हणून सारें व्यर्थ आहे बघ ! नाहीं का ?" हे शब्द ऐकून मंजुळा चकितच झाली, आणि तिच्या चित्तांत शंकांचें काहूर माजलें. अस्वस्थ चित्तानें पुढील तिचे सारे व्यवहार चालू होते.

दुसऱ्या दिवशीं मकरंद जरा लवकरच कामावरून आला, तों मंजुळा कोणा मैत्रिणीशीं बोलत असल्याचें पाहून बाहेरच थबकला. तों त्याच्या कानीं पुढील शब्द पडले. मंजुळा म्हणत होती, "तें सारें खरें. बंगला न् बगीचा जर मिळाला तर नको आहे कुणाला ? तूं माझी बालमैत्रिण म्हणून खरें तें सांगतें. कसला न् काय. जाऊं दे, तो हवा होता ग आतां, म्हणजे, मग काय नसतें केलें मी ! पण तोच नाहीं त्यामुळें सारं व्यर्थ आहे. बघ काय करणार ?" हे उद्‌गार ऐकून मकरंदहि बेचैन झाला, आणि अनेक विकल्प त्याच्याहि मनांत आले.

दोघांच्या मनाला ज्यामुळें विनाकारण त्रास झाला ते 'तो' आणि 'ती' कोण हें तुम्हीं सांगूं शकाल का ? अर्थात् या 'तो, ती' मध्यें कुणाची आई, बाप, भाऊ, बहीण यांपैकीं कोणीच नाहींत हें निश्चित !

१११ ( वेळ–तीन मिनिटें




सोबतच्या चित्रांत काड्याच्या पेटींतील २७ काड्या घेऊन यांची एक आकृति बनविली आहे. सध्यां या आकृतींत ज्याची बाजू प्रत्येक एका काडीच्या लांबीइतकी आहे असे ७ चौकोन आहेत. आतां प्रश्न असा कीं, यांपैकीं कोठल्याहि तीन काड्या उचला आणि त्या पुनश्च त्यांतच कोठेंहि ठेवून त्यांची अशी आकृति बनवा कीं, आतां ७ ऐवजीं ५ च चौकोन येतील. एका काडीशेजारींच नुसती दुसरी काडी ठेवून चालणार नाहीं. थोडक्यांत म्हणजे प्रत्येक काडीचा उपयोग झालाच पाहिजे, कोठला तरी चौकोन बनविण्यासाठीं, पाहा प्रयत्न करून !

११२ ( वेळ–तीन मिनिटें



"युवराजाकरितां आतां एक बुद्धिमान् खाजगी कारभारी पाहा." अशीं महाराजांची प्रधानजींना आज्ञा झाली. प्रधानजींनीं सर्व खात्यांकडून निवडक १०० मंडळींचीं नांवें मागविलीं, आणि त्यांची एक लेखी परीक्षा घेऊन त्यांतल्या तिघांची निवड केली. 'शेवटची कसोटी माझ्या समक्ष व्हावी.' अशी महाराजांनीं इच्छा प्रदर्शित केल्यावरून त्याप्रमाणें व्हावें असें ठरलें.

"पाहा" प्रधानजी उद्गारले, "तुम्हां तिघांनाहि शंभरांतून निवडून काढलें आहे. आतां मजजवळ या दोन वाट्या आहेत. यांपैकीं एकींत साधें पांढरें गंध आहे, आणि एकींत रक्तचंदनाचें गंध आहे. यांपैकीं कोटल्या तरी एका वाटींतील टिळा मी तुमच्या प्रत्येकाच्या डोक्याला लावीन. तोंपर्यंत तुम्हीं तिघांनीं डोळे मिटावे. त्यानंतर अट अशी कीं, तुम्हांपैकीं कोणाहि एकाच्या कपाळावर तांबडा टिळा दिसला कीं, त्यानें हात वर केला पाहिजे; आणि नंतर आपल्या स्वतःच्या कपाळावर कोणत्या रंगाचा टिळा आहे याचा बोध ज्याला होईल त्यानें हात खालीं करावा.

रीतीप्रमाणें तिघांनीं प्रामाणिकपणानें डोळे मिटले, आणि प्रधानजींनीं तिघांच्याहि कपाळावर तांबडेच टिळे लाविले. अर्थात् तिघांनीं डोळे उघडल्यावर पटापट हात वर केले; आणि तिघांचे टिळे तांबडेच असल्या-मुळें कोणी कोणाकडे पाहून हात वर केला तें समजणें अशक्य होतें. परंतु कोणाचाच हात बराच वेळ खालीं येईना. एवढ्यांतच त्यांपैकीं एकानें आपला हात खालीं केला तेव्हां त्याला महाराजांनीं विचारलें, "काय कोणता टिळा आहे तुझ्या कपाळावर ?"

"तांबडा, महाराज !"

"कसें तें सांग ?" त्यानें सारें निवेदिलें योग्यरीतीनें. तुम्हांला सांगतां येईल का त्यानें कसा काय तर्क चालविला तो ?

वाटतो तितका सोपा नाहीं हं हा प्रश्न ! अवश्य यत्न करून पाहा.

११३ (वेळ—दोन मिनिटें

"तुझ्या खिशांत किती पैसे आहेत ?" म्हणून विचारतां माझ्या एका मित्रानें उत्तर दिलें, "माझ्या खिशांतील पैशाचे जर दोन असमान भाग केले तर मोठा भाग, अधिक लहान भागाचा वर्ग आणि लहान भाग, अधिक मोठ्या भागाचा वर्ग हे दोन्ही सारखेच असतील. सकृद्दर्शनी ही गोष्ट अशक्य नाहीं का वाटत ? मोठ्या भागाचा वर्ग + लहान भाग हा

केव्हांही लहान भागाचा वर्ग + मोठा भाग याहून अधिक असलाच पाहिजे. परंतु त्याचें म्हणणें योग्य आहे हें निश्चित. तर त्याचेजवळ किती पैसे होते? 'क्ष' धरून बीजगणितानें कोडें सोडविणारा अपात्र म्हणून धरला जाणार हें उघड आहे!


११४ (वेळ:—एक मिनिट

केळ्यांचा भाव ३ आणे डझनावरून २॥ आणे डझनावर आला. त्यामुळें केळ्यांचा एकूण खप शेंकडा २० नें वाढला. तर एकूण विक्रीमध्यें किती तूट वा वाढ झाली?

११५ (वेळ—दीड मिनिट


४ रु. ला एक बदक, १ रु. ला एक कोंबडी आणि १ रु. ला चार चिमण्या या भावानें २० रु. ला २० पक्षी आणावयाचे तर कसकसे आणाल?

११६ (वेळ—दीड मिनिट



एक मोटार एका ठराविक गतीनें मार्गावरून जात असतां मैलाचा एक दगड तिनें मागें टाकला. त्या दगडावर ज्या ठिकाणापासून तो रस्ता निघाला होता त्या नगरापासूनचें अंतर लिहिलें होतें, आणि तें दोनच आंकड्यांत लिहिलें होतें. त्यानंतर नेमक्या एक तासानें तिनें दुसरा जो दगड मागें टाकला त्यावर मैल दर्शविणारे तेच दोन आंकडे होते. पण आंकड्यांची उलटापालट झाली होती. आणखी दीड तासानें तिनें जो दगड मागें टाकला, त्या वेळीं त्या दगडावर पहिल्या दगडावर जसे आंकडे होते तसेंच आंकडे होते पण त्या दोन आंकड्यांमध्यें आणखी एक शून्य तेवढें अधिक होतें. तर तीन्ही दगडांवर किती किती मैलांचे आंकडे होते तेवढे सांगाल कां आतां? तसेंच मोटारचा वेग काय होता हेंहि सांगा.

११७ (वेळ:–दीड मिनिट



महिला-वस्तु-भांडारांत तीन प्रकारचे तवे विक्रीसाठीं होते. एकाचा घेर एक फूट, दुसऱ्याचा दोन फूट, आणि तिसऱ्याचा तीन फूट. काल गंगूबाईनीं एक १ फुटी तवा आणला, त्याला २ रु. पडले. त्याहून मोठ्या तव्याची आणखी आवश्यकता भासल्यामुळें त्यांनीं दुसऱ्या दिवशीं गड्यासमवेत ४ रु. देऊन त्याला दोन फुटी घेराचा तवा आणण्यास सांगितलें. परंतु गडी भांडारांत जाऊन असें सांगत परत आला कीं, ४ रु. पुरत नाहींत आणखी चार रु. हवेत. गंगूबाईनीं उत्तर केलें, "अरे, त्यांना सांग आम्हांला दोन तवे नकोत, एकच हवा, आणि म्हणूनच ४ रु. पाठविले." तरी भांडारवाल्याचें समाधान होईना, गंगूबाईनाहि तें पटेना. विचारा गडी हेलपाटे मारून थकला. त्याचे हेलपाटे थांबविण्याचें कांहीं साधन तुम्हांला सांपडतें कां ? दोघांपैकीं कोणाचा हिशेब योग्य ?

११८ (वेळ:–दीड मिनिट


आमच्या जरी अनेक प्रकारच्या जाती उपजाती असल्या, तरी आम्हीं सारेजण एकाच प्रकारची कामगिरी बजावीत असतों, आणि जोंपर्यंत आमच्या नाकांत वेसण पक्केपणीं ओंवलेली आहे, तोंपर्यंत आम्हीं एकनिष्ठपणें धन्याच्या आज्ञेत वागतों, आणि मनापासून त्याची सेवा करतों. गाई, घोडे, बैल यांच्या नाकांत वेसण घातली तर त्यांना ती जाचक होते परंतु आमच्या नाकांत वेसण घातली कीं, आमच्या जिवांत जीव येतो. परंतु आमची वेसण गेली कीं, आम्हीं असून नसल्यासारखेंच होतों, आणि मग काम करण्याची गोष्टच नको ! रावापासून रंकापर्यंत कुठलाही भेदाभेद न करतां आम्हीं साऱ्यांची तितक्याच तत्परतेनें सेवा करतो, आणि आमची आवश्यकता इतकी असते कीं, आम्हीं नसलों कीं, प्रत्येकाला अगदीं सारखें

चुकल्याचुकल्यासारखेंच होतें, आणि आम्हीं पुनश्च कामाला आल्यावांचून लोकांना स्वास्थ्य लाभत नाहीं. आतां झाली ना ओळख? मग सांगा आमचें नांव !

११९ (वेळ—दीड मिनिट

परमेश्वराचें यथार्थ वर्णन करणारें आठ अक्षरी विशेषण तुम्हांला सांगतां येईल का पाहा.

१२० (वेळ:—न मिनिटें




सोबतच्या चित्रांत दाखविल्याप्रमाणें एका कोशाचे तीन खंड ओळीनें ठेवले आहेत. बरेच दिवस नुसतेच पडून राहिले असल्यानें एका किड्यानें पहिल्या खंडाच्या पहिल्या पृष्ठापासून शेवटच्या पृष्ठापर्यंत एक आरपार बोगदा तयार केला. प्रत्येक खंडाच्या प्रत्येक बाजूच्या पुठ्याची रुंदी जर एकअष्टमांश इंच असेल, आणि दोन्ही पुठ्यांसुद्धां प्रत्येक खंडाची रुंदी २ इंच असेल तर आतां प्रश्न असा कीं, किड्यानें केलेल्या बोगद्याची लांबी एकूण किती इंच येईल? नीट विचार करून उत्तर द्या हं !

## विचारून पाहा—

३

"मी म्हणेन त्याच्या पुढचा आंकडा तूं सांग" असें कोणालाहि सांगावें त्यानंतर त्याची अनुमति घेऊन प्रारंभ करावा.

"हं, विचारूं ?"

"पंचवीस" तो उत्तर देईल "सव्वीस"

"एकशें सव्वीस" ,, ,, ,, "एकशें सत्तावीस"

"एक हजार चारशें बारा" ,, ,, ,, "एक हजार चारशें तेरा"

सबंध संख्या न म्हणतां तो जर नुसतें "तेरा" म्हणेल तर तें अमान्य करून त्याला सबंध संख्या सांगावयास लावावी—एक हजार चारशें तेरा ).

"दोन हजार सातशें बत्तीस"

तो उत्तर देईल, "दोन हजार सातशें तेहेत्तीस"

आणि त्यानंतर विचारा, "चार हजार नव्याण्णव"

आणि बहुतेक सर्वजण "पांच हजार" असें उत्तर देतील. ( खरें उत्तर 'एकेचाळीसशें' आहे. )

# नीट सांगा बरं का !

## तुमच्या अष्टपैलू ज्ञानाची चांचणी

**नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।** महा. ६।२८।३८

खरोखर या जगांत ज्ञानाइतकें पवित्र दुसरें कांहींच नाहीं.

### किती ?

ब ) एका आण्याला बाजू किती ?

हु ) नव्या काड्याच्या पेटींत काड्या किती ?

रं ) पांच माणसें जेवायचीं असलीं तर साधारणतः भात टाकाल किती ?

( शिधा-नियंत्रणाची नको भीति ! )

गी ) आंब्याच्या मोजणींतला पक्का शेंकडा म्हणजे किती ?

क ) ऋग्वेदाचीं मंडलें किती ?

र ) स्वतंत्र भारताच्या पंतप्रधानाचें वेतन किती ?

म ) दहा हजार टनी आगबोटींत माल राहील किती !

णू ) पत्त्याच्या डावांत बिनमिशांचे राजे नि गुलाम किती ?

क ) एका वर्तुळांत विकला किती ?

भा ) सायकलच्या चाकाला आरे किती ?

ग ) चंद्राला पृथ्वीसभोंवती प्रदक्षिणा करण्यास वेळ लागतो किती ?

ए ) बुद्धिबळाच्या पटावर चौकटी किती ?

क ) 'बहुरंगी करमणुकी' ची लांबी रुंदी किती ?

### कोण ?

ब ) शरीराच्या मानानें सर्वांत मोठा मेंदू असणारा प्राणी कोण ?

हु ) कादंबरीचा कर्ता कोण ?

रं ) महाराष्ट्रांत महामहोपाध्यांय पदवी मिळविण्याऱ्या व्यक्ती कोण ?

गी ) सर्वांत अधिक काळ जगणारा प्राणी कोण ?

क ) 'तुला जर परमेश्वरानें बुद्धि दिली असेल, आणि तुला जर पुरुषत्वाची कांहीं चाड असेल तर तूं आपल्या जन्मभूमीच्या संतापानें आपली तलवार तापीव आणि अत्याचारानें दुःखित झालेल्यांच्या आसवांचें तिला पाणी दे. ही वेळ आपसांत लढण्याची नव्हे. काम कठीण असेल पण त्यासाठीं हृदय, डोळे आणि हात यांची आवश्यकता आहे. दोन हृदयें एक होतील तर पहाड तोडतां येतील, आणि मोठ्या जमावाच्याहि ठिकऱ्या उडवितां येतील.'

[ वरील तेजस्वी उद्गार काढणारा कोण ? ]

र ) चार पाय असणारा नि आकारानें मोठा असणारा परंतु मुळींच आवाज न करतां येणारा प्राणी कोण ?

म ) 'घारून अकलेचे पवाड । व्हावे ब्रह्मांडाहूनीहि जाड । मग कैंचे आणिले द्वाड । करंटेपण' ।। असें सांगणारा कोण ?

णू ) रेडियमचा शोध लावणारी व्यक्ती कोण ?

क ) यंदांचा निःपात करणारा तेजस्वी ब्राह्मण कोण ?

भा ) मराठींत पहिला शब्दकोश निर्माण करणारी व्यक्ती कोण ?

ग ) पुढील उद्गार काढणारी व्यक्ती कोण ?

'पंचांनीं कांहींहि निकाल दिला तरी मी म्हणतों कीं, मी निर्दोषी आहे. कुठल्याहि गोष्टींचे दैव ठरविणाऱ्या अनेक शक्ती आहेत, आणि ज्या ध्येयासाठीं मी झगडतों आहे त्याचें उर्जित मी मोकळें राहण्यापेक्षां माझ्या बंदिवासांतील क्लेशामुळेंच अधिक घडावें असाच ईश्वरी संकेत दिसतो.'

१) भावार्थ रामायणाचा कर्ता कोण ?

## कोणती ?

च ) दांत चांगले राहण्यासाठीं आवश्यक जीवनद्रव्यें नि खनिजद्रव्यें कोणतीं ?

२५०९१ वा.वा. ११० ५७१३६ शाखा

हु ) जगांत मोठीं सहा बेटें कोणतीं ?

रं ) पेरू नि अंजीर या व्यतिरिक्त साले, गर, बिया इत्यादि सर्वांच्या सर्व ज्याचे आपण खातों असें आपल्याकडील फळ कोणतें ?

गी ) खातांना अधिक हालचाल करणारे दांत कोणते ?

क ) सर्वांत रुंद नदी कोणती ?

र ) 'बी' या कवीचें मूळचें नांव कोणतें ?

म ) चार पुरुषार्थ, चार वर्ण, चार आश्रम, आणि चार मुक्ती कोणत्या ?

णू ) रंग, रूप नि वास असणारें जुन्या वाङ्मयांतील फूल कोणतें ?

क ) खास मराठी वाङ्मयांतच आढळणारीं वृत्तें कोणतीं ?

भा ) दुःखावर औषध कोणतें ?

ग ) गहूं आणि तांदूळ यांपैकीं जगांतील अधिक लोकांचें अन्न कोणतें ?

ए ) तिबेटांतून वाहणारी नदी कोणती ?

क ) ज्याचें वर्गमूळ नि घनमूळ आणि वर्ग आणि घन एकच येतें अशी संख्या कोणती ?

## ६.सें ? कशासाठीं ?

ब ) एकांत एक अडकलेले दोन कांचेचे पेले खूप ओढूनहि निघत नसले तर कसें सुटे कराल ?

हु ) हातावर बांधावयाच्या घड्याळांत कसे सहा काढलेले असतात ? साधे कीं रोमन लिपींत ?

रं ) आफ्रिकन हत्ती आणि हिंदुस्थानी हत्ती वेगवेगळे कसे ओळखाल ?

गी ) पत्त्यांपैकीं आठ्याचे ठिपके कसे दिलेले असतात ?

क ) फुलांचें अत्तर कसें काढतात ?

र ) परदेशांत हिंदुस्थान कशासाठीं प्रसिद्ध आहे ? पांच गोष्टी सांगा.

म ) इंद्रधनुष्यांत रंग कसकसे असतात ?

णू ) उशी कशासाठीं घेतात ?

क ) भांड्यांना अल्हई कशासाठीं लावतात ?

भा ) उंच पायाच्या प्राण्यांना लांब मान कशासाठीं असते ?

ग ) शस्त्रक्रियेच्या वेळीं क्लोरोफॉर्म कशासाठीं वापरतात ?

ए ) कुटलेल्या चिंच्यांचा उपयोग कशासाठीं करतात ?

क ) झाडें, फळांतील गर कशासाठीं निर्माण करतात ?

## केव्हां आणि कोठें ?

च ) गॅस-मास्क प्रथमतः केव्हां उपयोगांत आला ?

डु ) पुढील गोष्टींना केव्हां महत्त्व असतें ? :—(१) दूर्वा; (२) कडुलिंब; (३) आपट्याचीं पानें; (४) धने-गूळ; (५) कवठ; (६) ओंब्या, ऊंस, आवळे, चिंचा, बोरें; (७) दह्याची हंडी; (८) कांदा; (९) सुगंधी तेलें, उटणीं.

रें ) 'सागराला एक वेळ आकाशाची उपमा देतां येईल; किंवा आकाशाला एक वेळ सागराची उपमा देतां येईल परंतु'............ वरील वाक्य केव्हां आणि कोठें आलें आहे ?

गी ) गाईला कोठें घाम येतो ?

क ) सर्वांत अधिक मोटारी कोठें ( म्हणजे कोणत्या यंत्रालयांत ) तयार होतात ?

र ) भूमि आणि पाणी यांपैकीं प्राणीमात्र प्रथमतः कोठें जन्मास आले ?

म ) सर्वांत अधिक सोनें सध्यां कोठें (देश) आहे ?

णू ) सर्व जगताची हालचाल केव्हां बंद झाली होती ? ( पौराणिक प्रसंग सांगा ).

क ) दंव केव्हां पडतें ? आकाश निरभ्र असतांना कीं मेघमय असतांना ?

भा ) शिवप्रभूचे पुत्र संभाजीराजे यांचे तिसरें लग्न केव्हां झालें ?

ग ) दुसरें महायुद्ध केव्हां चालू झालें ?

ए ) पृथ्वीवर सर्वांत अधिक उष्णतामान कोठें सांपडतें ?

क ) बहुरंगी करमणूक नक्की कोठें मिळेल ?

## काय आणि काय ?

ब ) मुंगीला अपघात नि रोगराई न झाल्यास ती चार पांच वर्षे जगते काय ?

हु ) रात्रीच्या राणीच्या फुलांचें अत्तर काढलें तर त्याचा फक्त रात्रीच वास येईल काय ?

रं ) ढग आणि धुकें मूलतः एकच आहेत काय ?

गी ) साखरेचा वापर हेंच चालू काळांतील माणसांचे दांत किडण्याचे मुख्य कारण असें शास्त्रज्ञांना वाटतें काय ?

क ) झाडांच्या वाढीवर चंद्राचा कांहीं परिणाम होतो काय ?

र ) प्रकाशवर्ष म्हणजे काय ? तें कालाचें माप आहे काय ?

म ) भाकरी तव्यावर टाकल्यानंतर पाणी फिरवण्याचें कारण काय ?

णू ) लिंबाच्या रसाबरोबर वा दुधाबरोबर चहा घेतात. वैद्यकीय दृष्ट्या बरें काय ?

क ) एक रुपयाची नोट नि पांच रुपयाची नोट यांत एकीचा आकार दुसरीच्याहून मोठा आणि एकीचे मोल दुसरीच्या पांचपट असण्या-व्यतिरिक्त आणखी भेद काय ?

भा ) शिमगा शब्दाचा मूळ अर्थ काय ?

ग ) एक घनफूट पाणी नि एक घनफूट बर्फ यांत अधिक वजनदार काय ?

ए ) नांदी म्हणजे काय ?

क ) 'बहुरंगी करमणूक' या पुस्तकानें तुमच्या पैशाचा आणि वेळाचा पुरेपूर मोबदला दिला आहे. असें तुम्हांस वाटतें काय ?

# काव्यकूटें

आत्मनः परितोषाय कवेः काव्यं तथापि तत् ।
स्वामिनो दहलीदीप सममन्योपकारकम् ॥ १ ॥

अर्थः——कवि स्वतःच्या आनंदासाठीं काव्य करतो; परंतु स्वतःच्या दिण्डीत लावलेल्या दिव्याचा दुसऱ्यास जसा उपयोग होतो; (तसेंच काव्य हेंही दुसऱ्यास आनंदित करतें).

*** *** ***

जुन्या संतवाङ्मयांत गूढगुंजनात्मक आणि विसंगतिसदृश परंतु अर्थबोधक अशीं अनेक मनोरंजक कूटें आढळलीं. तीं येथें दिलीं असतां त्या काळच्या लोकांची या विषयांसंबंधींची अभिरुचि समजून येण्यासारखी आहे. वर वर पाहतां विसंगत, परंतु विशिष्ट दृष्टीनें यथार्थ अशीं हीं कूटें आहेत.

कांट्याच्या अणीवर वसलीं तीन गांवें ।
दोन ओसाड, एक वसेचि ना, वसेचि ना ॥ १ ॥
वसेचिना तेथें आले तीन कुंभार ।
दोन थोंटे, एक घडेचि ना, घडेचि ना ॥ २ ॥
घडेचि ना, त्यानें घडलीं तीन मडकीं ।
दोन कच्चीं, एक भाजेचि ना, एक भाजेचि ना ॥३॥
भाजेचि ना त्यांत घातले तीन मुगे ।
दोन कच्चे, एक शिजेचि ना, एक शिजेचि ना ॥४॥
शिजेचि ना तेथें आले तीन पाहुणे ।
दोन रुसले, एक जेवेचि ना, एक जेवेचि ना ॥ ५ ॥
जेवेचि ना त्याला दिले तीन रुपये ।
दोन खोटे, एक वाजेचि ना, एक वाजेचि ना ॥६॥

वाजेचि ना तेथें आले तीन पारखी ।
दोन आंधळे, एक दिसेचि ना, दिसेचि ना ॥ ७ ॥
दिसेचि ना त्याला दिल्या तीन बुक्या ।
दोन हुकल्या, एक लागेचि ना, एक लागेचि ना ॥८॥
ज्ञानदेव म्हणे जाण तेची खूण ।
सद्गुरुवांचोनी कळेचि ना, कळेचि ना ॥ ९ ॥

—x—

मेलें जित्यासी सांगे गोष्टी । अंधळे ओवी सुवर्णाच्या गांठी ।
पांगुळ लागे पवनाच्या पाठी । बाळका पोटीं माय वाढे ॥ १ ॥
थोट्यानें धवलार रचियलें । मुके पुराण सांगू बसले ।
सर्वेचि बहिरे ऐको ठेले । वेडे हंसले शहाण्यांसी ॥ २ ॥
आणिक एक नवल सांगू काई । जीत वाघ शलभानें भक्षिला पाहि ।
मुंगीनें पर्वत उचलिला बाहीं । माशी करी साही सूर्यासी पै ॥ ३ ॥
मृदंगें वाहिला गुरव राणा । वांझेच्या स्तनीं संचरला पान्हा ।
माथीं फुलें खोऊं नाचे दवणा । जाण सुजाणा न कळेंचि ॥ ४ ॥
मरकुटें सगळा सागर सोशिला । माशानें पारधी मारिला ।
सशानें सिंह भोवंडिला । वेदपुरा न कळेचि ॥ ५ ॥
हें तुम्ही म्हणाल उमानें । हें तव उफराटे दृष्टी पाहणें ।
विष्णुदास नामा म्हणे । अनुभवी या खुणा जाणती ॥ ६ ॥

( नामदेव गाथा—२१२२ )

—x—

आम्हीं लटकें न बोलूं, खरें नच सांगूं ॥ ध्रु० ॥
मुंगी व्याली, शिंगी झाली तीचें दूध किती ।
सतरा रांजण भरून गेले, प्यायले बारा हत्ती ॥ १ ॥
लटिके गेले कटके तेथें, गाडग्यायेवढे राळे ।
उडत चिमणी चरत चाले, तिचे वाटीयेवढे डोळे ॥ २ ॥

शेळी करी घुसळण तेथें मांजर काढी लोणी ।
उंदीर गेले देशांतरा ताकें भरल्या गोणी ।। ३ ।।
पाण्यांत कासव गीत गातें, कडेस कोल्हा नाचे ।
सावज मनीं संतोषला, खेकड पुस्तक वाचे ।। ४ ।।
कांतणी घरीं लग्न लागलें, सरडा कणीक कांडी ।
वागुल वंध्या कण्या परणी, घुब्रड मांडे रांधी ।। ५ ।।
बाभुळीचे खोडीं माशानें हो केलें कोटें ।
सशानें हो सिंह ग्रासिला, बेडूक आले लोटे ।। ६ ।।
विष्णुदास नामा म्हणे ऐका त्यांची ख्याति ।
लटके म्हणतिल त्यांचे सारे पूर्वज नरका जाती ।। ७ ।।

(नामदेव गाथा)

—×—

नाथाच्या घरची उलटीच खूण । पाण्याला बाई लागली तहान ।
आंत घागर बाहेर पाणी । पाण्याला पाणी आलें मिळूनी ।
आजी म्यां एक नवल देखिलें । वळचणीचं पाणी आढ्याला गेलें ।
शेतकऱ्यानें शेत पेरिलें । राखणदाराला तेणें गिळिलें ।
हांडी खादली भात टाकिला । बकऱ्यापुढें देव कापिला ।
एका जनार्दनीं मार्ग उलटा । जो जाणे तो गुरुचा बेटा ।।

( एकनाथी गाथा–३८१४ )

—×—

आम्ही नवल देखिलें भाई । मुंगीनें हत्तीशीं केली लढाई ।
उंटाचा कान धरूनि चिमाई । घरोघरीं खातसे ।। १ ।।
सांगा आमुचें कोडें । लांडग्यासाठीं शेळी रडे ।
कोल्हें हांसतें बापुडें । उंदीर रेडे खेळती ।। २ ।।
वरले गांवींचा एक हात्ती । नित्य खातो प्रजापती ।
सिंह येतो तया काकुळती । हंस रुसे काकाप्रति ।। ३ ।।

एका जनार्दनाचें कोडें । उगवी तोचि वेडें ।
शहाणे त्यासी नुमगे गाढें । अर्थ पाहतां चुके लिगाडें ॥ ४ ॥

( एकनाथी गाथा–३८१५ )

—×—

सासूचें आधीं सून जन्मली । सून मारून सासू नोवरी झाली ॥१॥
आचोजी चोजवितलें । ते स्वर्गीं जाणवलें रे भाई ॥२॥
पुत्र पितयाचा व्रतबंध करी । वांझ सासू, कन्यादान दे नोवरी ॥३॥
सिद्धांताचें वर्म अनुभवी जाणें । वटेश्वर चांगा बोलिला खूणें ॥४॥

( चांगदेव अभंग–६७).

—×—

मुंगी उडाली आकाशीं । तिनें गिळिलें सूर्यासी ॥ १ ॥
थोर नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसवला ॥ २ ॥
विंचू पाताळाशीं जाय । शेष त्याचे वंदी पाय ॥ ३ ॥
माशी व्याली घार झाली । देखोनि मुक्ताई हांसली ॥ ४ ॥

(मुक्ताबाई अभंग–२९).

—×—

खरें बोले तो नरकीं पडे । लटकें बोले तो वैकुंठीं चढे ।
लटकें बोले तो अमृत चाखे । खरें बोले तो लागे भीके ।
लटकें बोले तो अमर झाला । खरें बोले तो जिताचि मेला ।
लटकें बोले त्या होय सुख । खरें बोले तो पावे दुःख ।

आणि या साऱ्याचा इत्यर्थ शेवटच्या ओळींत देतात—

हरी म्हणे लटकें कळें तेचि ब्रह्म होती निखळे ॥

# कुठें आहे चूक ?

खालीं दिलेल्या वाक्यांतील कांहीं वाक्यें विसंगत आणि असमंजपणाचीं आहेत. त्यांचें परीक्षण करा. जीं वाक्यें योग्य व अचूक आहेत; तीं 'योग्य' इतकेंच सांगा. परंतु, जीं वाक्यें असमंजसपणाचीं व विसंगत आहेत त्यांचीं कारणेंहि सांगा. एखादें वाक्य असमंजस आहे हें ध्यानांत येणें सोपें आहे. पण तें तसें कां आहे हें नेमकें सांगणें पुष्कळदां कठीण जाईल तुम्हांला. प्रत्यक्ष यत्न केला म्हणजे कळेल तें !

(१) ज्याच्या बाजूला सत्य आहे, असा एक मनुष्यसुद्धां बहुमत प्रस्थापित करूं शकतो.

(२) एका मनुष्यासंबंधानें त्याच्या मित्रानें पुढीलप्रमाणें मत प्रदर्शित केलें, "या मनुष्याला अद्याप कांहीं मूलबाळ झालेलें नाहीं; त्यांच्या मुलांत हा गुण अनुवंशिक परंपरेनें चालत आलेला दिसतो. माझ्या एकंदर निरीक्षणावरून मला तसें निश्चितपणें वाटतें."

(३) एका अन्नमंत्र्यानें विधिमंळांत भाषण करतांना सांगितलें कीं, "जीवनाला आवश्यक वस्तूंचेंच उत्पादन करणें इष्ट असल्यामुळें अनवश्यक पदार्थांचें उत्पादन आपण थांबविलें पाहिजे. धान्यनिर्मिचा प्रश्न जिव्हाळ्याचा म्हणून प्रथमतः हाताळला पाहिजे. जमिनीचा प्रत्येक एकर आपण लागवडीला आणला पाहिजे; मग तो किती का लहान असेना ! पराकाष्ठेचे यत्न करून सर्वत्र धान्याचेंच उत्पादन केलें पाहिजे."

(४) एका गृहस्थानें आपल्या मुलाच्या पत्रांत लिहिलें होतें, "हे पद्दा, या पत्रासमवेत मी दहा रुपयांची नोटहि टांचणी लावून पाठवीत आहे; तुला हें पत्र न मिळालें तर तात्काळ तार करून तसें कळव, म्हणजे मी मनीऑर्डर करीन पुन्हां."

(५) एक म्हातारी बाई एकदां म्हणाली कीं, "अलीकडे मी इतकी वृद्ध झालें आहे कीं, चाळीस वर्षांपूर्वीचें माझें वय आतांच्या निम्म्यानें भरेल !"

(६) वेडी आशा ही बहुधा फोल आशाच नक्की ठरते.

(७) एक गृहस्थ बरेच दिवसांनीं आपल्या मूळ गांवीं गेले. तेव्हां त्यांच्या परिचितांपैकीं प्रत्येकानें त्यांना आपल्याकडे उतरण्यास येण्याचें निमंत्रण केलें आणि त्याचा स्वीकार करतांना, "पुढच्या वेळीं इथें येईन तेव्हां प्रथम तुमच्याकडेच उतरेन." असें उत्तर त्यानें सर्वांना दिलें.

(८) एका सूर्योदयासून दुसऱ्या दिवशींच्या सूर्योदयापर्यंतचा एकाद्या मनुष्याचा प्रत्येक तासांतील वर्तनक्रम जर मी पाहिला तर तो मनुष्य कोणत्या प्रकारचा आहे हें मला सांगतां येईल.

(९) कांहीं वर्षांपूर्वीं एका प्रसिद्ध गणितज्ञानें असा विचार पुढें मांडला कीं, आठवड्याच्या प्रारंभीं येणारा रविवार आपण जर आठवड्याचे मध्य-भागीं ढकलला तर त्यामुळें आठवड्याचे दोन भाग पाडतां येतील आणि रविवारची सुट्टी त्यामुळें अधिक कारणी लागेल.

(१०) आमच्या शेजारचे गबाजीपंत अत्यंत चिक्कू होते. प्रत्येक वर्षीं पंचांगसुद्धां ते विकत घेत नसत. पंचांगाचा आणा अर्धा आणा ते वांचवीत, आणि तितकीच आवश्यकता पडेल तेव्हां आमचेकडील पंचांगाचा तिथी-मुहूर्त पाहण्यास उपयोग करीत. त्यांच्या या वर्तनासंबंधीं त्यांना विचारतां ते म्हणाले, "असें पाहा राजाभाऊ, मी पंचांगासाठीं एक आणा खर्च केला, आणि तें वर्ष पुरें होण्याच्या आंतच मी मेलों, तर मग माझे पैसे विनाकारण वायां नाहीं का जाणार? ते पैसे मग निरुपयोगीच नाहीं का ठरणार?"

(११) "शेजारच्या दुकानदारांकडून कोणीही माल घेऊं नका. तुम्हांला अपुरं, आणि खोटें माप मिळेल. कारण त्यांनीं आत्तांच आमचा तराजू मागून नेला आहे. आम्हीं मात्र चोख माल देऊं."

(१२) आपली सोन्याची आंगठी हरवल्याचें सांगत मुलगा रडत रडत बापाकडे आला. बापानें त्याजकडे पाहून म्हटलें, "वेड्या, सोन्याचा भाव किती कडाडला आहे! कोण महागाई आहे! आंगठ्या हरवण्याचे का दिवस आहेत हे! बरं जा रडूं नको."

(१३) "आमच्या 'काटकसर' चुली विकत घ्या आणि निम्में जळण वांचवा." अशी जाहिरात वाचून किशाभाऊंनीं दोन 'काटकसर' चुली विकत आणल्या. हेतु हा कीं, दोन चुलींमुळें सर्वच जळणाचा खर्च वांचेल.

(१४) सभ्य गृहस्थ कोण ? कारणांवांचून उगीचच जो उद्धट वर्तन करीत नाहीं तो ?

(१५) सुधारक गणपतरावांनीं आपल्या विधवेच्या बहिणीशीं लग्न केलें होतें. ते प्रत्येक वेळीं म्हणत, "एकाद्याला वाईट बहीण असली तो त्याच्या दुर्दैवाचा भाग म्हणतां येईल, परंतु त्याची बायको जर वाईट असेल, तर तो त्याच्या स्वतःच्याच चुकीचा परिणाम आहे."

(१६) सारख्या मागें पडणाऱ्या वा सारख्या पुढें जाणाऱ्या घड्याळ्यापेक्षां खेळांतलें घड्याळ वेळ दाखविण्याच्या दृष्टीनें तरी अधिक चांगलें. कारण, २४ तासांतून निदान दोन वेळां तरी तें अचूक वेळ दाखवितें. पुढें जाणारें वा मागें राहणारें घड्याळ एकदांहि अचूक वेळ दाखवीत नाहीं.

(१७) पदार्थविज्ञान शास्त्राचे एक विख्यात प्राध्यापक सांगूं लागले, "आतां आपण दंवासंबंधींची माहिती पाहूं. रात्रीच्या शेवटच्या प्रहरीं म्हणजे पहांटे दंव पडतें.

(१८) एका राजाला स्तुति आवडत नसे. 'माझी स्तुती करुन मला प्रसन्न करण्याचा कोणी प्रयत्न करूं नये, तो व्यर्थ होईल. उलट माझ्या कोपाला तो पात्र होईल' असें तो म्हणे. परंतु एका बुद्धिमान् मंत्र्यानें 'महाराजांना स्तुति कधींहि आवडत नाहीं.' असें म्हणून त्याला प्रसन्न करुन घेतलें.

(१९) क्रमांक ९ चें कोडें आमच्या छोट्या बालमित्रानें पाठविलें आहे.

(२०) चंद्र हा पांढऱ्या बर्फाचा केलेला आहे.

किंवा

चंद्र हा पांढऱ्या बर्फाचा केलेला नाहीं.

या दोहोंपैकीं एक वाक्य खरें आणि एक खोटें असलेंच पाहिजे.

आतां आपल्याला निश्चित ठाऊक आहे कीं, चंद्र हा पांढऱ्या बर्फाचा केलेला नाहीं, आणि म्हणून—

चंद्र हा पांढऱ्या बर्फाचा केलेला आहे,

असें पहिल्या म्हणण्यावरूनच आपोआप सिद्ध होतें.

(२१) हिमालय पर्वतावर बर्फ पडतें. त्याचे सांचून सांचून मोठमोठे हिमखडे निर्माण होतात. उन्हाच्या उष्णतेनें आणि इतर कांहीं कारणानें त्या डोंगरापासून सुट्या होऊन खालीं येतात. उष्णतेमुळें पूर्णपणें वितळलेल्या कित्ती तरी हिमशिला आपल्याला हिमालयाच्या पायथ्याशींच वाहत असणाऱ्या कांहीं नद्यांमध्यें पाहावयास सांपडतात.

(२२) प्रौढी मिरविणें मला आवडत नाहीं. कारण मला ठाऊक आहे कीं, माझ्या खरोखर हुशारीपेक्षां माझी हुशारी घड निम्म्यानेंसुद्धां नाहीं.

(२३) टांगेवाल्यानें घोडा इतक्या वेगानें पिटाळला कीं, त्यामुळें टांग्याला बसणाऱ्या धक्क्यानें टांग्यांतल्या दोन्ही प्रवाश्यांचीं डोकीं वरच्या टपाच्या दांडीवर जोरानें आदळलीं. तेव्हां एक प्रवासी म्हणतो, "काय रे बाबा, आम्हांला पुरता ठार मारण्याचा विचार आहे कीं काय तुझा? जरा धीरे धीरे जाऊं दे राजा!"

(२४) सदोबांवर रस्त्यांत मारामारी करण्याच्या आरोपावांचून पोलिसानें खटला भरला. ओळीनें पांच साक्षीदारांनीं सदोबांना मारामारी करतांना पाहिल्याचें शपथपुरस्सर सांगितलें. त्यावर सदोबा म्हणाले, "पांचच काय, मी पन्नास साक्षीदार आणतों, आणि तेहि शपथपूर्वक सांगतील कीं, त्यांनीं मला मारामारी करतांना पाहिलें नाहीं म्हणून! साक्षीदारांना काय तोटा?"

(२५) गोविंदजींनीं गाढवाला उकिरड्यावर मनसोक्त लोळतांनां बघितलें; तेव्हां अर्धवट स्वगत, अर्धवट मोठ्यानें ते म्हणाले, "या प्राण्याचें गाढव हें नांव अगदीं सार्थ आहे."

(२६) रविंद्रनाथ ठाकूर, आणि मोतीलाल नेहरू दोघेहि एकाच दिवशीं जन्मले अर्थात् दोघांचा वाढदिवस एकाच दिवशीं येणार हें उघड आहे.

(२७) पहांटे उठलेल्या रमाकाकूंना दिवा लावण्यासाठीं काड्याची पेटी सांपडेना, म्हणून निजलेल्या यमूला हांक मारून त्या म्हणाल्या, "यमू, अग काड्यापेटी कुठें ठेवलीस ? मला सांपडत नाहीं." त्यावर यमू उत्तर करते, "अग आई, दिवा लाव म्हणजे दिसेल नीट कुठें आहे ती ! "

(२८) आगगाडीच्या एंजिनाचा एक ड्रायव्हर आम्हांला नेहमीं आपला अनुभव सांगतो कीं, "माझ्या गाडीला जितके अधिक डबे जोडावे तितकी ती अधिक वेगानें पळते."

(२९) मनोरमाबाई आपल्या पतीच्या कोटाला गुंड्या लावतांना पतीकडे पाहून मोठ्या दिमाखानें म्हणतात, "काय बाई तरी, तुमचा शिंपी किती अजागळ ! आत्तांच पहाना, हेंच बटन मी तिसऱ्यांदा या कोटाला लावतें आहे: अगदींच अजागळ मेला ! "

(३०) जुन्या काळीं आडनांवें सांगण्याची प्रथा नसे. 'अण्णाजी दत्तो', 'बाळाजी बाजीराव', 'खंडो बल्लाळ', 'नारो त्रिंबक' याप्रमाणें बहुधा नांवें असत.

(३१) त्यांच्या बैठकीला उशीरा प्रारंभ झाला. परंतु सूर्यास्ताच्या आंत बैठक आटोपणें भाग आहे, असें कळल्यावरून त्यांनीं सभागृहांतील घड्याळच मागें करून ठेवलें आणि त्यांचा बेत सिद्धीस गेला.

(३२) बंगाल प्रांत हिंदुस्थानांत आहे. कलकत्ता बंगाल प्रांतांत आहे. म्हणून कलकत्ता हिंदुस्थानांत आहे. तसेंच बंगाल हिंदुस्थानांत आहे पण मुंबई बंगालमध्यें नाहीं, म्हणून मुंबई हिंदुस्थानांत नाहीं.

(३३) आईनें रामूला उठविण्यासाठीं हांक मारली आणि त्यावेळीं ती म्हणाली, "हं बाळ रामू, जागा झालास का ? जागा झालास म्हणजे मला सांग हं ! "

(३४) 'मी अंगांत कोट घालतों' असें म्हणणें वस्तुतः चुकीचें आहे. अंगांत कोट नव्हे, तर आपण कोटांत अंग घालतों खरोखर.

(३५) त्या शस्त्रधारी माणसानें प्रथम बकऱ्याचे कान धरून त्याला वर उचललें, आणि परीक्षण केल्यानंतर त्याचा देवापुढें बळी दिला. 'बळी तो कान पिळी' याचेंच हें प्रत्यक्ष उदाहरण नव्हें का ?



(३६) "सूर्यापेक्षां मला चंद्र अधिक आवडतो; कारण मुख्यत: रात्रीच आपल्याला प्रकाश हवा असतो; आणि तो चंद्रामुळें मिळतो. सूर्य उगीच दिवसा उगवतो."

(३७) या विहिरींत पाणी कमी आहे म्हणून ती उथळ आहे, आणि ज्या अर्थीं विहीर उथळ आहे त्या अर्थीं ती खोल असणें शक्यच नाहीं.

(३८) "पर्वतांपेक्षां त्यांचीं शिखरें अधिक उंच असतात एवढेंसुद्धां त्याला कळूं नये अं !"

(३९) लेखन-वाचन शिकविण्यासाठीं शाळा काढाव्या लागतात; पण शिव्या शिकविण्याची शाळा नसतांना त्या मात्र सर्वांना येतात हा मोठाच चमत्कार नव्हे कां ?

(४०) "कांहीं घाबरूं नका. तुमच्या अवचित डोकेंदुखीवर मजजवळ रामबाण उपाय आहे. डोकें दुखूं लागण्यापूर्वीं पंधराच मिनिटें ही गोळी घ्या. सारें दु:ख पळून जाईल मग !"

(४१) "वैद्यबुवा सत्वरच झोंपेच्या गोळ्या पाठवितों असें सांगून गेले. अद्याप त्यांचा कांहींच पत्ता नाहीं. त्यांच्याकडे जाऊन विचार कीं, तुमच्या गोळ्यांची वाट पाहात मी रात्रभर जागत बसूं कीं काय ?"

(४२) "मनुष्याच्या बोलण्यापेक्षां त्याच्या क्रियेवरून त्याच्यासंबंधीची अटकळ बांधावी असें तुम्हीं म्हणतां. पण आम्ही म्हणतों कीं, बोलणें हीसुद्धां एक क्रियाच नव्हे का ? मग त्यावरून त्या माणसासंबंधीं अटकळ बांधली तर मग तुमच्याच म्हणण्याप्रमाणें आमचें कुठें चुकलें बुवा !"

(४३) "हो, मला कानडी समजतें. पण मराठींतून बोलाल तरच;"

(४४) "तुमच्या संस्थेंत अर्धे लोक कार्यप्रवण आहेत. आमच्या संस्थेंत नेमका याच्या उलट प्रकार आहे बघा."

(४५) "या पुस्तकांत दिलेलीं असमंजसपणाचीं वाक्यें मला कळतात; पण त्या सर्वांचीं कारणें अचूकपणें सांगण्याइतका मी बुद्धिमान् नाहीं हें कळण्याइतका तरी मी निश्चित बुद्धिमान् आहे."

(४६) या घोडा चोरणाऱ्या माणसावर आरोप शाबीत होण्याइतका पुरेसा पुरावा नाहीं. अर्थात् म्हणून त्याला निर्दोषी समजून सोडून द्यावें. कारण दहा दोषी माणसें सुटलीं तरी चालेल; परंतु एकाही निर्दोष माणसाला शिक्षा होणें योग्य नाहीं असा न्यायदानाचा नियम आहे."

(४७) या बागेंत प्रवेश करण्यास 'प्रवेश-पत्रिका' दाखवावी लागते. 'प्रवेश-पत्रिका' देणारे अधिकारी पलीकडच्या घरांत असतात. तेथें जाऊन ती पत्रिका घेऊन या. 'प्रवेश-पत्रिका' न दाखविल्यावांचून आंत सोडलें जाणार नाहीं.

(४८) एका धनगरानें 'आपल्या एकूण किती मेंढ्या आहेत; त्या मोजून ये,' असें आपल्या मुलाला सांगितलें. मुलगा परत येऊन सांगूं लागला, "बाबा प्रत्येक मेंढीच्या पाठीवर थाप मारून मी मेंढ्या मोजल्या, त्या ९९ भरल्या. पण त्यांपैकीं एकच मेंढी माझ्या हातीं सांपडली नाहीं. तेव्हां तिला मोजण्याकरितां मी उद्यां सकाळीं जाईन आतां."

(४९) सैन्यांत गेलेल्या एका मुलानें आपल्या वडिलांना पत्र लिहिलें तें पत्र फोडून वाचतां त्यांत पुढील वाक्यें होतीं—

ती. रा. रा. बाबांना शि. सा. नम. वि. वि.

तुमच्या सांगण्याप्रमाणें तुमचें मला आलेलें पत्र परत पाठविण्यास मी विसरलों. तरी त्याकरितां रागावूं नये. पुढील पत्रांत मात्र तुमचें पत्र मी अवश्य परत पाठवीन. रागावूं नये. प्रकृति चांगली. काळजी नसावी. सौ. आईस नमस्कार. कळावें, ही विज्ञा.

आपला,
गोविंद.

(५०) पुढील परिच्छेदांतील अशुद्धितें आणि चुक्या सुधारतां येतील कां तुम्हांला ?

सुप्रसिद्ध स्त्री-लेखिका सौ. कुमुदिनीबाई काळे, आमच्या आईची बालमैत्रीण काल सायंकाळीं ५ च्या सुमारास अचानकपणें येऊन उभ्या राहिल्या. त्यावेळीं आई चपला पायांत घालून बाहेर जाण्याच्या बेतांत होती. त्यांना आलेल्या पाहून आई आनंदून एकदम पुढें झाली, आणि 'सुस्वागतम्' म्हणत त्यांचा हात धरून ती त्यांना आंत घेऊन आली. अनेक वर्षांनीं झालेली भेट, तेव्हां गप्पागोष्टींना भर न आला तरच आश्चर्य ! "कांहीं नवीन लिखाण अलीकडे ? " आईनें पृच्छा केली. 'हो, 'अरवली पर्वत आणि सह्याद्रि पर्वत' या नांवाचा नवा लेख लिहिलाय् मी ! एकजण राणाप्रताप नि दुसरा शिवाजीची थोरवी गातो असा भाग आहे त्यांत ! " इतक्यांत आई कांहींसें आठवून तांदूळ निवडीत बसलेल्या धाकट्या बाबीला म्हणाली, "बाबी, तुला बाहेर जायचे असलें तर जा मैत्रिणीकडे, मी कांहीं नाहीं जात. आण, मीच करते तें काम बोलतां बोलतां." असें म्हणत आई उठली, आणि सूप घेऊन बाहेर येऊन बसली. त्यानंतर विषय निघतां निघतां आई म्हणाली, "अग, आपल्या वर्गांत यमू होती ना ती तुला फार नांवें ठेवते, आणि तुझ्या लेखनाला 'ढंग' म्हणते. नेहमीं मी तिला म्हणतें कीं, तूं कुमुदिनीच्या अपरोक्ष कां निंदा करतेस तिची ? चार दिवस आहेस ना तूं मग गांठ घालून देईन, आणि सांगेन बोल आतां समक्षच."

आई इतकें म्हणते तों शेजारच्या देवळांत आरतीच्या वेळच्या घंटा वाजू लागल्या. तेव्हां पाहुण्याबाईनीं विचारलं, "कोणाच्या देवाचें देवालय आहे शेजारीं ! "

"मुरलीधराचें." आई म्हणाली. त्यानंतर दोघी देवदर्शनास गेल्या. मीहि त्यांच्यासवें गेलों. देवाचें ध्यान पाहून कुमुदिनीबाई प्रसन्न मनानें म्हणाल्या, "काय सुरेख ध्यान साधलं आहे. पण तांबड्या पितांबरापेक्षां पिवळा पितांबरच अधिक शोभेल या मूर्तीला ! "

पुढें देऊळ पाहतां पाहतां भिंतीवरील जुन्या चितारलेल्या चित्रांकडे पाहून त्या म्हणाल्या, "कशी सुरेख कला आहे ! जुन्या काळच्या आपल्या स्वराज्यांत कला कशी विकसित झाली होती याचा हा पुरावा पहा. पण आतां कोण काळजी घेतो ? पुजारी पोटाच्या मागें, कारण राजाश्रय संपला ! परवशता दुसरा नरक आहे ! इतक्या सुंदर कलेचें नांवसुद्धां कांहीं काळानंतर नामशेष होऊन जाईल." त्यांच्या मुद्रेवर विषाद स्पष्ट दिसत होता; आम्ही घरीं परतत होतो तेव्हां.

घरीं आल्यावर एकीकडे भाजी चिरतां चिरतां आई त्यांच्याशीं बोलूं लागली. आई एवढी सराईत, पण चुकून हात निसटला, आणि तिच्या डाव्या हाताची करांगुली कापून रक्त वाहूं लागलें. घरगुती उपाय म्हणजे हळद. हळद दाबून चिंधी बांधतांच ठीक झालें. मग बोलण्यीं, जुनीं अल्पमोलीं औषधें, आणि नवीं खर्चिक औषधें यांवर आलीं. "साधं गाईचं गोमुत्रच घ्या कीं, विनामूल्य असून किती रोगांवर चालतं. अंगांतली कडकी काढते, शौचाला साफ करतें, भूक वाढवितें आणखी काय होत नाहीं म्हणतां ? " कुमुदिनीबाई म्हणाल्या, आणि मग आई सध्यांच्या मुलींच्या चवचाल वर्तनावर घसरली, "कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. आपलं 'मनःपूतं समाचरेत् ।' पावित्र्य नाहीं. मनाला येईल तसं स्वैर वागतात हो अगदीं."

यानंतर अंधार पडल्यामुळें सौ. काळे घरीं परतल्या.

---

१

१ शंकरासि पुजिलें सुमनानें[१] ।

२ शंकरासि पुजिलें सुमनानें[२] ।।

३ शंकरासि पुजिलें सुमनानें[३] ।

४ शंकरासि पुजिलें सुमनानें[४] ।। १ ।।

१ सुमन–चांगलें मन. २ सुमन–सुमन नांवाचा मुलगा. ३ सुमन–गहूं. ४ सुमन–पुष्प.

२

१ कीर्तनासि नर हो तुम्हि जागा ।
२ कीर्तनासि नर हो तुम्हि जागा ।।
३ कीर्तनासि नर हो तुम्हि जागा ।
४ कीर्तनासि नर हो तुम्हि जागा ।।

अर्थ:—१ लोकहो, तुम्ही हीच कीर्तनाची योग्य जागा.
२ लोकहो, कीर्तनासाठीं जागे रहा.
३ लोकहो, कीर्तनाला जा आणि गा.
४ लोकहो, कीर्तनाला जागा म्हणजे कीर्तनांत काय सांगतात तें जाग्रत मनानें ऐका.

---

## फजिती !

एका अपारदर्शक भांड्यांत पाणी घेऊन तें टेबलावर ठेवावें व त्यावर एक झांकण ठेवावें, आणि कुणालाहि म्हणावें, "या भांड्यांतील पाणी मी हें झांकण न उचलतां पिऊन दाखवितों."

"पाहूं. पाहूं" असें म्हणून इतर उत्सुकता दर्शवितील. मग थोडा वेळ डोळे मिचकवावे, हातांनीं कांहीं चलाखीदर्शक हालचाल करावी, आणि म्हणावें, "हं झालं !"

"काय, झालें पिऊन ? शक्यच नाहीं." इतर म्हणतील.

"तें नाहीं आम्हांला माहीत. वाटल्यास पहा तुम्ही झांकण उचलून आंत."

आणि पाणी प्यायलों कीं नाहीं हें परीक्षिण्यासाठींच त्यानें झांकण उचललें कीं, आपण चटकन् भांडें उचलून तोंडाला लावावें.

"वा, वा, हें काय असं नाहीं." असा गलका होईल. त्यावर शांतपणें उत्तर द्यावें, "मी म्हटलं होतें कीं, मी झांकण न उचलतां पाणी पिऊन दाखवितों, आणि माझ्या सांगण्याप्रमाणें मी केलें आहे कीं नाहीं तेवढें बोला."

* * *

तुम्हांला एक कोडें सांगतों, पण चटकन् उत्तर द्या हं ! बघूं सोडवितां ?" असें सांगून पुढील गोष्ट सांगण्यास आरंभ करावा.

"एक गाढव होतें. त्याला ऊंस फार आवडे. एक दिवस तें एका उंसाच्या शेताजवळ गेलें, पण शेताला चारहि बाजूंनीं तारेचें कुंपण घातलें होतें, आणि कुंपणाच्या दारालाहि कुलूप होतें. बरें कुंपणावरून आंत उडी मारावयाची, तर खूपच उंच होतें कुंपण ! त्यामुळें तें अशक्य होतें. कुंपणाच्या मधून वाट काढणें शक्यच नव्हतें. कारण सगळ्या तारा कांटेरी होत्या. तर आतां सांगा कीं, गाढवानें ऊंस मिळविण्यासाठीं कसा यत्न करावा ?"

लोक घोटाळतील. मग थोड्या वेळानें म्हणावें, "कांहीं येत नाहीं लक्षांत ?" लोक वेळ मागतील. "आतां शक्य नाहीं." तुम्हीं म्हणा व पुन्हा विचारा, "बोला लवकर. काय, येतं आहे लक्षांत ? सांगा लवकर. येतंय लक्षांत ?"

"नाहीं बुवा !" ऐकणारे म्हणतील.

मग तुम्हीं म्हणा, "हो त्या दुसऱ्या गाढवाच्याही नाहीं आलं लक्षांत !" ( म्हणजे ऐकणारे पहिले गाढव ठरले ! )

## मनोरंजक कूटप्रश्न—

( पुढील उत्तमोत्तम कूटप्रश्न विठ्ठल कवि बीडकर यांनीं रचिले असें सांगतात. हे रामदासस्वामींचे समकालीन कवि मोंगलाईत बीड गांवीं राहात असत. )

कोणी एक वनीं सुलक्षण वधू मेघोदकें जन्मली ।
बालत्वीं नरनाम तीस असतां स्त्रीनाम ती पावली ।।
पांचांही प्रणिली, तयांतुनि तिहीं अत्यादरें वंदिली ।
तेथें ती श्रम पावली, म्हणुनियां कर्णाश्रमीं राहिली ।। १ ।।

—×—

पंच्यांशी नव दोन गृऽह नवरा त्यामाजि सोळा वधू ।
त्यामागें रिपु तीन तीन उवडे ते त्यांस गेले वधूं ।।
याचा अर्थ करा तुम्हीं चतुर हो थोडी असे आपदा ।
बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासचा वायदा ।। २ ।।

—×—


कोणी एक वनीं विचित्र पुतळा जेवावया बैसला ।
पात्रीं जेवण जेवतां अतिबळें पात्रेंचि तो भक्षिला ।।
त्याची जे वनिता वनांत फिरतां सूर्यास प्रार्थी सदा ।
बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासचा वायदा ।। ३ ।।

—×—


चारी चंद्र समान भूतलवटीं एकें दिनीं देखिले ।
रामासन्मुख रावणासि हृदयीं सीता धरी आदरें ।।
हें तो चित्रविचित्र वृत्त बरवें चाले पहा सर्वदा ।
बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासचा वायदा ।। ४ ।।

—×—

# केवळ दृष्टीनेंच ओळखा





( १ ) 'अ आ' आणि 'इ ई' या दोन रेषांपैकीं कोणती
रेषा अधिक लांब आहे ?




( २ ) काळ्याच्या आंतील पांढरा चौकोन मोठा
कीं पांढऱ्यांतील काळा चौकोन मोठा ?

## केवळ दृष्टीनेंच ओळखा



( ३ ) या चारही लांब रेषा समांतर असणें शक्य आहे का ?




( ४ ) 'अ आ', 'इ उ' आणि 'ए ऐ' यांपैकीं सर्वांत लहान रेषा कोणती ?

येते हिमाद्रिकन्यापतिसुतललना यौवनामाजि जेव्हां ।
रामस्त्रीनामकाना त्यजुनि उरत ते पीडिते होय तेव्हां ।।
हस्तीं हस्तींद्रवृंदांतकमुखरिपुचें-नाम-पूर्वार्ध, नाहीं ।
यालागीं भूसुतेशा अरिअनुजप्रिया स्वल्पही येत नाहीं ।। ५ ।।

—×—

अलिकुलवहनाचें वहन आणीत होते ।
शशिधरवहनानें ताडिलें मार्गपंथें ।।
नदिपति रिपु ज्याचा तात भंगोनि गेला ।
रविसुत महिसंगें फार दुःखीत झाला ।। ६ ।।

—×—

ऐके हो रमणी, विचित्र करणी म्यां देखिली लोचनीं ।
वाणी एक असे, मनोहर दिसे, अत्यंत ते तुंबिनी ।।
मध्यें वेल असे, पुढें फुल तया पाही कसें शोभलें ।
होता शुष्क, पहा विचित्र घडलें, वेलें फुलां भक्षिलें ।। ७ ।।

—×—

लक्ष्मी जयासि भगिनी आणि तात सिंधू ।
श्रीकृष्ण शालक असे आणि भ्रातृ इंदू ।।
ऐसे असोनि फिरतो परि दारदारीं ।
प्रारब्धहीन असला कुठला भिकारी ।। ८ ।।

# बडे आंकडेशास्त्रज्ञ व्हा !

## जादूची बेरीज

— १ —

तुमच्या मित्रमंडळींवर छाप पाडण्यास ही गंमत उपयोगी पडेल. प्रथम तुमच्या मित्राला एक मोठी लांबलचक संख्या लिहावयास सांगा. त्यानंतर त्याला म्हणावें, "एवढ्याच आंकड्याच्या तूं आणखी दोन संख्या लिही. नंतर मी दोन संख्या लिहीन, आणि त्या सर्वांची मिळून होणारी बेरीज मी आत्तां आधीं लिहून ठेवतों."

"तूं सगळ्या संख्यांची बेरीज आत्तां आधीं लिहिणार? बघूं, बघूं हं !" उत्तर येईल.

त्यानंतर तुम्हीं त्याला एक संख्या लिहावयास सांगा. समजा त्यानें ५३४१७९८१ अशी संख्या लिहिली. मग, तुम्हीं दुसरा एक कागद घ्या, आणि त्याच्या एका कोपऱ्यावर सर्वांची मिळून होणारी बेरीज मांडा. ही बेरीज मांडण्याची पद्धत अशी:.....त्याच्या पहिल्या संख्येच्या मागें तो आंकडा लिहावा, आणि मग त्या नव्या संख्येंतून तितकाच आंकडा वजा करावा.

पहा आतां:— २५३४१७९८१
− २
२५३४१७९७९

आतां सर्व संख्यांची मिळून येणारी इच्छित बेरीज झाली. ठरल्याप्रमाणें दुसऱ्या कपऱ्यावर लिहून ठेवा. अर्थात् ही संख्या दुसऱ्या कोणास दाखविण्याचें कारण नाहीं. त्यानंतर मित्राच्या पहिल्या संख्येखालीं त्याला आणखी दोन संख्या लिहावयास सांगा. उदाहरणार्थ, तो पुढीलप्रमाणें लिहील.

५३४१७९८१ (मूळची संख्या)
४७९५४२१८
७९५३११४६

त्याच्या या सख्या लिहून झाल्या म्हणजे त्याखालीं तुम्हांला दोन संख्या लिहावयाच्या आहेत, आणि या लिहिण्यांतच सारी मख्खी आहे. या संख्या लिहितांना तुम्हीं अशा प्रकारें लिहावयाच्या कीं, त्यानें लिहिलेल्या संख्येंतील प्रत्येक आंकड्याखालीं आपण असाच आंकडा लिहावयाचा कीं, दोन्ही आंकड्यांची मिळून बेरीज ९ च येईल. येथें हें सांगितलें पाहिजे कीं आपण ज्या दोन संख्या आतां लिहिणार त्यांचा मूळ संख्येशीं आतां कांहीएक संबंध नाहीं, तर नंतरच्या दोन संख्यांशीं आहे. तेव्हां आतां आपल्या संख्या आपण मांडूं. त्या पुढीलप्रमाणें येतील.

५३४१७९८१ मूळ संख्या.
४७९५४२१८ मित्राची नवी पहिली संख्या.
७९५३११४६ मित्राची नवी दुसरी संख्या.
५२०४५७८१ आपली पहिली संख्या.
२०४६८८५३ आपली दुसरी संख्या.

आतां मित्राच्या पहिल्या संख्येशीं आपली पहिली संख्या ताडून पाहा; सांगितल्याप्रमाणें आहे कीं नाहीं ती.

४ ७ ९ ५ ४ २ १ ८ मित्राची नवी पहिली संख्या.
५ २ ० ४ ५ ७ ८ १ आपली पहिली संख्या.

९ ९ ९ ९ ९ ९ ९ ९

तसेंच दुसरी पण ताडून पाहा.

७ ९ ५ ३ १ १ ४ ६
२ ० ४ ६ ८ ८ ५ ३

९ ९ ९ ९ ९ ९ ९ ९

हें ताडून केवळ वाचकांना खुबी समजावून देण्यासाठीं आहे. सरावानें आपल्याला भराभर आणि बिनचूक आंकडे लिहितां येतील. आपल्या दोन संख्या लिहून झाल्या कीं, मित्रमंडळींना सांगावें कीं करा आतां बेरीज.

```
 ५ ३ ४ १ ७ ९ ८ १
 ४ ७ ९ ५ ४ २ १ ८
 ७ ९ ५ ३ १ १ ४ ६
 ५ २ ० ४ ५ ७ ८ १
 २ ० ४ ६ ८ ८ ५ ३
२ ५ ३ ४ १ ७ ९ ७ ९
```

ही बेरीज नेमकी आपण पूर्वीं लिहून ठेवल्याइतकीच आहे. ती पूर्वींची बेरीज नंतर आतां पुढें करा; सर्व मित्रचमू अगदीं चकित होऊन जाईल !

हीच चलाखी २ च्या ऐवजीं ३, ४, ५, ६ वाटेल तितक्या संख्येनिशीं करितां येईल. अर्थात् दोन संख्या म्हणजे मूळ संख्या सोडून त्याच्या, आणि आपल्या प्रत्येकीं दोन दोन, तीन म्हणजे मूळ संख्या सोडून प्रत्येकीं तीन तीन. बेरीज मांडण्यापूर्वीं आगाऊ बेरीज मांडण्याचा नियम हाच. "मूळ संख्या सोडून प्रत्येकीं जितक्या संख्या मांडावयाच्या तो संख्येचा आंकडा मूळ संख्येच्या मागें मांडावयाचा, आणि त्या सर्व संख्येंतून नंतर तो आंकडा वजा करून उत्तर मांडावयाचें." अर्थात् हें सर्व मनांतल्या मनांत करितां येतें चटकन्. कारण मूळ संख्या आपल्या डोळ्यापुडें असतेच. खालीं तीन प्रत्येकीं धरून ( मूळ संख्या सोडून ) एक उदाहरण दिलें आहे त्यावरून उलगडा होईल.

९ ७ ५ ४ ० २ १ ९ ३ मूळ संख्या.

यावरून दुसऱ्या कागदावर आपण चटकन् शेवटीं येणारी बेरीज मांडूं. ती येणेंप्रमाणें:—३ ९ ७ ५ ४ ० २ १ ९ ० आणि नंतर—

९ ७ ५ ४ ० २ १ ९ ३ मूळ संख्या.

५२६८



| | | |
|---|---|---|
| ५ ७ २ १ ९ ४ ६ ३ ३ | मित्राची पहिली संख्या. | |
| ५ ४ २ ९ ७ १ ५ ७ ७ | ,, दुसरी | ,, |
| ४ ३ १ ८ ७ २ ९ ५ ४ | मित्राची तिसरी संख्या. | |
| ४ २ ७ ८ ० ५ ३ ६ ६ | आपली पहिली | ,, |
| ४ ५ ७ ० २ ८ ४ २ २ | ,, दुसरी | ,, |
| ५ ६ ८ १ २ ७ ० ४ ५ | ,, तिसरी | ,, |
| ३ ९ ७ ५ ४ ० २ १ ९ ० | बेरीज | |

अधिक प्रवीण झाल्यानंतर मित्राच्या संख्येनतर आपल्या संख्या ओळीनेंच लिहिल्या पाहिजेत असें नव्हें. त्याला चकविण्यासाठीं त्या वर खालीं कशाहि लिहाव्या. कारण शेवटीं सर्वांची बेरीज झाली म्हणजे आपलें काम साधारणच आहे.

— २ —

तुमच्या मित्राला एक पांच आंकडी संख्या लिहावयास सांगा, आणि असेंहि सांगा कीं, त्या संख्येतील आंकडे एकापेक्षां एक चढते किंवा उतरते असले पाहिजेत. उदाहररणार्थ १,२,४,७,९ किंवा ८,५,३,२,० याप्रमाणें

त्यानंतर त्याच संख्येच्या खालीं तीच संख्या उलट करून लिहावयास सांगा. त्यानंतर त्या दोन्हींपैकीं जी संख्या मोठी असेल तिच्यांतून लहान संख्या वजा करण्यास सांगा. त्यानंतर आलेल्या संख्येच्या खालीं पुन्हा आलेल्या संख्येचीच उलट करून संख्या लिहून त्या दोहोंची बेरीज करावयास सांगा, आणि आत्तां उत्तर सांगतो असें म्हणून 'एक लक्ष नऊ हजार आठशें नव्वद' असें उत्तर द्या. सर्वजण चकित होतील. पण याची गुरुकिल्ली ही आहे कीं, अशा प्रकारें केलेल्या कोठल्याहि आंकडेमोडीचें उत्तर तेंच येतें. उदाहरणार्थ—

| | |
|---|---|
| ७ ५ ४ २ १ | १ २ ३ ४ ९ |
| – १ २ ४ ५ ७ | ९ ४ ३ २ १ |
| ६ २ ९ ६ ४ | ८ १ ९ ७ २ |
| + ४ ६ ९ २ ६ | २ ७ ९ १ ८ |
| १ ० ९ ८ ९ ० | १ ० ९ ८ ९ ० |

## प्रचंड गुणाकार

— ३ —

कोणालाहि एक मोठी कितीहि आंकडी संख्या लिहावयास सांगा. (समजा, तो लिहील ४५९४२२) त्यानंतर तो जितक्या आंकडी संख्या लिहील आणि जिच्यांत सर्व नऊचेच आंकडे आहेत अशा तितक्याच आंकडी संख्येनें त्याला गुणावयास सांगा. (म्हणजे येथें ४५९४२२ × ९९९९९९ तो गुणाकार करूं लागला कीं त्याला म्हणावें, "अरे, किती वेळ लावतोस ! मी पहा चटकन् गुणाकार करतों तो !" असें म्हणून तुम्ही पुढील नियमाप्रमाणें उत्तर मांडा–प्रथमच्या संख्येंत एक वजा करून तीच संख्या मांडावी. (म्हणजे येथें ४५९४२१) आणि यापुढें ती सर्व संख्या तितक्याच सर्व नऊच असणाऱ्या आंकड्यांच्या संख्येंतून वजा करून, त्याच संख्येच्या पुढें मांडावी कीं, एकदम उत्तर येईल. (म्हणजे येथें४५९४२२×९९९९९९=४५९४२१,५४०५७८ आतां४५९४२१ ही संख्या ९९९९९९ मधून वजा करणें अत्यंत सोपें आहे. कारण कोठेंहि 'हातचा' मुळींच येंत नाहीं). आणखीं उदाहरणें पाहा—

(१) ७२५४ × ९९९९ = ७२५३, २७४६.

(२) ६५१४५२७१ × ९९९९९९९९ = ६५१४५२७०, ३४८५४७२९.

आपला गुणाकार अचूक आहे कीं नाहीं याचा ताळाहि पाहतां येतो तो पुढीलप्रमाणें.उदा. ४५९४२२×९९९९९९=४५९४२१,५४०५७८

आणि ४५९४२१
+ ५४०५७८
९९९९९९ हा ताळा.

मूळच्या संख्येंत एक वजा करून, नंतर तीच संख्या तितक्याच आंकडी, जिच्यांत सर्व नऊच आहेत अशा संख्येंतून वजा करून पुढें मांडतांन शून्य आलें तर तें आंकड्याप्रमाणें धरून मांडावें. उदाहरणार्थ—

(१) ९४५×९९९=९४४०५५
(२) ९९४०×९९९९=९९३९००६०
(३) ९९७×९९९=९९६००३

— ४ —

आणखी—

तुमच्या मित्राला एक चार आंकडी संख्या लिहावयास सांगा. नंतर त्या संख्येतील चारहि आकड्यांची बेरीज करावयास सांगा, आणि ती बेरीज मूळ संख्येतून वजा करावयास सांगा. त्यानंतर 'आलेल्या उत्तरांतील शून्य सोडून कोठलाहि आंकडा खोडा' म्हणून त्यास सांगा व उरलेली संख्या तुम्हांला सांगतां येईल. उदाहरणार्थ--

४२५९=२०
− २०
४२३९

समजा, त्यानें तीन हा आंकडा खोडून तुम्हांला ४२९ ही संख्या सांगितली, तर तुमचें काम इतकेंच कीं, त्या संख्येतील तिन्ही आंकड्यांची बेरीज करून त्याला नऊनें भागावयाचें, आणि जी बाकी उरेल ती ९ मधून वजा केली कीं, खोडलेला आंकडा येतो.

आतां ज्या वेळीं बाकी शून्य उरेल त्यावेळीं तेवढा प्रश्न येतो. त्या वेळीं ९ चा आंकडा खोडला असें सांगावें. ही चलाखी कितीहि आंकडी संख्येनें करता येते.

———

पुढील मौज करून पाहण्यासारखी आहे.

**करून पहा :**

स्वतः डोळे मिटा, आणि पाटीवर वा कागदावर एक घड्याळ्याचें चित्र काढा. प्रथम वर्तुळ काढा, आणि मग त्यांत आंकडे भरा. डोळे उघडल्यानंतर तुमची चित्रकला मोठीच अलौकिक असल्याचें तुम्हांला आढळून येईल. त्यानंतर तुमच्या मित्रमंडळींना तसें करावयास सांगा. सारींच चित्रें मोठीं मौजेची, आणि हास्यकारक येतील, आणि तुम्हांला आनंद लुटतां येईल. करून पहा.

———

## परीक्षा


विविध धाटणीचीं निरनिराळ्या धर्तीचीं, आणि अनेक प्रकारचीं खूप खूप कोडीं सोडवून तुमची बुद्धि आतां कुशाग्र, आणि सर्वगामी बनली असेल. तिला आणखी खुसखुशीत खाद्य पुढें दिलेल्या परीक्षेंत मिळेल.

### बुद्धीची चांचणी


१

एका तेल्याजवळ १० शेरांचें एक, ७ शेराचें एक, आणि ३ शेराचें एक अशीं तीनच भांडीं आहेत, त्यांपैकीं १० शेराचें भांडें तेलानें पुरतें भरलेलें आहे, आणि इतर दोन्ही मोकळींच आहेत; तर इतर चवथ्या भांड्याचा उपयोग न करतां या १० शेर तेलाचे ५।५ शेराचे दोन भाग तुम्हांला पाडतां येतील कां ?

२





# केवळ दृष्टीनेंच ओळखा




( ५ ) या रेषांपैकीं कोणत्या रेषा समांतर आहेत ?

डावीकडून उजवीकडे १, २, ३, ४, ५, ६ असे क्रमांक धरा.





( ६ ) ‘ अ आ ’ आणि ‘ ख ’ यांपैकीं रेषा आखूड कोणती ?




( ७ ) 'अ आ' आणि 'इ उ' यांतील कोणती रेषा अधिक लांब आहे ?



( ८ ) या आडव्या ठेवलेल्या लोखंडी पिपाचें तोंड कसें आहे ? डावीकडून उजवीकडे कीं उजवीकडून डावीकडे ?

मागील पानावरील १० घरांमध्यें १ ते १० आंकडे प्रत्येकीं अशा प्रकारें भरा, कीं पंचकोनाच्या प्रत्येक बाजूची बेरीज सारखीच येईल.

३

शंभराचे असे दोन भाग करा कीं, त्यांतील मोठ्या भागाला लहान भागानें भागलें तर उत्तर पुनश्च शंभरच येईल.

४

पुढील वाक्यांत गुप्त भाषेंत पाठविलेला संदेश तुम्हांला ओळखतां येतो का पाहा :

''भजनप्रेमी दत्तकवि नंदादीप उदबत्ती पेटवीत मधुरसा काव्यालाप उघड गुणगुणले, 'मंगल प्रेमभाव प्रत्येक घरोघर देवराय दिसावे !' ''

५

४० शेराचे असे ४ तुकडे करा कीं, १ पासून ४० पर्यंत कोणतेंहि वजन तराजूनें मापून देतां येईल.

६

दिवाळींत काकांनीं मुलांसाठीं मोठ्या फटाकड्याच्या पेट्या आणल्या. काकांनीं एकूण जितक्या पेट्या आणल्या तितकेच मोठ्या फटाकड्यांचे सर प्रत्येक पेटींत होते, आणि जितके सर प्रत्येक पेटींत होते तितकेच फटाकडे प्रत्येक सरामध्यें होते. सर्व पेट्या फोडून आणि त्यांतले सर्व सर सुटे करून काढलेले फटाकडे काकांनीं घरच्या सात मुलांना सारखे वांटून दिले आणि उरलेले सर्व घरच्या माळ्याच्या मुलाला दिले. एकहि फटाकडा वात पडल्यानें वायां गेला नाहीं असें धरलें तर माळ्याच्या मुलाला किती फटाकडे मिळाले ?

७

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| संदेश ओळखा— | शी | उ | प | स्वा | ल्या | मं |
| | न | र्थ | म | सु | श्री | बु |
| | दा | व्हे | व | द्धी | ती | ना |
| | णा | नें | र्णा | त | च | मि |
| | र | च्या | चा | ळ | त | हे |
| | रा | वि | आ | ही | र | ले |

वरील कोड्याची अर्थोत्पत्ति करणारी गुरुकिल्ली पुढीलप्रमाणें आहे—

एकमार्गी सारखी गाडी हांकला।
अक्षरांच्या पोटीं हेतु दडला॥
एकचाकी गाडी कोलांट्या खाणार।
चारचाकी गाडी भरधांव जाणार॥

८

एका शेतकऱ्यानें एका कामकऱ्याशीं कामासंबंधींचा ठराव केला. कामाची अत्यंत निकड असल्यामुळें असें ठरलें कीं, शेतकरी स्वतः शेतांत काम करतो त्याच्यासवेंच कामकऱ्यानेंहि काम करावें. ज्या दिवशीं कामकरी एकूण ९ तास काम करील तो दिवस पुरें काम केल्याचा समजून शेतकऱ्यानें त्याला त्यासाठीं ८ आणे मोल द्यावें. परंतु कामाची अत्यंत निकड असल्यामुळें मोलकऱ्यानें चुकारपणा करूं नये म्हणून स्वतः शेतकऱ्यानें अशी दुसरी अट घातली कीं, ज्या दिवशीं कामकरी कामावर मुळींच येणार नाहीं त्या दिवशीं त्याचे १० आणे दंड म्हणून कापून घ्यावे; तसेंच जितके तास कामावर तो यायला उशीर करील त्याचेहि याच प्रमाणांत पैसे कापून घ्यावे. महिन्याचे अंतीं सर्व आढावा घेतां दुर्दैवानें

कामकऱ्याच्या आळसामुळें त्याच्या वांट्याला एकहि पैसा आला नाहीं. आधीं ठराव केला असूनहि त्याप्रमाणें न वागून चुकारपणा केल्याचा परिणाम त्याला भोगावा लागला; तर त्यानें एकूण किती तास काम केलें आणि किती दिवस कामाचा आळस केला ?

९

काल आमच्या बागेंत माळ्यानें कांहीं विशिष्ट आकाराचा फुलांचा ताटवा लावण्यासाठीं एक आकृति आंखून ठेवलेली आहे; आणि त्याची माज अशी कीं, त्या आकृतीच्या सर्व बाजू सरळ आणि सारख्या असून प्रत्येक बाजू तिच्या शेजारच्या बाजूंशीं काटकोनांतच जोडलेली आहे. आणि विशेष कौतुकाची गोष्ट ही कीं, या आकृतीच्या सर्व बाजूंच्या बेरजेचा किंवा परिमितीचा आंकडा आणि या आकृतीच्या क्षेत्रफळाचा येणारा आंकडा हे सारखेच आहेत; आणि त्याचा आकार नुसताच चौरस नाहीं तर प्रत्येक बाजू किती फूट लांब येईल

१०


‘ चमत्कार ’, ‘ चक्र ’, ‘ चंद्र ’ आणि ‘ चाळीस ’ या चारहि परिचित मराठी शब्दांत ‘ च ’ चा उच्चार ‘ च्य ’ असा होतो; तसाच तो इतरहि कांहीं परिचित मराठी शब्दांत होतोच असे कांहीं पुरावा दिल्यावांचून कसें म्हणतां येईल ?

वरील वाक्यांत कांहीं विसंगति वा असमंजसपणाचा भाग आहे काय ?

११

लगतच्या आकृतींत एका शेतकऱ्याच्या शेताचा नकाशा दिला आहे. त्यांत एकूण ४ विहिरी, ४ घरें आणि ४ आंब्यांचीं झाडें आहेत. आतां समजा, तुमच्याकडे या शेताच्या ४ वाटण्या करून त्या त्याच्या

चार मुलांत वांटण्याचें काम आलें, तर शेताचे कसे भाग पाडाल ?



शेत कऱ्याच्या मुख्य अटी अशा कीं, प्रत्येक भाग सारख्याच आकाराचा आणि सारख्याच क्षेत्रफळाचा व्हावा आणि प्रत्येक मुलाच्या भागांत एक घर, एक विहीर आणि एक आंब्याचें झाड यावें. पाहूं तुमचें बुद्धिकौशल्य !

## १२

२ आण्याला ४९ या भावानें एकानें कवड्या विकत घेतल्या; आणि एकूण कवड्यांचे दोन समान भाग करून एक भाग १ आण्याला २४ कवड्या या भावानें व दुसरा १ आण्याला २५ कवड्या या भावानें विकला; तर त्याला १ आणा लाभ त्यानें किती कवड्या खरेदी केल्या म्हणजे होईल ?

## १३ (वेळ:–दीड मिनिट

आमच्या रमाकाकूंच्या शेजारच्या बाई, साखर घेऊन त्याच्या पेपरमिंटच्या वड्या करून देत आणि करणावळ म्हणून पैसे घेत. एक दिवस

आमच्या आईनें रमाकाकूंना विचारलें, " का हो, आम्हांलाहि थोड्या चड्या त्यांच्याकडून करून घ्यावयाच्या आहेत., मी त्याकरतां साखर पाठवून देतें तुमच्याकडे. पण काहो, कशा काय असतात त्यांच्या वड्या ? बाजारांतल्यासारख्या कीं घेताच्याच ?" यावर रमाबाई उत्तरल्या, " काय सांगूं ? खरोखरच बाजारांतल्या इतक्या चांगल्या नसतात." आतां त्यांच्या या एकाच वाक्याचे दोन परस्परविरोधी अर्थ होत आहेत. एक अर्थ बाजारांतल्याहून सरस आणि दुसरा बाजारांतल्यापेक्षां कमी प्रतीच्या. तुमच्या मतें कोणता अर्थ अधिक युक्त आहे आणि कां ?

१४

१ २ ३ ४ ५ ७ ८ ९ यांपैकीं चार चार आंकड्यांच्या दोन जोड्या पाडा; आणि त्या जोडींतील आंकडे अशा प्रकारें लिहा कीं, दोहोंचें उत्तर एकच येईल. वाटल्यास अधिक चिन्हांचा उपयोग करा.

१५

सध्यां शके १८६७ चालू आहे असें धरूं. एका मनुष्याचें मृत्यु-समयीचें वय (पुरीं वर्षें) त्याच्या जन्मशतकाच्या नेमकें एक-एकूणतिसांशा-इतकें आहे. तर शके १८४२ मध्यें म्हणजे त्याच्या मुलाच्या लग्नामध्यें तो किती वर्षांचा होता ?

या कोड्यांत, कोडें सोडविण्यास पुरेल इतकी आवश्यक सामुग्री दिलेली नाहीं, असें वाटण्याचा संभव आहे; परंतु तसा कांहींएक प्रकार नाहीं.

१६

एका धनगराला विचारलें कीं, " तुझ्याजवळ किती शेळ्या आहेत ?" त्यावर तो उत्तरला, "दोन-दोनचे, तीन-तीनचे, चार-चारचे, पांच-पांचचे, सहा-सहाचे जरी मी गट केले, तरी प्रत्येक वेळीं एक मेंढी उरते. परंतु

सात-सातचे गट केले तर उरत नाहीं." तर त्याच्याजवळ कमींत कमी किती मेंढ्या असतील

१७

## हें आहे तरी काय लचांड ?

ती एक अशी गोष्ट आहे कीं, तिची गणना प्राण्यांत करतां येणार नाहीं; किंवा जड, भौतिक वा खनिज पदार्थांतहि करतां येणार नाहीं. तसेंच गुणवाचक, संख्यावाचक वा भाववाचक गोष्टींतहि ती येऊं शकत नाहीं. तसें पाहिलें तर त्या गोष्टीचें माझ्याकडे कांहीं काम नाहीं; आणि मलाहि त्या गोष्टीचा अर्थाअर्थीं कांहींसुद्धां उपयोग नाहीं. पण इतकें आहे तरी मी मात्र तिच्यावांचून राहूं शकत नाहीं. ती सर्वथा परिपूर्णतेनें माझीच आहे हें निश्चित; परंतु ती मला कोणी दिलेली नाहीं, मीं विकत घेतलेली नाहीं, उसनी मागून आणलेली नाहीं, चोरून आणलेली नाहीं, फसवून वा बळानें लुबाडून घेतलेली नाहीं, किंवा वारसाहक्कानेंहि ती माझ्या स्वाधीन झालेली नाहीं. पुष्कळ वेळां ती सोडून नाहींशी होते; पण त्यासाठीं मी मुळींच सचिंत होत नाहीं. कारण, मला ठाऊक आहे कीं, ती नेहमींप्रमाणें पुनश्च मजकडे येईलच. म्हणूनच तिच्या असण्याची वा नसण्याची मला पर्वाच वाटत नाहीं असेंच का म्हणानात ! घराच्या छपरावरून किंवा झाडाच्या शेंड्यावरून खालीं कठीण फरसबंदीवर ती पडली तरी तिचे तुकडे होत नाहींत, पाण्यांत पडल्यामुळें भिजतहि नाहीं, थंडीनें कांकडत नाहीं, उष्णतेनें पाझरत नाहीं.

त्या गोष्टीला आवाज नाहीं, चव नाहीं, आणि वासहि नाहीं. तिला मी पाहूं शकतों आणि स्पर्श करूं शकतों, पण तो मला जाणवत नाहीं. नाम, रूप, गुण यांपैकीं केवळ तिच्या नांवाची निश्चिति आहे. इतरांची

मर्यादा सांगतां येत नाहीं. कुत्रीं मांजरें, कोल्हीं, उंदीर आणि ससे इत्यादिकांच्या जवळहि असूं शकते. मग आतां सांगा हें आहे तरी काय लचांड ?

१८

एका नटीनें असा पण केला कीं, 'मी ज्या माणसाशीं लग्न करीन तो गोरा हवा, सुस्वरूप हवा, उंच हवा, निरोगी हवा आणि पैसेवाला हवा. श्रीयुत काळे गोरे आहेत, उंच आहेत, निरोगी आहेत आणि पैसेवाले पण आहेत; परंतु रूपानें गौण आहेत. श्रीयुत गोळे हे सुस्वरूप आहेत, उंच आहेत, निरोगी आहेत, गोरे आहेत पण निर्धन आहेत. श्रीयुत भोळे हे पैसेवाले आहेत, निरोगी आहेत, सुस्वरूप आहेत, गोरे आहेत परंतु उंचीनें कमी आहेत. श्रीयुत राळे हे उंच आहेत, सुस्वरूप आहेत, पैसेवाले आहेत, गोरे आहेत पण आरोग्यांत जरा गौणच आहेत. श्रीयुत लाळे हे वर्णानें काळे परंतु सुस्वरूप, पैसेवाले, उंच, निरोगी सर्व कांहीं आहेत. तर आतां प्रश्न असा कीं ही नटी कोणाशीं लग्न करील ? आणि कां ?

१९

३, ३, ३, ३ असे तीनचे चार आंकडे तुम्हांला दिले. गणितांत येणारीं कोणतींहि चिन्हें कोठेंहि वापरून हे चारी आंकडे अशा प्रकारें लिहा कीं, त्याचें उत्तर १०० च येईल.

२०

रामाचें आजचें २१ हें वय, तो गोविंदाएवढा असतांना गोविंदा जेवढा होता त्याच्या दुपटीनें आहे; तर गोविंदाचें आजचें वय काय ?

२१

महाराष्ट्राच्या इतिहासांतील तो एक इतिहासप्रसिद्ध पुरुष आहे. तो बुद्धिमान् होता, धर्मशास्त्रज्ञ होता, शिल्पशास्त्रज्ञ होता, राजकारणपटु होता, विद्वान् होता आणि त्याच्या काळीं सर्वत्र नांवाजलेला होता; आणि त्याच्या दोन वैशिष्ट्यांमुळें तो आजहि सर्व महाराष्ट्रभर त्या वैशिष्ट्यांसाठीं प्रसिद्ध आहे. तर तो कोण ?

२२


गोविंदराव आणि गोदूबाई, काशिनाथपंत आणि कमलाबाई, वसंतराव आणि विमलाबाई अशा तीन जोडप्यांना एक नदी ओलांडावयाची आहे. कांठावर केवळ एकच होडी आहे; आणि होडींत एका वेळीं दोनच माणसें बसूं शकतात. सर्वांना वल्हवतां येत आहे, परंतु तिन्ही स्त्रिया ह्या आर्यस्त्रिया असल्यामुळें कोठलीहि स्त्री आपला पति जवळ असल्या-वांचून दुसऱ्या कोणाहि परपुरुषाच्या सान्निध्यांत एक क्षणभरहि राहण्याचें मान्य करणार नाहीं. तर कमींत कमी किती खेपांत ही सर्व मंडळी दुसऱ्या कांठावर जाऊं शकतील ? ( एका कांठावरून दुसऱ्या कांठावर होडी पोहोंचली कीं, एक खेप धरावयाची. ) आणि कसकशी जातील ?

( टीपः—नुसती एकच बाई कांठावर असतांना तेथें होडी घेऊन दुसरें जोडपें जाऊं शकत नाहीं. कारण या जाणाऱ्या जोडप्यांपैकीं पति पहिल्या बाईच्या पतिविना तिच्या सन्निध येतो. मग तो होडींतून कांठावर उतरो वा न उतरो. )


२३

माझ्या वयाच्या ४५ व्या वर्षी मला नोकरी लागली. त्यानंतर वर्ष-भरानें म्हणजे माझ्या वयाच्या ४४ व्या वर्षी माझें एका ५३ वर्षांच्या माझ्याहून लहान मुलीशीं लग्न झालें. त्यावेळीं तिच्या बापानें मला

# केवळ दृष्टीनेंच ओळखा




(९) या चौकोनापैकीं कोणता कोन काटकोनापेक्षां लहान आणि कोणता काटकोनापेक्षां मोठा आहे ?




(१०) वरची रेघ पुढें वाढविली असतां कोणती खालची रेघ येईल ?

# केवळ दृष्टीनेंच ओळखा



( ११ ) या वर्तुळासमान भासणाऱ्या आकृतीच्या सर्व त्रिज्या सारख्या असणें शक्य आहे कां ?



( १२ ) या रेषांपैकीं आखूड कोणती ? वरची, खालची कीं मधली ?

३०० रु. हुंडा म्हणून दिले. म्हणजे मला माझ्या प्रतिमासिक वेतनाच्या सहापट हुंडा मिळाला. अर्थात् याचाच अर्थ माझें वेतन प्रतिमासिक ५१० रुपये होतें, असा उघडच आहे. लग्नानंतर ३ वर्षांनीं आम्हांला ९ मुलें झालीं. पैकीं एकदांच माझ्या बायकोला मुलगा नि मुलगी असें एकच जुळें झालें होतें."

हा वृत्तांत वाचून त्याचा विसंगतपणा काढून टाकून पूर्णपणें उलगडा करील अशी एक गुरुकिल्ली आहे. पहा प्रयत्न करून तुम्हांला ती सांपडते का.

## २४

एका मुलानें १०० पैशांचीं १०० फळें घेतलीं. प्रत्येक संत्र्याला ५ पैसे, प्रत्येक केळ्याला १ पैसा आणि प्रत्येक पैशाला २० बोरें मिळत. तर प्रत्येक प्रकारचीं किती किती फळें त्यानें घेतलीं? अर्थात् त्याच्या पिशवींत तीनहि प्रकारचीं फळें होतीं हें तर निश्चितच.

## २५

कर्णपर्व अध्याय ४५ मध्यें भीम व दुःशासन यांच्या द्वंद्वयुद्धाच्या प्रसंगीं वर्णन करतांना, मोरोपंतांनीं खालील आर्या लिहिली आहे.

धांवति अन्योन्यांवरि ते दोघे आठवूनि अपकार।
जाणों ते मदमत्त क्रोधोद्धत दंपतीच अपकार ।।

या कवितेचा अर्थ पुढीलप्रमाणें आहेः—" मदानें मातलेले आणि रागानें उद्धट झालेले हत्ती हत्ती जसे एकमेकांवर धांवून जातात, तद्वत् ते दोघे [ भीम आणि दुःशासन ] परस्परांनीं केलेले अपकार आठवून एकमेकांवर चढाईनें धांवून जाऊं लागले."

आतां प्रश्न असा कीं, वरील अर्थांत हत्ती हा शब्द कसा येऊं शकतो हें तुम्हांला सांगतां येईल का? कोणी म्हणतील 'मदमत्त' याचा अर्थ हत्ती

अमा घेतां येईल. पण मदमत्त म्हणजे मदानें मातलेला, मग तो हत्ती, बैल, रेडा कोणीहि असूं शकेल. हत्ती असा अर्थ कसा होतो तें विचारपूर्वक सांगा.

कवितेंतील कांहीं शब्दांचे अर्थ:—

१ अन्योन्यांवर = परस्परांवर; २ मदमत्त = मदानें मस्त; ३ क्रोधोद्धत = रागानें उद्धट वर्तन करूं लागलेले; ४ दंपती = जोडपें.

पुढील कूटप्रश्न सोडवा:—

(अ) राक्षसा प्रिय जे तिचा श्वशुर जे, ते वस्त्र भोगी सती
ती ज्यानें धरिली तयें कुमरिचा शत्रु सुतेचा पती
त्याचा हारचि दार स्वार वनिता कल्याण हो सर्वदा
बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासचा वायदा ।।

(आ) नाहीं गे, पवनात्मजे समरिं त्या रामामर्णी दीधली
नाहीं अर्जुन भारतीं परि कदा कोणासि ते दीधली
नाहीं गे त्रिपुरासुरासि भिडतां श्रीशंकरें दीधली
कांतानें सरिता अजी मज प्रिये रात्रीस ते दीधली ।।

## २७

रिकामे आणि निकामे दोघेजण एकमेकांचे शेजारी. दोघांचीं घरें अगदीं सारख्या बांधणीचीं होतीं. पुढचीं दारेंसुद्धां अगदी एकसारखीं एक. त्यामुळें काय होई, निकाम्याकडचे कित्येक पाहुणे चुकून रिकाम्यांकडे येत; आणि यांचे त्यांच्य कडे जात. एक दिवस या त्रामाला कंटाळून रिकामे निकाम्याकडे आले आणि म्हणाले, "हें पहा, हा त्रास किती दिवस चालणार? त्यापेक्षां खुणेसाठीं आपण आपल्या घरांचीं दारें निरनिराळीं रंगवूं आणि त्याप्रमाणें आपल्या आप्तसुहृदांना सांगून ठेवूं म्हणजे हा गोंधळ टळेल! मी माझ्या दाराला निळा रंग देतो. तुम्हीं तुमच्यां दाराला कोणता देतां?"

निकामे उद्गारले, "छान युक्ती आहे तुमची. आम्हीं आमच्या दाराला तांबडा रंग देतो. तुम्हीं तुमच्या लोकांना सांगा कीं, 'निळ्या दाराचें घर आमचें.' आम्हीं सांगू, 'तांबड्या दाराचें आमचें.' छान तोड निघाली आतां!"

वरील गोष्ट आमच्या एका मित्राला सांगत असतां तो उद्गारला, "खूप झाली बुवा! दोघांचींहि डोकीं नांवाप्रमाणेंच रिकामीं आणि निकामी आहेत खरीं!" त्याच्या म्हणण्यांत कांहीं अर्थ आहे असें तुम्हांला वाटतें का?

## २८

एका बागवानाला एकूण १००० संत्रीं हवींत म्हणून मागणी आली. तेव्हां त्याचे सेवक यशवंत, रघूजी आणि लक्ष्मण असे तिघेजण आणि त्यांच्या बायका संत्रीं तोडूं लागल्या. तीन्ही बायकांनीं मिळून ३९६ संत्रीं तोडलीं. यशोदेनें गजरेपेक्षां १० अधिक तोडलीं व रखमानें यशोदेपेक्षां १० अधिक तोडलीं. यशवंतानें आपल्या बायकोइतकींच संत्रीं तोडलीं. तर रघूजीनें आपल्या बायकोच्या दीडपट तोडलीं; आणि लक्ष्मणानें आपल्या बायकोच्या दुप्पट तोडलीं; तर प्रत्येक माणसाच्या बायकोचें नांव काय?

## २९

मी चढावर सरासरी मिनिटाला ७० फूट चालतो, उतारावर मिनिटाला १३० फूट चालतो; आणि सपाटीवर ९१ फूट चालतो. एका तळ्याच्या सभोंवतीच्या गोल रस्त्यांमध्यें अर्थातच चढ, उतार आणि सपाटी असे तीन्ही प्रकार आहेत. नित्य सायंकाळीं त्या रस्त्यावरून या दिलेल्या गतीनें मी दोन फेऱ्या मारतों; पण त्यांपैकीं एक फेरी मारून झाली कीं, त्याच पावलीं परत फिरून उलटी दुसरी फेरी मारतों; अर्थात् रस्त्याची एकूण लांबी १८२० यार्ड धरली तर दोन वेळां फेऱ्या मारण्यास मला एकूण किती वेळ लागतो? वाटतें तितकें सोपें नाहीं हं?

३७१३८

★ शालेय पुस्तकें

★ कादंबऱ्या

★ लघुकथा

★ नाटकें

★ काव्य

★ बालवाङ्मय

आणि इतर सर्व प्रकारच्या पुस्तकांसाठीं प्रथम आमचेकडे

चौकशी करा :—

IRBK-0105284

IRBK-0105284

अभिनव पुस्तक मंदिर, गणेशवाडी.

फर्ग्युसन कॉलेजजवळ, पुणें ४.